अकोला । मंगळवार
दि. १५ जुलै २०२५
वर्ष : १९ अंक : १३५
पाने : ८ + ४

दैनिक
बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये




## ‘चड्डी-बनियान गँग’वरून विधानसभेत खडाजंगी!

मुंबई, दि. १४ वृत्तसंस्था

महाराष्ट्राच्या विधानसभेत आज एक वेगळाच राजकीय ड्रामा पाहायला मिळाला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आपल्या भाषणात चड्डी-बनियान गँग असा उल्लेख करताच, भाजप आमदार निलेश राणे अक्षरशः संतापले.

आदित्य ठाकरेंनी वापरलेल्या या शब्दांवरून निलेश राणे चांगलेच चवताळले. ते म्हणाले, त्या आदित्यने हे जे काही शब्द वापरले, नेमकं कोणावर कारवाई व्हावी, नेमकं त्यांची चड्डी कोण आणि त्यांची बनियान कोण? हे एकदा त्यांनी सांगावं ना! राणे पुढे म्हणाले, जर एवढी भीती वाटत असेल बोलायला तर सभागृहामध्ये असे शब्द वापरू नका, वापरायचे नाहीत असे शब्द. कोणासाठी वापरताय हे शब्द? कोणासाठी शब्द होते हे? हिम्मत असेल तर त्यांनी बोलून दाखवावं हे शब्द कोणासाठी होते? उगाच टीका करायची म्हणून काहीही करायची का? एक तासापासून आम्ही ऐकत आहोत, काही बोललो नाही. हे शब्द कुठले? रुलिंगमधून शब्द हे काढून टाकावे या तर त्यांनी स्पष्ट करावं. हिम्मत असेल तर नेमकं कोणाबद्दल बोलले ते स्पष्ट करावं, असे आव्हानही निलेश राणे यांनी आदित्य ठाकरेंना दिले. आदित्य ठाकरेंनी नेमका कोणाकडे उद्देशून हा शब्दप्रयोग केला होता, हे स्पष्ट झाले नसले तरी, त्यांच्या या विधानावरून विधानसभेत जोरदार खडाजंगी झाल्याचे चित्र होते.

## थोडक्यात

### बिहारमधील मतदारांना राहुल गांधींचे आवाहन



**नवी दिल्ली :** बिहारमध्ये यंदा मतदान केवळ सरकार बदलण्यासाठी नव्हे, तर बिहारला वाचवण्यासाठी करायचे आहे, असे म्हणत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी बिहार सरकारवर टीका केली. ऐन निवडणुकीच्या पूर्वी बिहारमधील कायदा व सुव्यवस्थेवरून राहुल गांधींनी बिहार राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले. बिहार भारतातील गुन्हेगारी जगताची राजधानी आहे. प्रत्येक गल्लीत भीती आणि घरात अस्वस्थता आहे, अशी टीका राहुल गांधींनी सोशल मीडियाद्वारे केली. बिहारमधील विविध ठिकाणी झालेल्या हत्यां सदर्भातील बातमीचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले की, बिहारमधील गुंडाराज बेरोजगार युवकांना गुन्हेगार बनवत आहे. मुख्यमंत्री आपली खुर्ची वाचवत आहेत, तर भाजपचे मंत्री कमिशन कमवत आहेत, असेही ते म्हणाले.

### सरन्यायाधीश गवई रुग्णालयात दाखल



**नवी दिल्ली :** भारताचे सरन्यायाधीश भुषण गवई यांना अलिकडेच हैदराबाद दौऱ्यात गंभीर संसर्ग झाल्याचे निदान झाले होते, त्यानंतर त्यांना दिल्लीतील रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते उपचारांना चांगला प्रतिसाद देत आहेत. एक-दोन दिवसात त्यांना रुग्णालयातून सुटी मिळेल होतील आणि पुन्हा ते कर्तव्यावर रुजू होतील, अशी माहीती अधिकृत सूत्राने दिली. सरन्यायाधीश भुषण गवई १२ जुलै रोजी नालसर कायदा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला संबोधित करण्यासाठी हैदराबादमध्ये होते. या दौऱ्यात त्यांना संसर्ग झाला होता. याचे स्वरुप गंभीर असल्याने दिल्लीत परतल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

### ओमर अब्दुल्ला पोहोचले स्मशानभूमीत!



**नवहट्टा (श्रीनगर) :** जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी शहीद दिनाच्या दिवशी प्रशासनाच्या बंदीचा निषेध करत नवहट्टा येथील १३ जुलै १९३१ चे शहीद स्मशानभूमीत जबरदस्त आंदोलन केले. प्रशासनाने प्रवेशद्वार बंद केल्यामुळे त्यांनी स्वतः भिंत चढून स्मशानभूमीत प्रवेश केला. १३ जुलै हा दिवस जम्मू-काश्मीरमध्ये ‘शहीद दिन’ म्हणून ओळखला जातो. १९३१ मध्ये डोगरा सैन्याकडून २२ निष्पाप नागरिकांची हत्या झाली होती. मात्र, २०२० पासून उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्या प्रशासनाने हा दिवस शासकीय सुटीच्या यादीतून वगळला आहे. यावर्षीही प्रशासनाने कोणतेही कार्यक्रम होऊ नयेत म्हणून नॅशनल कॉन्फरन्सच्या अनेक नेत्यांना घरात नजरकैदेत ठेवले.

## सर्वत्र धूर अन् ज्वाळा; जीवितहानी नाही

# हिसार-रायलसीमा एक्सप्रेसच्या डब्यांना लागली आग!

तिरुपती, दि. १४ वृत्तसंस्था

**तिरुपती रेल्वे स्टेशन यार्डमध्ये उभ्या असलेल्या हिसार एक्सप्रेस आणि रायलसीमा एक्सप्रेसच्या डब्यांना आग लागल्याचं समोर आले आहे. या डब्याना आग लागल्यानंतर रेल्वे कर्मचाऱ्यांनी त्वरित उर्वरित डबे वेगळे केले त्यामुळे पूर्ण नुकसान टळले आहे. या घटनेत कोणत्याही जीवितहानीचे वृत्त समोर आलेले नाही.**

राजस्थानहून आंध्र प्रदेशातील तिरुपतीला जाणाऱ्या हिसार एक्सप्रेसच्या (ट्रेन क्रमांक ०४७१७) एका डब्यात सकाळी आग लागली. ही ट्रेन स्टेशनच्या लूप लाइनवर उभी होती, तेव्हा एका जनरल डब्यातून धूर आणि ज्वाळा बाहेर येत असल्याचे रेल्वे कर्मचाऱ्यांनी पाहिले. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले. रेल्वे कर्मचाऱ्यांनी त्वरित वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचित केले आणि अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. रासायनिक पावडरच्या साहाय्याने आग आटोक्यात आणण्यात यश मिळाले. सुदैवाने, घटनास्थळी कोणतेही प्रवासी नव्हते, त्यामुळे जीवितहानी टळली. रेल्वे आणि स्थानिक पोलिसांनी या आगीच्या कारणाचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. प्राथमिक अंदाजानुसार, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बाधित डबे तातडीने (पान २ वर)



### रायलसीमा एक्सप्रेसलाही आगीचा फटका

» आग हिसार एक्सप्रेसच्या एका डब्यातून जवळच्या रायलसीमा एक्सप्रेसच्या इंजिन आणि डब्यांपर्यंत पसरली. रेल्वे यार्डमध्ये उभ्या असलेल्या या दोन्ही ट्रेनमधील प्रत्येकी दोन डबे आगीच्या भक्ष्यस्थानी आले. रेल्वे कर्मचाऱ्यांनी तातडीने बाधित डबे वेगळे करून आग पसरण्यापासून रोखली. यामुळे पुढील नुकसान टळले.

### रेल्वेच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

» तिरुपतीतील या अपघातामुळे रेल्वेच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दोन दिवसातील ही दुसरी घटना आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी, रविवारी (१३ जुलै २०२५), चेन्नई-अरक्कोनम मार्गावर तिरुवल्लरजवळ कच्च्या तेलाच्या टँकर मालगाडीला आग लागली होती, ज्यामुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यानंतर आज डब्यांना आग लागल्याने रेल्वेच्या प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रेल्वेला ही आग का लागली याच्या कारणाचा शोध घेतला जाणार आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी पोलिस घटनास्थळी पोहोचले आहेत. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ही आग पसरू नये म्हणून बाधित डबे ट्रेनपासून वेगळे करण्यात आले त्यामुळे मोठा अपघात टळला.

### वंदे भारत ट्रेन वेळीच थांबवली

» आगीच्या घटनेदरम्यान, जवळच्या समांतर रुळावरून जाणारी वंदे भारत ट्रेन वेळीच थांबवण्यात आली. रेल्वे अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले. अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या आणि दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात आले.

## सर्व विमानांच्या इंजिन इंधन स्विचची तपासणी अनिवार्य

नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) एक मोठा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. भारतातील नोंदणीकृत सर्व विमानांच्या इंजिन इंधन स्विचची तपासणी अनिवार्य करण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

अहमदाबादमध्ये १२ जून रोजी एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाल्याची घटना घडली होती. या घटनेत २६० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर तब्बल एका महिन्यांनी या अपघातासंदर्भात भारताच्या विमान अपघात तपास ब्युरोचा (विमान दुर्घटनांशी संबंधित तपास करणारी संस्था) अपघाताच्या कारणांबाबतचा एका अहवाल समोर



आला. या अहवालात एएआयबीने म्हटलं की, १२ जून रोजी अपघात झालेल्या एअर इंडियाच्या विमानातील इंधन नियंत्रण स्विच बंद झालं होतं. मात्र, या अहवालानंतर अनेकांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया आल्या. या अहवालात विमानातील वैमानिकांचा संवादही समोर आला होता. त्यामध्ये एका वैमानिकाने दुसऱ्या वैमानिकाला विचारलं की, तू इंधन पुरवठा का बंद केलास? तर दुसऱ्या वैमानिकाचे उत्तर होते की, मी काहीही केलेलं नाही. असा संवाद या अहवालातून समोर आला. दरम्यान, या अहवालानंतर केंद्र सरकारने स्पष्टीकरण देत अद्याप कोणत्याही निष्कर्षापर्यंत न पोहोचण्याचं आवाहन केलं होतं. वृत्तानुसार, डीजीसीएने सर्व एअरलाइन्सना २१ जुलै २०२५ पर्यंत इंजिन इंधन स्विचची तपासणी पूर्ण करण्याचे निर्देश दिल्याचं वृत्तात म्हटलं आहे. मात्र, डीजीसीएचा हा आदेश विशेषतः बोईंग कंपनीच्या विमान मॉडेल्सशी संबंधित असणार आहे. ज्यामध्ये ७३७ आणि ७८७ ड्रीमलायनर (७८७-८/९/१०) या मालिकेचा समावेश आहे. दरम्यान, अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या ड्रीमलायनर या विमानाच्या अपघाताबाबतचा एएआयबीचा अहवाल समोर आल्यानंतर डीजीसीएने आता हे पाऊल उचललं आहे. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितलं की, या अपघाताच्या घटनेचा समोर आलेला अहवाल हा केवळ प्राथमिक आहे.

## पालिका निवडणुकीआधीच शिवसेना पक्ष, चिन्हाचा निकाल!

### ऑगस्ट महिन्यात अंतिम सुनावणी घेणार

नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था

मागील काही वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात रखडलेल्या शिवसेना पक्ष, चिन्हाच्या याचिकेवर सोमवारी सुनावणी पार पडली. यादरम्यान न्यायालयाने ऑगस्ट महिन्यात अंतिम सुनावणी घेणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच हा मुद्दा बराच काळ प्रलंबित आहे आणि अनिश्चितता चालू ठेवता येणार नसल्याचे नमूद केले. यामुळे या प्रकरणाचा निकाल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी लागण्याची शक्यता वाढली आहे.

ही सुनावणी न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर आज पार पडली. यावेळी शिंदे गटाकडून मुकूल रोहतगी आणि नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. तर ठाकरे गटाकडून रोहित शर्मा आणि कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्हे वापरण्यापासून एकनाथ शिंदे यांना रोखावे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर ठाकरेंनी ही मागणी केली आहे. याचिकेवर लवकर सुनावणी घेण्याची मागणी ठाकरेंच्या वकिलांनी २ जुलैला खंडपीठासमोर केली होती. त्यावर आज युक्तीवाद होण्याची शक्यता होती. मात्र, न्यायाधीश सूर्यकांत यांनी ऑगस्ट महिन्यांत हे प्रकरणावर सुनावणी घेण्याचे स्पष्ट केले. (पान २ वर)



### उद्धव ठाकरे यांना तात्पुरता दिलासा

» सुप्रीम कोर्टाकडून ऑगस्ट महिन्यात या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्याचे संकेत दिल्याने उद्धव ठाकरे यांना सध्यातरी तात्पुरता दिलासा मिळाला आहे. निवडणुकीआधी संपूर्ण प्रकरणाचा निकाल लागू शकतो. दरम्यान, निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या २०२२ मधील बंडानंतर फेब्रुवारी २०२३ मध्येच शिंदे यांच्या गटाला शिवसेना आणि धनुष्यबाण हे चिन्ह बहाल केले होते. त्याला ठाकरेंनी सुप्रीम कोर्टात आव्हान दिले असून अजूनही त्यावर निकाल आलेला नाही.

## मोदींच्या मंत्रिमंडळात लवकरच होणार मोठे फेरबदल!

नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था

९ जून २०२४ रोजी नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. त्यानंतर मोदींच्या मंत्रिमंडळात कोणाकोणाला संधी मिळेल याची उत्सुकता सगळ्यांना होती. त्यावेळी भाजपाने धक्कातंत्राचा वापर करीत जुन्या नेत्यांना डावलून नवीन चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी दिली. आता मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाला एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळात पुन्हा एकदा फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाच्या निवडीसाठी पक्षात सुरू असलेल्या संघटनात्मक हालचाली, तसेच सोमवारी करण्यात आलेल्या तिन्ही नव्या राज्यपालांच्या नियुक्त्या हे सर्व मंत्रिमंडळातील फेरबदलाच्या तयारीचा भाग असल्याचं वृत्त ‘दी इंडियन एक्स्प्रेस’ने दिलं आहे.



नुकतीच केंद्र सरकारने हरियाणा व गोवा या दोन राज्यातील नवीन राज्यपालांची नियुक्ती केली. त्याशिवाय लडाखसाठी उपराज्यपालांची नेमणूकही करण्यात आली. या नियुक्त्यांच्या एक दिवस आधी केंद्र सरकारने राज्यसभेसाठी चार नामनिर्देशित खासदारांची नियुक्ती केली होती. ज्यामध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम, (पान २ वर)

## शुभांशू शुक्ला आणि टीम परतीच्या मार्गावर!

### ड्रॅगन कॅप्सूल अंतराळ स्थानकापासून वेगळे झाले

नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था

ॲक्सिओम ४ ची मोहीम आता शेवटच्या टप्प्यात आली आहे, भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला आणि त्यांचे तीन सहकारी आज आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामधून विलग होत पृथ्वीवर परतण्याच्या प्रवासाला लागले आहेत. त्यानुक्रमे शुभांशू शुक्ला आणि त्यांची टीम १५ जुलै रोजी पृथ्वीवर परततील, त्यांच्यासोबत ते ६० हून अधिक प्रयोगांमधील डेटा घेऊन येत आहेत. ही मोहीम केवळ एक वैज्ञानिक कामगिरी नाही तर भारताच्या अंतराळ क्षेत्रातील एक नवीन अध्याय देखील आहे.

१४ जुलै २०२५ रोजी दुपारी ४:४५ वाजता, स्पेसएक्सचे ड्रॅगन




अंतराळयान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या (आयएसएस) हार्मनी मॉड्यूलपासून वेगळे झाले. आता ते हळूहळू स्टेशनपासून दूर जात आहे. चारही अंतराळवीरांना पृथ्वीवर घेऊन येणारे हे अंतराळयान आता एका कक्षेत प्रवेश करत असून त्या साहाय्याने ते क्रूला सुरक्षितपणे पृथ्वीवर परत आणेल. अंदाजे १५ जुलै २०२५ रोजी कॅलिफोर्निया किनाऱ्याजवळ हे यान पृथ्वीवर परतेल. अंतराळवीरांचा परतीचा प्रवास सुरक्षित आहे याची खात्री करण्यासाठी नासा आणि स्पेसएक्स टीम या प्रक्रियेवर (पान २ वर)

## बाल गुन्हेगारांच्या कायदेशीर संज्ञेत बदल होणार!

### वय १६ ऐवजी १४ करणार : मुख्यमंत्री

मुंबई, दि. १४ वृत्तसंस्था

अमली पदार्थ तस्करी आणि बाल गुन्हेगारी विरोधात कठोर पावले उचलण्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. बाल गुन्हेगारांच्या कायदेशीर संज्ञेतील वयोमर्यादा १६ वरून १४ पर्यंत कमी करण्याबाबत अभ्यास सुरू असल्याचे त्यांनी सोमवारी विधानसभेत स्पष्ट केले. तसेच, अमली पदार्थ तस्करीच्या प्रकरणांमध्ये मकोका कायद्याचा वापर अधिक प्रभावीपणे करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवसेनेचे आमदार विलास संदिपान भुमरे यांनी छत्रपती



संभाजीनगरमधील ड्रग्ज रॅकेटचा मुद्दा उपस्थित करत आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाईची मागणी करणारी लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. संभाजीनगर ड्रग्जचे हब बनले असून, अनेक भागात खुलेआम ड्रग्जची विक्री होत असल्याचे त्यांनी सांगितले. एका पीडित मुलीच्या आईने दामिनी पथकाकडे आपल्या मुलीला ड्रग्जच्या (पान २ वर)

# राज्यसभेत ७३ खासदार होणार निवृत्त!

## खर्गेसह महाराष्ट्रातील ७ जणांचा समावेश

नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था

राज्यसभेच्या २४५ जागांपैकी ७३ जागांची निवडणूक पुढील वर्षी एप्रिल, जून आणि नोव्हेंबर या महिन्यांत होणार आहे. यात महाराष्ट्रातील ७ बड्या नेत्यांचा राज्यसभेचा कार्यकाळ संपत आहे.

संसदेच्या वरिष्ठ सभागृहामध्ये म्हणजेच राज्यसभेसाठी राष्ट्रपतींनी ४ प्रतिष्ठित व्यक्तींची नावे नामनिर्देशित केली आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ विधिज्ञ आणि विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांचा समावेश आहे. निवृत्त होणा-या सदस्यांमध्ये केंद्रीय मंत्र्यांसह अनेक दिग्गज नेत्यांची नावे आहेत. त्यातील सर्वाधिक मोठे नाव म्हणजे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे.



### महाराष्ट्रातून कोण?

» महाराष्ट्रातील एकूण ७ सदस्यांचा २ एप्रिलला कार्यकाळ संपत आहे. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार. त्यांच्यासोबत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड यांचाही समावेश आहे. तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, काँग्रेसच्या खासदार रजनी पाटील, भाजपचे खासदार धैर्यशील पाटील आणि शरद पवारांच्या पक्षाच्या खासदार फौजिया खान याही एकाच दिवशी निवृत्त होत आहेत.

त्यांचा कार्यकाळ २५ जून २०२६ रोजी संपत आहे. त्याचप्रमाणे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा हेही त्यांच्यासोबतच निवृत्त होणार आहेत. मोदी सरकारमधील मंत्री हरदीप सिंह पुरी आणि बी. एल. वर्मा हे २५ नोव्हेंबरला निवृत्त होतील. यूपीतील आणखी आठ सदस्यांचा कार्यकाळही तेव्हाच संपणार आहे. तसेच केंद्रीय मंत्री रवनीत सिंग बिट्टू आणि जॉर्ज कुरियन यांचाही कार्यकाळ पुढील वर्षीच संपत आहे. काँग्रेसमधील आणखी एक मोठे नाव म्हणजे दिग्विजय सिंहही निवृत्त होणार आहेत. झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन, गुजरातमधील काँग्रेसचे मातब्बर नेते शक्तीसिंह गोहिल, तेलंगणातून काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी, (पान २ वर)

## पत्नीचा कॉल रेकॉर्ड करणे न्यायालयाने ठरवले वैध!

### पंजाब - हरियाणा उच्च न्यायालयाचा निकाल रद्द

नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था

पत्नीच्या परवानगीशिवाय फोनवरील संभाषण रेकॉर्ड करणे हे गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे आणि ते कुटुंब न्यायालयात पुरावा म्हणून सादर केले जाऊ शकत नाही असा निर्णय एका प्रकरणात पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिला होता. मात्र आज सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत वरिष्ठ न्यायालयाने उच्च न्यायालयाचा हा निर्णय रद्द केला.

‘लाइव्ह अँड लॉ’च्या बातमीनुसार, न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की घटस्फोटाच्या कार्यवाहीत पती-पत्नीमधील गुप्तपणे रेकॉर्ड केलेले फोन संभाषण पुरावा म्हणून वापरले जाऊ शकते. भारतीय पुरावा कायद्याच्या कलम १२२ नुसार पती-पत्नीमधील संभाषणे संमतीशिवाय उघड करण्यास प्रतिबंधित केले आहे, परंतु त्याला एक अपवाद देखील आहे. हा अपवाद अशा प्रकरणांमध्ये लागू होतो जिथे पती-पत्नीमध्ये कायदेशीर कार्यवाही सुरू आहे किंवा एक पक्ष दुसऱ्या पक्षाविरुद्ध गुन्ह्याच्या प्रकरणात खटला लढत आहे. (पान २ वर)




» पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने पत्नीच्या बाजूने निकाल दिला आणि कौटुंबिक न्यायालयाचा आदेश रद्द केला. उच्च न्यायालयाने म्हटले की फोन संभाषणातील परिस्थिती आणि उत्तरे योग्यरित्या समजू शकत नाहीत. असेही म्हटले आहे की पती-पत्नी आपापसात उघडपणे बोलतात आणि त्यांचे शब्द न्यायालयात चौकशीचा विषय बनू शकतात याचा विचार ते करत नाहीत. परंतु सर्वोच्च न्यायालयाने आता उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करत पतीच्या बाजूने निकाल दिला आहे.

पान 1 वरून...

### हिसार-रायलसीमा एक्सप्रेसच्या ...

ट्रेनपासून वेगळे करण्यात आल्याने आग पसरण्यापासून रोखण्यात यश मिळाले. रेल्वे अधिकाऱ्यांनी या घटनेची सखोल चौकशी सुरू केली असून, लवकरच याबाबत अधिकृत माहिती जाहीर केली जाईल. या घटनेमुळे तिरुपती रेल्वे स्टेशनवरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली, परंतु आता परिस्थिती नियंत्रणात आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना ज्वलनशील पदार्थ ट्रेनमध्ये नेण्यास मनाई करत सुरक्षित प्रवासासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

### पालिका निवडणुकीआधीच शिवसेना ...

मात्र, अद्याप त्यांनी तारीख निश्चित केलेली नाही. आजच्या सुनावणीदरम्यान त्यांनी ही केस आपल्याला संपवायची आहे, असे विधान केले आहे. स्थानिक निवडणुकांआधी अंतरिम निकाल देण्याची मागणी ठाकरेंनी याचिकेत केली आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या वकिलांकडून यापूर्वी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका याच नावावर आणि चिन्हावर लढवल्या गेल्या आहेत, असा युक्तीवाद केला आहे. सुप्रीम कोर्टाने आधीही याबाबतची ठाकरेंची याचिका फेटाळली आहे, असेही वकिलांकडून निदर्शनास आणून दिले जात आहे. त्यामुळे आता ऑगस्ट महिन्यांत कुणाला दिलासा मिळणार, शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाला मिळणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

### शुभांशू शुक्ला आणि टीम परतीच्या मार्गावर!

बारकाईने लक्ष ठेवून आहेत. ॲक्सिओम स्पेस त्यांच्या वेबसाइटवर ड्रॅगनच्या पदार्पणाचे आणि पाण्यात लँड होण्याचे प्रसारण करत राहणार आहे. या एकंदरीत मोहिमेचा प्रवास आणि प्रयोग ॲक्सिओम मिशन ४ ची सुरुवात २५ जून २०२५ रोजी झाली. ड्रॅगन अंतराळयान फ्लोरिडाच्या केनेडी स्पेस सेंटर येथून फाल्कन ९ रॉकेटने अवकाशात झेपावले. त्यानंतर ते २६ जून रोजी आयएसएसशी जोडले गेले. यानंतर शुभांशू शुक्ला आणि त्यांच्या टीमने आयएसएसवर सुमारे १८ दिवस घालवले. एक्सिऑम-४ मिशन अंतर्गत शुभांशु शुक्ला यांनी २५ जून २०२५ रोजी अमेरिकेतील फ्लोरिडा येथून कमांडर पेगी व्हिटसन, मिशन स्पेशालिस्ट स्लावोश उझनान्स्की-विश्निव्स्की आणि टीबोर कापू यांच्यासह अंतराळयानातून उड्डाण केले आणि २६ जून रोजी आयएसएसवर पोहोचले. १८ दिवसांच्या या प्रवासात त्यांनी अनेक वैज्ञानिक प्रयोग केले. रविवारी आयएसएसवर झालेल्या अनौपचारिक निरोप समारंभात शुभांशु आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक्सपेडिशन ७३ च्या सात सदस्यांसोबत निरोपाचा आनंद साजरा केला.

### बाल गुन्हेगारांच्या कायदेशीर ...

विळख्यातून बाहेर काढण्याची विनवणी केल्याचे उदाहरणही त्यांनी दिले. वाळूज पोलीस ठाण्यात ड्रग्ज प्रकरणी अटक केलेल्याला नॉनव्हेज पार्टी दिल्याच्या घटनेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या लक्षवेधी सूचनेवर आ. वरुण सरदेसाई यांनी उपप्रश्न उपस्थित करत, अज्ञान बालकांकडून होणाऱ्या अमलीपदार्थ तस्करीचा मुद्दा मांडला. त्यांच्यावर कारवाईसाठी कायद्यात काही बदल केले जातील का, अशी विचारणा त्यांनी केली. तसेच, आंतरराष्ट्रीय गुन्हेगार आणि बेहरामपाडा भागात मुस्लीम वस्तीत पोलीस कारवाईसाठी जात नाहीत, त्यांच्यावर कारवाई करणार का, असाही प्रश्न त्यांनी विचारला. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अज्ञान बालकांना ड्रग्ज तस्करीसाठी वापरले जात असल्याचे मान्य केले. ते म्हणाले की, बलात्काराच्या प्रकरणांमध्ये केलेल्या बदलांप्रमाणे, ड्रग्ज पेडलिंगमध्ये सहभागी असलेल्या बालकांच्या वयोमर्यादेत बदल करता येईल का, याचा अभ्यास सुरू आहे. अज्ञान बालकांना पकडून त्यांच्यामार्फत हे गुन्हे चालतात, त्यामुळे गुन्ह्याचे स्वरूप पाहून आवश्यक ते बदल केले जातील. मुंबईतील बेहरामपाडा भागात ड्रग्ज व्यावसायिकांवर धडक कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### राज्यसभेत ७३ खासदार निवृत्त!

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह, तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले, लोकसभेचे माजी उपसभापती थंबी दुराई, तिरुची शिवा आदी नेतेही निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहे. राष्ट्रपती नामनिर्देशित कोट्यातूनही एक महत्वाचे सदस्य निवृत्त होत आहेत. माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचा कार्यकाळ मार्च महिन्यात संपत आहे.

### पत्नीचा कॉल रेकॉर्ड करणे ...

न्यायालयाने पुढे म्हटले की, या प्रकरणात गोपनीयतेचे कोणतेही उल्लंघन झाले आहे असे आम्हाला वाटत नाही. कलम १२२ गोपनीयतेच्या अधिकाराला मान्यता देत नाही. उलट, ते पती-पत्नीमधील गोपनीयतेच्या अधिकाराला अपवाद करते. ते निष्पक्ष सुनावणीचा, संबंधित पुरावे सादर करण्याचा आणि स्वतःचा खटला सिद्ध करण्याचा अधिकार ओळखते, जेणेकरून पक्षकाराला दिलासा मिळू शकेल. हे प्रकरण घटस्फोटाच्या कारवाईबद्दल आहे. पतीने पत्नीवर क्रूरतेचा आरोप केला आणि रेकॉर्ड केलेले फोन संभाषण पुरावा म्हणून भटिंडा येथील न्यायालयात सादर केले. कुटुंब न्यायालयाने या रेकॉर्डिंग्ज पुरावा म्हणून स्वीकारल्या. पत्नीने या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आणि असा युक्तिवाद केला की हे रेकॉर्डिंग तिच्या संमतीशिवाय केले गेले आहेत आणि ते तिच्या गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे.

### मोदींच्या मंत्रिमंडळात लवकरच ...

मीनाक्षी जैन, हर्षवर्धन श्रृंगला आणि के. सदानंदन मास्टर यांचा समावेश होता. हर्षवर्धन श्रृंगला हे माजी परराष्ट्र सचिव आहेत. तर, सदानंद मास्टर हे केरळमधील ज्येष्ठ समाजसेवक शिक्षण तज्ज्ञ आहेत. तर, मीनाझी जैन हा प्रसिद्ध इतिहासकार आहेत. भाजपामधील एका वरिष्ठ नेत्याने सांगितले की, मागील सरकारमधील महत्त्वाची खाती सांभाळणाऱ्या बहुतांश मंत्र्यांना मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात त्याच खात्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. आतापर्यंत भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा भर फक्त सलगतेवर होता, मात्र आता परराष्ट्र व्यवहार, व्यापार व वाणिज्य यांसारख्या नव्या मुद्द्यांना प्राधान्य देऊन मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या नव्या टॅरिफ धोरणामुळे ही गरज अधिक स्पष्ट झाली आहे. भाजपातील एका सूत्राने 'दी इंडियन एक्स्प्रेस'ला सांगितले की, अमेरिकेमधील भारताचे माजी राजदूत हर्षवर्धन श्रृंगला यांची राज्यसभेसाठी खासदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे मंत्रिमंडळातील काही जुन्या मंत्र्यांना मंत्रिपदापासून दूर करून भाजपातील संघटनात्मक जबाबदाऱ्या दिल्या जाण्याची शक्यता आहे. याशिवाय भाजपाकडून आपल्या मित्रपक्षांतील काही नेत्यांना मंत्रीपद देण्याच्या तयारीत आहे. ज्यामध्ये, शिवसेना एकनाथ शिंदे गट, अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, नितीश कुमार यांचा जनता दल युनायटेड पक्ष, चिराग पासवान यांचा लोक जनशक्ती पक्ष आणि तेलगू देशम पार्टीचा समावेश आहे. जनता दल युनायटेड व लोकजनशक्ती पार्टी हे बिहारमधील महत्वाचे पक्ष आहेत. यावर्षीच्या अखेरीस ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये तिथे विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यामुळे जागावाटपाचा मुद्दा सोडविण्यासाठी व मित्रपक्षांना खूश करण्यासाठी या दोन्ही पक्षांना प्रत्येकी एक मंत्रीपद दिलं जाण्याची शक्यता आहे. तर तेलगु देशम पार्टीच्या नेतृत्वात भाजपाला दक्षिण भारतातील एकमेव राज्यात सत्तास्थापन करण्यात यश मिळालं आहे. महाराष्ट्रातही अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व एकनाथ शिंदे यांची शिवसेना सत्तेतील भागीदार आहेत. त्यामुळे एनडीएमधील या घटक पक्षांतील नेत्यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता आहे. भाजपातील एका वरिष्ठ नेत्याने सांगितले की, मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात फेरबदल करण्याच्या सर्व हालचाली सुरू झाल्या आहेत. तसेच राज्यपालांच्या नियुक्त्या व भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीवरून बैठका सुरू आहेत. त्यामुळे सर्वात आधी कोणता निर्णय घेतला जाणार हेदेखील पाहावं लागणार आहे. जर मंत्रिमंडळातील फेरबदलाचा निर्णय आधी घेण्यात आला तर एनडीएमधील कोणत्या मित्रपक्षांना केंद्रात मंत्रीपद दिलं जाणार याकडेही अनेकांच्या नजरा आहेत. दरम्यान, भाजपाने आतापर्यंत ३७ पैकी निम्म्याहून अधिक राज्यांमधील प्रदेशाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराजांची दुर्गसंपदा महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा :मुख्यमंत्री

## मुख्यमंत्र्यांकडून विधानसभेत महाराष्ट्रातील जनतेचे अभिनंदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई, दि. १४ :** महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, स्वर्णदुर्ग, विजयदुर्ग, खान्देरी हे ११ किल्ले आणि तमिळनाडूतील जिंजी असे एकूण १२ किल्ले जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली ही दुर्ग संपदा ही महाराष्ट्राच्या शौर्याचा आणि सांस्कृतिक वारसा आहे. या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणे, ही संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन करताना काढले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भौगोलिक परिस्थितीचा उत्तम वापर करून किल्ले बांधणी, गनिमी काव्याला अनुकूल भूरचनेचा उत्तम वापर, वैशिष्ट्यपूर्ण दरवाजे, लष्करी रणनिती, गनिमी कावा याला पूरक ठरणारी डोंगरी किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली. पूर्वीच्या राजांनी किल्ले महसूल विषयक नियंत्रणासाठी बांधले. मात्र शिवाजी महाराजांनी याचा वापर लोक कल्याणार्थ निर्माण झालेल्या स्वराज्य बांधणीसाठी केला. हा विचार युनेस्कोने अद्वितीय वैश्विक मूल्य म्हणून मान्य केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ११ जुलै २०२५ रोजी युनेस्कोच्या सांस्कृतिक समितीच्या आंतराराष्ट्रीय बैठकीत एकमताने भारताने ही विजयश्री खेचून आणली आहे. जवळपास सगळ्या कमिटीपैकी, मतदानाचा अधिकार २० देशांना होता. या २० ही देशांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे हे किल्ले जागतिक वारसा स्थळ आहे, असे मतदान केले. त्यामुळे एकमताने, याठिकाणी हा प्रस्ताव मंजूर झाला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या अद्वितीय किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी हातभार लावावा, असेही त्यांनी सांगितले.

वारसा यादीत किल्ल्यांचा समावेश झाल्याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार आहे. त्यांच्याकडे देशातल्या वेगवेगळ्या भागातून ७ प्रस्ताव युनोस्कोमध्ये नामांकनासाठी गेले होते. त्यापैकी पंतप्रधानांनी निर्णय घेऊन छत्रपती शिवरायांचे किल्ले हेच जागतिक वारसा म्हणून नामांकन करायचे ठरविले. या संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले.

सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या पुरातत्त्व वास्तूसंग्रालयाचे, संचालनालयाचे संचालक यांनी हा प्रस्ताव तयार केला. संपूर्ण भारतातून भारतीय पुरातत्व सर्वेक्षणास ८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यामध्ये महाराष्ट्राच्या २ प्रस्तावांचा समावेश होता. त्यातील भारतातील मराठा लष्करी भूप्रदेश या प्रस्तावाची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावतीने निवड करण्यात आली. या नामांकनाच्या कार्यवाहीचा भाग म्हणून प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी करण्यासाठी द. कोरिया येथील श्री. कोगली यांनी महाराष्ट्र, तमिळनाडू राज्यातील किल्ल्यांना भेट दिली. यासंबंधी नवी दिल्ली येथे जुलै २०२४ मध्ये झालेल्या युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीचे ४६ व्या अधिवेशनातील चर्चासत्रात महाराष्ट्रातील तज्ज्ञांनी भाग घेतला. युनेस्को मुख्यालय, पॅरिस येथे या प्रस्तावाचे तांत्रिक सादरीकरण करण्यात आले. सर्व सदस्य देशांमध्ये मतदानाद्वारे यावर सदस्य देशांची मते आजमावण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर बैठका घेण्यात आल्या. विदेश मंत्रालय, युनेस्को, भारताचे राजदूत आणि अनेक देशांच्या राजदूतांशी थेट संपर्क साधून नामांकन झालेल्या किल्ल्याचे महत्त्वही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विषद केले.

ऐतिहासिक क्षणाबद्दल सभागृहामार्फत महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व व वस्तूसंग्रहलय व संचलनालय आणि या कार्यातील योगदान दिलेल्या सर्व मान्यवरांचे, महाराष्ट्रातील जनतेचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

## कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येणार- एकनाथ शिंदे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई, दि. १४ :** राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांच्यासमोरील कचरा व्यवस्थापनातील अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य विजय देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य अभिमन्यू पवार, अर्जुन खोतकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सोलापूर शहरातून दररोज संकलित होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे काम सोलापूर बायोएनर्जी कंपनी लिमिटेड यांच्याकडून करण्यात येत आहे. या ठिकाणी दररोज ३०० टन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प कार्यरत असून, ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस आणि खत निर्मिती केली जाते, तर सुका कचरा वेगळा करून तो प्रक्रिया उद्योगांकडे पाठविला जातो. नगरपालिका व महानगरपालिका मध्ये कचऱ्याचे योग्य वर्गीकरण होणे अत्यावश्यक आहे. लहान नगरपालिका व महानगरपालिका यांच्या याबाबत अडचणी सोडवण्यासाठी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना आधीच सूचना दिल्या आहेत. राज्य शासनाकडून अशा सर्व ठिकाणी आवश्यक ती मदत देण्यात येईल. महापालिकेतील आयत्या वेळी ठराव घेण्यासंबंधीची प्रक्रिया पारदर्शक राहावी यासाठी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना ठरावांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले जातील.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, सोलापूर शहरात घंटागाड्यांद्वारे घराघरातून कचरा संकलन केले जाते. मात्र, काही झोपडपट्टी वस्ती परिसरांमध्ये घंटागाड्या फिरवूनही कचरा साचतो, अशी समस्या आहे. सध्या सोलापूर शहरात जवळपास सात लाख टन कचरा डंप झालेला आहे.

## सचिन होले यांना पाणी पुरवठा योजनेची कामे नाहीत -राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### सचिन होले यांना दिलेल्या वर्ग-५ स्थापत्य प्रमाणपत्रप्रकरणी सखोल चौकशी व कार्यवाहीचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे निर्देश



**मुंबई, दि. १४ :**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या तत्कालीन कंत्राटदार नोंदणी नियमानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता करिता 'वर्ग-६ चे' नोंदणी प्रमाणपत्र देण्याची तरतूद आहे. सचिन होले यांनी 'वर्ग-५ स्थापत्य अभियंता' नोंदणी प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव दाखल केला होता. त्यानुसार त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, चंद्रपूर कार्यालयाकडून मंजुरी देण्यात आली. तथापि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागीय कार्यालय, वर्धा या कार्यालयाकडून सदर प्रमाणपत्रावर 'वर्ग-५ स्थापत्य सुशिक्षित बेरोजगार अभियंता' असे अनावधानाने टंकलिखित झाले आहे.

सचिन होले यांना सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. तसेच या प्रमाणपत्राच्या आधारे त्यांना चंद्रपूर क्षेत्रात कुठलेही कंत्राट देण्यात आलेले नाही, असे पाणी पुरवठा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानपरिषदेत सांगितले.

या प्रकरणी सखोल चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी, असे निर्देश सभापती प्रा. राम शिंदे यांनी यावेळी दिले.

सचिन होले यांना दिलेले प्रमाणपत्र आणि त्यांना दिलेली कामे याबाबत सदस्य दादाराव केचे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. तर सदस्य प्रवीण दरेकर यांनी या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सहभाग घेतला.

## पुणे महापालिकेतील वाढीव दराच्या घनकचरा निविदा रद्द -माधुरी मिसाळ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई, दि. १४ :** पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित निविदा प्रक्रिया ५ ते ७ टक्के जास्त दराने झाल्याचे आढळून आल्याने ती संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य भीमराव तापकीर यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, शासनाने महानगरपालिकेला या निविदा प्रक्रियेची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने या निविदा रद्द केली. या निविदा प्रक्रियेमुळे महानगरपालिकेला कोणतेही थेट आर्थिक नुकसान झालेले नाही. मात्र, निविदा प्रक्रियेदरम्यान झालेला प्रशासकीय खर्च कोणाकडून वसूल करायचा याबाबत महापालिकेला निर्देश दिले जातील. तसेच सदस्यांना विशिष्ट निविदांबाबत काही शंका असल्यास किंवा कुठल्या निविदांची सखोल चौकशी आवश्यक आहे असे वाटत असल्यास त्यांनी संबंधित माहिती देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. संबंधित प्रकरणांमध्ये चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## देयके अदा केल्याने १०२ क्रमांक रुग्णवाहिकांची सेवा सुरळीत-प्रकाश आबिटकर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई, दि. १४ :** राज्यात आरोग्य सेवेसाठी १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका सेवा उपलब्ध आहे. या सेवेची सर्व देयके आणि चालकांचे वेतन अदा केल्याने ही सेवा सुरळीत सुरू असल्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य शिवाजीराव गर्जे यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य सर्वश्री सदाशिव खोत, अमोल मिटकरी, प्रवीण दरेकर यांनी सहभाग घेतला.

आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले, १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जातो. जानेवारी २०२५ या महिन्यातील केंद्र सरकारचा निधी उशिरा उपलब्ध झाल्याने काही काळासाठी देयके आणि वेतनाची रक्कम प्रलंबित राहिली होती.

तथापि केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध झाला असून सर्व देयके आणि वेतन अदा करण्यात आले असल्याने ही सेवा सुरळीत सुरू आहे. भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्यात येतील तसेच अशी परिस्थिती निर्माण झाल्यास राज्य शासनाच्या निधीतून ही गरज भागविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

महिलांमधील कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन ९ ते १४ वयोगटातील महिलांसाठी उपाययोजना करण्याची केंद्र आणि राज्य शासनाची योजना आहे. तथापि, जागतिक आरोग्य संघटनेने अद्याप यासाठी मान्यता दिलेली नसल्याने त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत असल्याचे आरोग्य मंत्री आबिटकर यांनी एका उपप्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

## पुण्याच्या कुसगाव येथे ५७ टन गोवंशीय मांस सापडल्याप्रकरणी एसआयटी स्थापन करणार- डॉ.पंकज भोयर

**मुंबई, दि. १४ :** पुण्याच्या मौजे कुसगाव येथे २५ मार्च २०२५ रोजी सुमारे ५७००० किलो गोवंशीय मांस दोन मोठ्या कंटेनरमध्ये वाहतूक करताना आढळून आले. इतक्या मोठ्या प्रमाणात गोवंशीय मांस सापडल्याने या संपूर्ण प्रकरणाची विशेष चौकशी पथकामार्फत तपास करण्यात येईल, अशी माहिती गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी विधान परिषदेत दिली.

सदस्य श्रीकांत भारतीय, ॲड.अनिल परब यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली. त्यावर गृहराज्यमंत्री डॉ.भोयर यांनी उत्तर दिले.

राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले की, प्राथमिक तपासात एशियन फूड्स मायक्रो प्रा. लि. या कंपनीचा या वाहतुकीत सहभाग असल्याचे उघड झाले आहे. ही कंपनी हैदराबाद येथील असल्याने राज्य शासनाकडून या कंपनीचे अपेडाद्वारे प्राप्त परवाना रद्द करण्यासाठी केंद्र शासनाकडे विनंती करण्यात आली असल्याचे गृह राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी सांगितले.

या प्रकरणी कंपनीचे दोन मालक आरोपी आहेत. यातील एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला न्यायालयीन जामीन मिळाला आहे.

# मदत आणि पुनर्वसन कार्य तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश -गिरीश महाजन

## विदर्भातील पूरस्थितीचा आढावा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई, दि. १४ :** विदर्भातील नागपूर व अमरावती विभागात ८ व ९ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे मोठे नुकसानीचा आढावा घेत संबंधित प्रशासनाला मदत व पुनर्वसन कार्य तत्काळ व प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या नैसर्गिक आपत्तीत जिवीत व वित्तीय नुकसान मोठ्या प्रमाणावर झाल्याने राज्य शासनाने तातडीने उपाययोजना राबविल्या आहेत. बाधित नागरिकांना मदतीचा लाभ वेळेत व पारदर्शक पद्धतीने मिळावा यासाठी सर्व यंत्रणांना सतर्क ठेवण्यात आले असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी निवेदनाद्वारे विधानसभेत दिली.

अमरावती विभागात देखील अतिवृष्टीचा परिणाम दिसून आला. एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून एक व्यक्ती जखमी झाला आहे. १८० घरांचे अंशतः नुकसान तर ९ घरे पूर्णतः पडली आहेत. ४ जनावरे दगावली असून ३ हजार ४११ हेक्टर शेती क्षेत्राचे नुकसान झाले आहे. संबंधित जिल्ह्यांमध्ये पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे.

मंत्री महाजन म्हणाले, दिनांक ३० मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार, घरांची पडझड झालेल्या नागरिकांना मदतनिधी जिल्हा स्तरावर वितरित करण्यात आला आहे. दिनांक २८ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार, घरगुती भांडी, कपडे, टपरीधारक व दुकानदार यांना दिली जाणारी मदत वितरित करण्यास मंजूर मुदतीस वाढ देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांना उणे (-) प्राधिकरणाचे अधिकार प्रदान करण्यात आले असून, आपत्तीमधील मदत वाटपाबाबत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना देण्यात आले आहेत.

नागपूर विभागातील पूरस्थिती आणि नुकसान

नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली. ७ नागरिकांचा मृत्यू, ४ जखमी, १७ मोठी व १० लहान जनावरे मृत्युमुखी पडली. १,९२७ घरांचे अंशतः नुकसान तर ४० घरे पूर्णतः उद्ध्वस्त झाली आहेत. २०९ गोठ्यांचे नुकसान झाले असून ७१५ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. २० हजार ८५४ हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसान झाले असून बाधित शेतकरी संख्या २९ हजार ९२० आहे. या ठिकाणी पंचनाम्याचे कार्य सुरू आहे.

## थोडक्यात

### आर्थर रोड जेलमध्ये दोन गटांत हाणामारी

**मुंबई :** आर्थर रोड जेलमध्ये दोन गटांत तुफान हाणामारी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या हाणामारीत कोणीही जखमी झाले नसले, तरी जेलमध्ये प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.हाणामारी प्रकरणी सात जणांविरुद्ध ना. म. जोशी मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यात प्रसाद ऊर्फ सुभाष विठ्ठल पुजारीसह इरफान रहिम खान, शोएब खान ऊर्फ भुरया, अयुब अनुमुद्दीन शेख, मुकेश सिताराम निशाद, लोकेंद्र उदयसिंग रावत, सिद्धेश संतोष भोसले यांचा समावेश आहे.मुंबईतील आर्थर रोड जेलमध्ये विविध टोळ्यांचे गुंड सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. ७ जुलैला जेलमध्ये दोन गटांत क्षुल्लक कारणावरून अचानक हाणामारी झाली. हा प्रकार जेल प्रशासनाच्या निदर्शनास येताच त्यांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली. या दोन्ही गटांना वेळीच बाजूला करण्यात आले. त्यामुळे प्रकरण अधिक चिघळले नाही. हाणामारीत कोणीही जखमी झाले नाही. मात्र हाणामारीची सुरुवात कशी झाली आणि कोणी केली याचा खुलासा अद्याप होऊ शकलेला नाही.या घटनेनंतर जेल प्रशासनाकडून ही माहिती ना. म. जोशी मार्ग पोलिसांना देण्यात आली. याबाबत तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी प्रसाद पुजारीसह सातजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा सध्या पोलिसांकडून तपास सुरु आहे. प्रसाद पुजारी हा अंडरवर्ल्ड गँगस्टर असून त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

### तरुणीला जबरदस्ती देह व्यापारात ढकलले

**पुणे :** बांगलादेशमधून कामाच्या निमित्ताने भारतात आणलेल्या एका अल्पवयीन मुलीला पुण्यातील बुधावर पेठेत जबरदस्तीने वेश्या व्यवसायात ढकलण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तिला ब्युटी पार्लरमध्ये काम मिळवून देण्याचे आमिष दाखविले होते. मात्र, नंतर दलाल व्यक्तींनी तिला बुधवार पेठेतील कुंटणखान्यात ठेवले. तसेच, वेश्याव्यवसायासाठी जबरदस्तीही केली. नकार दिल्यानंतर या तरुणीला पट्ट्याने मारहाण करण्यात आली. एका सामाजिक संस्थेने हा प्रकार समोर आणत पोलिसांच्या मदतीने तरुणीची सुटका केली आहे.याप्रकरणी अभिषेक प्रकाश संथेबेन्नूर (वय २२, कर्नाटक) व तमन्ना मुख्तार शेख (रा. बांगलादेश) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. तर रकीब खान फरार असून, याप्रकरणी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा (पीटा), बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण प्रतिबंध कायदा (पोक्सो), पारपत्र अधिनियमातंर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित मुलगी १७ वर्षीय असून, तिची व आरोपी तमन्नाची ओळख आहे. तिने तिला भारतात नोकरी लावण्याचे आमिष दाखविले. तेथून तिला बेंगलोरमध्ये आणले. पण, त्याठिकाणी तिच्याकडून जबरदस्तीने वेश्या व्यावसाय करून घेण्यात आला. नंतर तिला पुण्यात ब्युटी पार्लरमध्ये काम मिळवून देण्याचे आमिष दाखविले. पुण्यात आल्यानंतर मात्र आरोपींनी तिला वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. तिला बुधवार पेठेत देखील नेले. पण, तिने नकार दिला. तेव्हा तमन्ना आणि अभिषेकने तरुणीला सहकारनगर भागातील एका खोलीत डांबून ठेवले. वेश्याव्यवसाय करण्यासाठी धमकाविले. तिने नकार दिल्यानंत तिला पट्ट्याने मारहाण केली.

### इराणच्या राष्ट्राध्यक्षांना मारण्याचा इस्रायलने केला होता प्रयत्न?

**तेहरान :** गेल्या महिन्यात इस्रायल आणि इराणमध्ये तीव्र संघर्ष झाला. १३ जून रोजी सुरु झालेले हे युद्ध जवळपास १२ दिवस चालले. या युद्धादरम्यान दोन्ही देशांनी एकमेकांवर क्षेपणास्त्रे, बॉम्ब हल्ले केले. दोन्ही देश एकामागून एक हल्ले करत होते. दरम्यान या युद्धात इस्रायलने इराणच्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना ठार केले. याच संबंधी आणखी एका मोठ्या धक्कादायक माहितीचा खुलासा करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १६ जून रोजी इस्रायलने इराणवर हल्ला केला होता, ज्यामध्ये इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियान जखमी झाले होते. इराणी वृत्तसंस्था फार्सने दिलेल्या माहितीनुसार, इस्रायलने तेहरानच्या पश्चिम भागा एक इरामरतीव हल्ला केला होता. इस्रायलने ६ क्षेपणास्त्रे डागली होती. यावेळी इमारतीमध्ये देशाच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा मंत्रिमंडळांची बैठक सुरु होती. या बैठकीत इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान देखील सामील होते.तसेच अनेक विरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश होता. दरम्यान या हल्ल्यात इराणचे अध्यक्ष थोडक्यात बचावले होते.इराणी वृत्त संस्था फार्सने दावा केला आहे की, नसरल्लाह यांच्याप्रमाणे इस्रायल राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांना मारु इच्छित आहे. १ ऑक्टोबर २०२४ रोजी इस्रायलने बेरुमध्ये नसरल्लाहच्या गुप्त बंकरवर हल्ला केला होता. यावेळी हिजबुल्लहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक सुरु होती.

# केरळमध्ये निपाहचा आणखी एक बळी

## ६ जिल्ह्यांत हाय अलर्ट

**नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था**

केरळमधील पलक्कड जिल्ह्यातील संशयित निपाह बाधित रुग्णाचा आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. राज्य सरकारने संपूर्ण जिल्ह्यात सर्वेक्षण मोहीम तीव्र केली आहे. तसेच सहा जिल्ह्यांमध्ये हाय अलर्ट जारी केला आहे. दरम्यान, जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, निपाह विषाणू हा एक झुनोटिक आजार आहे, जो प्राण्यांकडून माणसात पसरतो. तसेच, दूषित अन्न किंवा थेट मानवी संपर्कातूनही त्याचा प्रसार होऊ शकतो.पलक्कड जिल्ह्यातील निपाह विषाणूच्या संसर्गाचा झाल्याचा संशय असलेल्या ५७ वर्षीय पुरुषांवर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांचे नमुने मंचेरी वैद्यकीय महाविद्यालयात तपासण्यात आले. त्याला निपाहची लागण झाल्याचे निदान झाले होते, अशी माहिती आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांनी एका निवेदनात दिली. मात्र पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडून () अहवालाला अंतिम दुजोरा मिळण्याची प्रतीक्षा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.केरळमध्ये काही दिवसांतील निपाहशी संबंधित हा दुसरा मृत्यू आहे. काही दिवसांपूर्वी मलप्पुरम येथील एका व्यक्तीचा या संसर्गाने मृत्यू झाला होता, तर पलक्कड जिल्ह्यातील आणखी एका रुग्णावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.या नवीन संशयित प्रकरणानंतर, सरकारने या भागात संपर्क शोधमोहीम आणि क्षेत्रीय सर्वेक्षण अधिक गतिमान केले आहे. रुग्णाच्या संपर्कात आलेल्या ४६ जणांची यादी तयार करण्यात आली आहे. संपर्क यादीतील लोकांना ओळखण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल टॉवर लोकेशन डेटाचा वापर करण्यात आला आहे. रुग्णाच्या अलीकडील प्रवासाची माहिती आणि संपर्कांचा शोध घेण्यासाठी कौटुंबिक माहिती तयार करण्यात आली आहे.पलक्कड आणि मलप्पुरम जिल्ह्यातील लोकांना, विशेषतः सध्याच्या परिस्थितीत, रुग्णालयांना अनावश्यक भेटी देणे टाळण्याचे आवाहन केले आहे. उपचार घेत असलेल्या मित्र किंवा नातेवाईकांना भेटण्यावर कठोर निर्बंध घालण्यात यावेत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आरोग्य कर्मचारी आणि रुग्णालयात येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक या सर्वांनी नेहमी मास्क घालणे अनिवार्य आहे, असे एका अधिकृत पत्रकात म्हटले आहे. दरम्यान, आरोग्यमंत्र्यांनी सहा जिल्ह्यांतील रुग्णालयांसाठी निपाहचा इशारा जारी केला आहे. पलक्कड, मलप्पुरम, कोझिकोड, कन्नूर,




वायनाड आणि थ्रिसूर येथील वैद्यकीय सुविधांना या सूचना पाठवण्यात आल्या आहेत. ताप आणि एन्सेफलायटीस (मेंदूज्वर) किंवा तीव्र तापासारखी निपाहची लक्षणे आढळणाऱ्या रुग्णांची माहिती तात्काळ देण्याचे निर्देश रुग्णालयांना देण्यात आले आहेत, असे आरोग्य मंत्र्यांच्या कार्यालयाने म्हटले आहे.

# भारताची पाकिस्तानच्या 'जवळच्या मित्रा'शी हातमिळवणी

**नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था**

भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर तीन दिवसांच्या चीन दौऱ्यावर आहेत. सोमवारी त्यांनी चीनचे उपराष्ट्रपती हान झेंग यांची भेट घेतली. याबाबत एस जयशंकर यांनी सोशल मीडियावर एक पोस्टही शेअर केली आहे. ते तियानजिन येथे होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) सदस्य देशांच्या बैठकीला उपस्थित राहतील. सर्व सदस्य देशांचे परराष्ट्र मंत्री त्यात सहभागी होतील.

जयशंकर यांच्या चीन भेटीमुळे पाकिस्तानला मोठा धक्का बसू शकतो. चीन हा पाकिस्तानचा जवळचा मित्र आहे. एस. जयशंकर यांच्या भेटीदरम्यान भारत आणि चीनमध्ये अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होईल. ''आज बीजिंगमध्ये आल्यानंतर उपराष्ट्रपती हान झेंग यांना भेटून आनंद झाला,'' असे त्यांनी ट्विटरवर लिहिले. चीनच्या एससीओ अध्यक्षपदासाठी भारताच्या पाठिंब्याबद्दल त्यांना माहिती देण्यात आली. द्विपक्षीय संबंध सुधारण्याकडेही लक्ष देण्यात आले.२०२० मध्ये गलवान खोऱ्यात



झालेल्या संघर्षानंतर जवळपास पाच दिवसांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर चीनला पोहोचले आहेत. दोन्ही देश संबंध सुधारण्यासाठी काम करतील. यादरम्यान, सीमेवर शांतता राखणे आणि व्यापाराशी संबंधित मुद्द्यांवरही चर्चा होईल. यामुळे पाकिस्तानला अडचणी येऊ शकतात. चीन आणि पाकिस्तानमध्ये मैत्री आहे, पण आता त्याचा मित्र भारताशी संबंध सुधारण्यासाठी पावले उचलू शकतो.

# भारताने आमच्यावर एअर स्ट्राईक केला

## शेजारील देश म्यानमारचा ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांचा आरोप

**नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था**

भारताच्या सीमेला लागून असलेल्या म्यानमारच्या सागाईंग प्रांतात सक्रिय असलेल्या उल्फा (आय) या दहशतवादी संघटनेने आरोप केला आहे की भारताने ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांद्वारे त्यांच्या छावणीवर मोठा हल्ला केला आहे. या हल्ल्यात टॉप कमांडर नयन मेधीसह अनेक टॉप दहशतवादी मारले गेल्याचा आरोप उल्फाने केला आहे. मात्र, भारतीय लष्कर (आर्मी) आणि हवाई दलाने अशा कोणत्याही सीमापार हल्ल्याचा स्पष्टपणे इन्कार केला आहे.

आसाममधील दहशतवादी संघटना, युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा) म्हणजेच उल्फा (इंडिपेंडंट) ने एक निवेदन जारी करून भारतावर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांचा आरोप केला आहे. निवेदनानुसार, काल सकाळी, उल्फा कमांडर नयन



मेधी उर्फ नयन असोम यांचे अंत्यसंस्कार सुरू असताना, त्याठिकाणी उपस्थित असलेल्या आणखी एका कमांडरचा क्षेपणास्त्र हल्ल्यात मृत्यू झाला.उल्फाच्या म्हणण्यानुसार, छावणीवरील ड्रोन हल्ल्यात नयन मेधीचाही मृत्यू झाला. हे कॅम्प भारताच्या सीमेवर असलेल्या म्यानमारच्या सागाईंग प्रांतातील वक्थम टाउनशिपमध्ये आहे.याठिकाणी उल्फा या अतिरेकी संघटनेचा कॅम्प क्रमांक ७७९ आहे. याशिवाय, होयत बस्ती येथील उल्फाच्या पूर्व मुख्यालयावर (कॅम्प) हल्ला करण्यात आला. गेल्या दीड दशकात आसाममधील बंडखोरीचे उच्चाटन केल्यानंतर, उल्फाने म्यानमारला आपला बालेकिल्ला बनवले आहे.

म्यानमारमध्ये लष्करी राजवटीची पकड ढिली झाल्यामुळे आणि बंडखोरांनी आपले स्थान वाढवल्यामुळे, भारतविरोधी संघटनांना सुरक्षित आश्रय मिळाला आहे. यामुळेच भारताच्या सीमेला लागून असलेल्या म्यानमारच्या जंगली भागात उल्फा आणि एनएससीएन (आय) सारख्या संघटना सक्रिय झाल्या आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार , उल्फा कॅम्प व्यतिरिक्त, नॅशनलिस्ट सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (आय) च्या तळांवरही ड्रोन हल्ले करण्यात आले आहेत. आतापर्यंत एकूण चार दहशतवादी तळांवर झालेल्या हल्ल्यांची माहिती समोर आली आहे. हे सर्व छावण्या म्यानमारमधील चीन सीमेला लागून असलेल्या भागात असल्याचे सांगितले जाते.विशेष म्हणजे, उल्फा नेता परेश बरुआ गेल्या अनेक वर्षांपासून बेपत्ता आहे आणि तो चीन-म्यानमार सीमेवर किंवा बांगलादेशात कुठेतरी लपला असल्याचे मानले जाते. अलिकडेच, बांगलादेशच्या एका न्यायालयाने दशक जुन्या दहशतवादी प्रकरणात (फरार) परेश बरुआची फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदलली. अशा परिस्थितीत, उल्फाच्या पुनरुज्जीवनामागील चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशचे षड्यंत्र समोर आले.

# १५०० किमी अंतर फक्त ६ तासांत

## वाराणसी ते हावडा दोन शहरांदरम्यान धावणार दुसरी बुलेट ट्रेन

**नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था**

मुंबई ते अहमदाबाद भारतात पहिला बुलेट ट्रेन मार्ग जपानच्या मदतीने निर्माण होत असून लवरच या मार्गावर ट्रेन धावणार आहे. त्यानंतर आता देशभरात बुलेट ट्रेन धावण्याची शक्यता आहे. कारण भारतात दुसऱ्या बुलेट ट्रेन मार्गाचं काम सुरू झालं असून १५०० किमी फक्त साडे सहा तासांत कापता येणार आहे. दिल्लीहून हावडापर्यंत ही ट्रेन धावणार आहे.या नव्या बुलेट ट्रेन मार्गावर एकूण ९ स्थानकं प्रस्तावित आहेत. पहिलं स्थानक राजधानी दिल्लीमध्ये असेल. यानंतर ट्रेन थेट आग्रा कॅन्ट येथे थांबेल. त्यानंतर ती कानपूर सेंट्रल, अयोध्या, लखनऊ मार्गे वाराणसीकडे धावेल. वाराणसीहून पुढे ही ट्रेन पाटणा आणि नंतर झारखंड ओलांडून पश्चिम बंगालमधील आसनसोलमार्गे हावडा स्थानकावर पोहोचणार आहे.



दिल्ली-हावडा बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी सर्वेक्षण पूर्ण झाले असून, त्याचा अहवाल रेल्वे मंत्रालयाकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या प्रकल्पाचं काम दोन टप्प्यांमध्ये हाती घेतले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात दिल्ली ते वाराणसी दरम्यानचं काम पूर्ण केले जाईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात वाराणसी ते हावडापर्यंतच बुलेट ट्रेन मार्गाची उभारणी होईल. संपूर्ण प्रकल्पासाठी अंदाजे ५ लाख कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.१६६९ किमी लांबीच्या या बुलेट ट्रेन प्रवासासाठी केवळ साडेसहा तास लागतील. दिल्ली ते पाटणा हे १०७८ किमीचे अंतर ही ट्रेन अवघ्या चार तासांत पूर्ण करेल. यानंतर पाटणा ते हावडा हा ५७८ किमीचा प्रवास फक्त दोन तासांत पार पडेल. एकूण नऊ स्थानकांपैकी पाच उत्तर प्रदेशात, एक बिहारमध्ये आणि उर्वरित दोन पश्चिम बंगालमध्ये असतील. विशेष म्हणजे, पाटणा परिसरात ६० किलोमीटर लांबीचा एलिव्हेटेड ट्रॅक बांधण्यात येणार आहे.

### एटीएममधून ५०० रुपयांच्या नोटा सुरूच राहणार

**नवी दिल्ली:** सोशल मीडियावर फिरणाऱ्या एका मेसेजमध्ये दावा केला जात आहे की, रिझर्व्ह बँकेने (ठइख) सप्टेंबर २०२५ पासून एटीएममधून ५०० रुपयांच्या नोटा देणे बंद करण्याचे आदेश बँकांना दिले आहेत; मात्र केंद्र सरकारने १२ जुलै २०२५ रोजी या वृत्ताचे खंडन करत हे वृत्त पूर्णपणे खोटे असल्याचे स्पष्ट केले आहे.सरकारने सोशल मीडिया वापरकर्त्यांना अशा 'चुकीच्या माहिती'पासून सावध राहण्याचा इशारा दिला आहे आणि कोणतीही बातमी शेअर करण्यापूर्वी किंवा त्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी अधिकृत स्रोतांकडून तिची सत्यता पडताळून पाहण्याची विनंती केली आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका मेसेजमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सर्व बँकांना ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत देशभरातील सर्व एटीएममधून ५०० रुपयांच्या नोटांचे वितरण थांबवण्याचे आदेश दिले आहेत.

# आता रेल्वेतही 'महिलाराज'

**नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था**

रेल्वे संरक्षण दलाच्या इतिहासात प्रथमच एका महिला अधिकाऱ्याला सर्वोच्च पदाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत. वरिष्ठ आयपीएस अधिकारी सोनाली मिश्रा यांची रेल्वे संरक्षण दलाच्या पहिल्या महिला महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे.मध्य प्रदेश केडरच्या १९९३ च्या बॅचच्या भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) अधिकारी सोनाली मिश्रा ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या निवृत्तीपर्यंत आरपीएफच्या महासंचालक पदावर कार्यरत राहतील. कार्मिक मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने सोनाली मिश्रा यांची या पदावर नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे.येत्या ३१ जुलै रोजी निवृत्त होणारे महासंचालक मनोज यादव यांच्या जागी त्या पदभार स्वीकारतील. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सोनाली मिश्रा या आरपीएफचे नेतृत्व करणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी असतील. आरपीएफकडे इतर कर्तव्यांसह रेल्वे मालमत्तेची आणि प्रवाशांची सुरक्षा करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सध्या सोनाली मिश्रा मध्य प्रदेश पोलिसात अतिरिक्त महासंचालक म्हणून कार्यरत आहेत.रेल्वे मालमत्तेची सुरक्षा



सुनिश्चित करण्यासाठी १९५७ मध्ये संसदेच्या कायद्याद्वारे आरपीएफची स्थापना करण्यात आली. नंतर, १९६६ मध्ये रेल्वे मालमत्तेवर बेकायदेशीर कब्जा करणाऱ्या गुन्हेगारांची चौकशी, अटक आणि खटला चालवण्याचे अधिकार दलाला देण्यात आले. २० सप्टेंबर १९८५ रोजी त्याला ''संघाचे सशस्त्र दल'' असा दर्जा देण्यात आला.सोनाली मिश्रा यांनी त्यांच्या प्रतिष्ठित कारकिर्दीत अनेक महत्त्वाच्या भूमिकांमध्ये काम केले आहे. जुलै २०२१ मध्ये, पंजाबमधील भारत-पाकिस्तान सीमेवर सीमा सुरक्षा दलाच्या () फॉर्मेशनचे नेतृत्व करणाऱ्या पहिल्या महिला कमांडर म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. सोनल यांनी काश्मीर खोऱ्यात महानिरीक्षक (आयजी) म्हणून दलाच्या स्थापनेचे नेतृत्व केले.

# सीरियामध्ये पुन्हा गृहयुद्धाचा भडका; सामुदायिक संघर्षात ३७ जणांचा मृत्यू

**दमास्कस :, दि.१४ वृत्तसंस्था**

सीरियामध्ये पुन्हा एकदा संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे मोठा गोंधळ उडाला आहे. सीरियामध्ये सोमवारी डुझबहुल स्वेडा शहरात सामुदायिक संघर्ष झाला. यामध्ये ३७ जणांचा मृत्यू झाला, तर १०० हून अधिक लोक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ड्रुझ आणि बेदुइन समुदायांमध्ये हिंसाचार घडला. यासाठी सीरियाच्या अल-जुलानी सरकारला जबाबदार धरण्यात आले आहे.गेल्या वर्षीच्या २०२४ च्या अखेरीस सीरियामध्ये अल-जुलानी यांच्या हयात तहरीर या बंडखोर गटाची सत्ता स्थापन झाली होती.



अल-जुलानी यांच्या नेतृत्वाखाली बंखोरांनी बशर अल-असदची सत्ता संपुष्टात आणली होती. यानंतर सीरियावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न सुरु होता. परंतु अद्याप हयात तहरीर गटाला अद्याप सीरियावर पूर्ण नियंत्रण मिळवता आले नाही. अल-जुलानी यांनी देशात शांतता प्रस्थातपित करण्याचे म्हटले होते, परंतु यामध्ये ते अपयशी ठरताना दिसत आहे.सीरियन सरकारशी कुर्दीश दहशतवाद्यांचा संघर्ष सुरु आहे.

हा संघर्ष सुरु असतानाच ड्रुझ आणि बेदुइन समुदायांमध्येही हिंसाचार वाढत आहे. ब्रिटनस्थित सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्यूमन राइट्स संस्थेने, सध्या सीरियामध्ये मोठ्या प्रमाणात अतिरिक्त सैन्य तैनात करण्यात आले असल्याचे म्हटले. तसेच प्रत्यक्षदर्शनींनी दिलेल्या माहितीनुसार, दमास्क ते स्वेदाला जोडणाऱ्या महामार्गावर ड्रुझ समुदायाच्या एका व्यापाराला अपहरण करुन हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर हा संघर्ष उफाळला.दरम्यान या संघर्षासाठी सीरियाच्या नव्या सरकारला जबाबदार धरण्यात आले हे. ड्रुझ समुदायाने यासंबंधी एक निवेदन जारी केली आहे. या निवेदनात समुदायाचे प्रमुख रेजल अल-करामाह यांनी म्हटले आहे की, सरकारच्या सुरक्षा व्यवस्थेतील बेजबाबदारपणामुळे हा हिंसाचार घडला. सध्या सीरियन सरकार देशात अशंतात निर्माण करत आहे. यामुळे नागरिकांना धोका निर्माण होत आहे, असे या निवेदनात सांगण्यात आले आहे. दोन महिन्यांपूर्वी देखील ड्रुझ समुदायाचे सदस्य आणि सुरक्षा दलंमध्ये चकामक झाली होती. यामध्ये डझनभर लोक मृत्यूमुखी पडले होते.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत,
सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## दहशतवादाची आव्हाने

दहशतवादाच्या जगभर पसरलेल्या जाळ्याला रोखण्यासाठी कार्यरत असलेल्या एफएटीएफ फायनान्शिअल अॅक्शन टास्क फोर्स या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अलीकडील अहवालातील निष्कर्ष खळबळजनक आहेत. यातून असे उघड झाले आहे की, दहशतवादी संघटना आता मोठ्या प्रमाणात ऑनलाईन सेवा, डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करत आहेत. या वास्तवाने केवळ भारतालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला सावध होण्याचा इशारा दिला आहे. एफएटीएफने स्पष्ट केले आहे, की पुलवामा येथे झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात वापरण्यात आलेल्या स्फोटकांपैकी काही साहित्य ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सवरून खरेदी करण्यात आले होते. ही बाब केवळ तांत्रिकदृष्ट्या धक्कादायक नसून, धोरणकर्त्यांसाठी चिंतेचा विषय बनली आहे. इंटरनेट हे साधारण नागरिकांसाठी माहितीचा स्रोत असताना, त्याच माध्यमाचा दहशतवादी त्यांच्या घातक हेतूंसाठी वापर करीत आहेत. गेल्या काही वर्षात बॉम्ब बनविण्याच्या पद्धतीपासून ते शस्त्रसामग्रीच्या खरेदीपर्यंत सर्व काही ऑनलाईन शक्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर सामग्री विकणाऱ्या कंपन्यांना जबाबदार धरण्याची गरज आहे. ग्राहक म्हणून वापरकर्त्यांचे संपूर्ण सत्यापन (केवायसी), व्यवहारांची निगराणी आणि संशयास्पद ऑर्डर्सवर



नियंत्रण हे सर्व नियम अधिक कठोरपणे लागू करणे गरजेचे झाले आहे. तसेच सरकारांनी या तंत्राचा वापर करून दहशतवादी कारवायांची पद्धतशीर ओळख पटविणे व रोखणे ही अत्यावश्यक बाब बनली आहे. एफएटीएफच्या या अहवालात पाकिस्तानचा पुन्हा एकदा उल्लेख झाला आहे. पाकिस्तानमधील सत्ताधारी यंत्रणा केवळ दहशतवाद्यांना आर्थिक आणि शस्त्रसाठ्याची मदत करीत नाहीत, तर प्रशिक्षण व संरक्षणही पुरवीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. पाकिस्तान आपल्याच देशातील दहशतवाद्यांना संरक्षण देतो आणि दुसऱ्या बाजूने स्वतःला दहशतवादाचा बळी असल्याचे भासवतो. ही भयंकर दुटप्पी भूमिका आता जगापुढे उघड होऊ लागली आहे. विशेषतः एफएटीएफने नुकत्याच दिलेल्या एका वक्तव्यात नमूद केले आहे की, पहलगाम हल्ल्यासारख्या घटनेत संस्थात्मक व आर्थिक पाठबळाशिवाय दहशतवादी कारवाई शक्य नव्हती. या पार्श्वभूमीवर भारताला ठाम भूमिका घ्यावी लागेल. पंतप्रधानांनी अलीकडील परदेश दौऱ्यांमध्ये विविध जागतिक मंचांवर ही बाब स्पष्ट केली आहे की, दहशतवादाविरुद्धची लढाई ही केवळ एका देशाची लढाई नसून जागतिक मोहिम असली पाहिजे. यासाठी सर्व शांतताप्रिय देशांनी एकत्र येऊन दहशतवादाला थेट किंवा अप्रत्यक्ष पाठबळ देणाऱ्या देशांचा पर्दाफाश करावा लागेल. यात आणखी एक महत्त्वाची बाब लक्षात घ्यावी लागेल ती म्हणजे इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचे स्वरूप. स्फोटके बनविण्याच्या कृती, घातक रसायनांचा वापर, अगदी शस्त्रे बनविणाऱ्या थ्री डी प्रिंटिंग फाईल्स देखील खुलेपणाने इंटरनेटवर उपलब्ध आहेत. हे डार्क वेब, एनक्रिप्टेड चॅटस् व क्रिप्टो चलनांमधील व्यवहार या सर्व गोष्टी दहशतवाद्यांना सुलभ मार्ग उपलब्ध करून देतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संस्थांनी केवळ निधी पुरवठ्याच्या मागावर न राहता, ऑनलाईन माहितीचा वापर थांबविण्याचे प्रयत्नही समान पातळीवर करायला हवेत. शासनांबरोबरच ऑनलाईन सेवांमध्ये गुंतलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचीही जबाबदारी मोठी आहे. त्यांच्यावर दबाव आणून दहशतवादी उपयोगासाठी होणारी कोणतीही सामग्री न पाठविण्याचे संकेत, ट्रॅकिंग आणि थेट डिलिव्हरीवर नियंत्रण यासाठी प्रोटोकॉल तयार करणे अनिवार्य झाले आहे. भारत कधीही दुष्कर्म करणाऱ्यांना त्याच्या बळींप्रमाणेच सहन करणार नाही आणि भागीदारांनी दहशतवादाविरुद्ध शून्य सहनशीलता चे धोरण समजून घ्यावे अशी अपेक्षा करतो, असे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी शनिवारी त्यांचे ब्रिटिश समकक्ष डेव्हिड लॅमी यांच्याशी व्यापक चर्चेदरम्यान सांगितले. गेल्या महिन्यात झालेल्या चार दिवसांच्या संघर्षानंतर अनेक देशांनी भारत आणि पाकिस्तानला हायफनेशन केल्यामुळे नवी दिल्लीत निर्माण झालेल्या अस्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर एस. जयशंकर यांचे हे विधान जागतिक समुदायाला एक स्पष्ट संदेश देण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून आले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात दहशतवादाचे रूप सौम्य होते. मुंबईवरील १९९३ मधील बॉम्बस्फोटानंतरचा काळ हा साधारण नवदहशतवादाची सुरुवात मानला जातो. यामध्ये आपण आता पाहतो, तसे नृशंस आणि निर्घृण, आत्मघाती रूप दहशतवादाला आले आहे. इंटरनेट हे साधारण नागरिकांसाठी माहितीचा स्रोत असताना, त्याच माध्यमाचा दहशतवादी त्यांच्या घातक हेतूंसाठी वापर करीत आहेत. त्यामुळे आता केवळ केद्र सरकारनेच नव्हे तर सर्व राज्य सरकारांनी सतर्कता बाळगणे आवश्यक झाले आहे.



सप्तरंग

डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९

# शब्दांआड जपलेले निःशब्द नाते...



नात्यास नाव अपुल्या देऊ नकोस काही,
साऱ्याच चांदण्यांची जगतास जाणं
नाही....
किती छान ओळी आहेत ,
ना नाव, ना परिभाषा, तरीही जपलेलं एक नातं, न बोलता समजलेलं, न धरता धरलेलं नातं.
तो आणि ती दूर असूनही सोबत असलेले, शब्दांशिवाय वाचलेले, स्पर्शांशिवाय समजलेले...
तो आणि ती नाव नसलेलं, पण मनात खोलवर रुजलेलं नातं
तो आणि ती एकाच शहरात, एकाच वेळेला, पण वेगळ्या दिशांनी चालणारे. दोन पूर्ण वेगळ्या आयुष्यांतील जीव, पण मनाच्या एका नाजूक लयीत एकमेकाशी जुळलेले. त्यांच्या नात्याला नाव नव्हतं. ना ते 'मैत्री' होतं, ना ते 'प्रेम'.
ते काहीसं अधांतरी, पण खूप गहिरे जणू निरव शांततेत डुलणारी एक अनाम अनुभूती.
ती आयुष्याशी झुंजणारी, पण चेहऱ्यावर नेहमी हसणारी. तो स्वतःच्या विचारांत हरवलेला, पण दुसऱ्यांना समजून घेणारा. कुठल्याशा वळणावर दोघं भेटले. ओळख झाली आणि नकळत एक सवय. ती त्याच्याशी काहीही बोलायची. अगदी काहीही.
त्याला सांगायची, ''आज खूप दमलेय गं कुणीतरी फक्त ऐकावं वाटतंय.''
आणि तो, आपला मोबाईल हातात घेऊन, तिच्या प्रत्येक शब्दाला मूक प्रतिसाद द्यायचा.
तोही कधी त्याच्या आठवणी, त्याच्या गप्पा, त्याच्या भूतकाळाचे धागे तिच्यासमोर उलगडायचा.
ती शांत ऐकायची मध्येच काही विचारायची नाही, टोचून बोलायची नाही. फक्त एक मोकळं आकाश द्यायची त्याच्या मनाला.
जणू त्या दोघांच्या मनाच्या अवकाशात एकमेकांसाठी जागा राखून ठेवलेली होती.
कधी तिला उशिरा रिप्लाय मिळायचा,
कधी त्याचं मन अस्वस्थ असायचं.
पण राग कोणालाच येत नसे.
का? कारण तिथे अपेक्षा नव्हती.
त्या नात्यात 'का नाहीस उत्तर दिलंस?' हा प्रश्न नव्हता,
तर 'तुला बरं वाटेल का आता?' असा काळजीचा सूर होता.
कधी त्यांचं भांडण व्हायचं. काही क्षुल्लक गोष्टीवर.
कधी कधी नात्यांच्या काठावर शब्द उभे राहतात, अगदी शांत , स्तब्ध .
कारण सहजतेत कुठेतरी नकळत एक अट्टहास दडलेला असतो, तो दोघांपैकी एकाच्या मनाला कदाचित टोचलेला असतो... ,पण काही क्षणातच तो अट्टाहास मागे सरतो, अट्टाहास मागे सरला तरी पण आत कुठेतरी वाटतं , जाणवतं.. की त्या अट्टाहासाने एक पापुद्रा तुटला शब्द मागे सरले आणि आपल्या संवादाचा तो सहज प्रवाह कुठेतरी डळमळला की थांबला असं वाटतंय. एक मात्र नक्की की संवाद नाही थांबला. कधी एखादं फुलपाखरू पकडताना त्याचे पंख तर दुखावले नसतील नां, किंवा शब्दांची ओंजळ भरताना, भावनांचा एखादा थेंब तर ओघळून गेला नसेल नां मग मूक संवाद , माझ्या अट्टाहासामुळे तू दुखावली गेली असशील असं मला वाटतं ....
आणि हे सगळं मी सांगितलं नाही तर मनावर सावलीचं मळभ राहील
आणि दिलखुलास मनमोकळे पणाने सांगितलं तर कदाचित पुन्हा एकदा तुझ्या मनात तोच ओलावा दिसेल आणि तुझ्या मनात कुठलं किल्मिष राहणार नाही.
तो काहीसा शांत, ती थोडीशी मनात साठवून ठेवणारी.
पण दोघांपैकी कुणीच 'मी का समजून घ्यायचं...?'
असं कधीच म्हणायचं नाही.
कारण त्यांचं नातं म्हणजे 'समजून घेणं' होतं समजावण्याची जबाबदारी नव्हे.
तो तिच्याशी न बोलता दिवस काढायचा,
पण मनात सतत तिचं नाव असायचं.
ती त्याचं नाव मोबाईलवर दिसत नाही म्हणून हळवं व्हायची,
पण 'कशाला त्रास द्यावा' या विचाराने मेसेज न करता थांबायची.
ते एकमेकांसाठी हक्काचे नव्हते,
पण हक्कापलीकडचे होते.
ना त्यांना 'आपलं' म्हणण्याचा अधिकार होता,
ना एकमेकांपासून लांब जायचं धाडस.
त्यांचं नातं म्हणजे एका विसाव्याच्या जागेसारखं होतं
जिथे माणूस कोणतंही बंधन न वाटता थांबू शकतो, श्वास घेऊ शकतो, आणि पुढे चालू शकतो.
ना पकडून ठेवायचं, ना सोडून द्यायचं फक्त होतं.
कधी ती काहीतरी लिहायची थोडंसं कवितेसारखं, थोडंसं गूढ.
तो वाचायचा, आणि म्हणायचा, ''तू जरा वेगळी आहेस.''
ती हसायची ''म्हणजे विचित्र?''
तो डोळे मिटून म्हणायचा, ''नाही खास.''
ते एकमेकांसाठी खास होते पण 'प्रेमी' नव्हते.
ते एकमेकांना हवे होते पण 'आपले' नव्हते.
त्यांचं नातं म्हणजे एका शांत सरोवरासारखं होतं
नकळत गहिरं होत गेलेलं,
पण कधीच वाहून नेणारं नव्हे
फक्त शांततेनं सामावून घेणारं.
कधी ती अचानक म्हणायची, ''माझं लग्न ठरलंय.''
तो काही वेळ गप्प व्हायचा.
पण लगेच विचारायचा, ''तो तुला समजून घेतो ना?''
ती 'हो' म्हणायची, आणि दोघांमध्ये एक अलिखित विराम पडायचा.
तरी त्या नात्याचं काही संपायचं नाही.
ते अस्तित्वात राहायचं
माझ्या-माझ्यापुरतं, तिच्या-तिच्यापुरतं स्मरणांत, आठवणीत, आणि हृदयाच्या एका कोपऱ्यात.
एक नातं होतं नाव नसलेलं, पण अर्थाने समृद्ध. कधीही कबूल न झालेलं, पण मनात खोलवर घर करून राहिलेलं.
तो आणि ती दोन जीवनरेषा, ज्या कधी एकत्र आल्या नाहीत,
पण एकमेकीच्या दिशेनं कायम झुकलेल्या होत्या.



संस्कृती

डॉ. विनोद गायकवाड
राजकीय अभ्यासक, मो. ९८५०३२४२०२

# १५० वे जयंती वर्ष आणि आदिवासी विकास !



महाराष्ट्रात हिंदी-मराठी भाषावादाचे राजकारण तापत असतांनाच आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाकरिता करावी लागणारी पायपीट पाहून अंगावर शहारे उभे राहतात. भारतीय संविधानाने शैक्षणिक मूलभूत अधिकार दिला आहे. तसेच १४ वर्षापर्यंत मोफत शिक्षणाची व्यवस्थाही केली आहे. असे असतांना आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी संघर्ष करतांना दिसतात. स्वातंत्र्याच्या आणि संविधानाच्या अमृत महोत्सवानंतरही आदिवासी भाग विकासासाठी संघर्ष करतोय हे या निमित्ताने पुन्हा पुढे आले. आदिवासी समाजाला प्रवाहात आणण्यासाठी सरकारी स्तरावर प्रयत्न होत असले तरी ते अपुरे वाटतात. म्हणूनच बिरसा मुंडा यांचे विचार आजही प्रासंगिक ठरतात.भारताचे मूळ लोक म्हणून समजल्या जाणाऱ्या आदिवासींचे सांस्कृतिक योगदान जेवढे मोठे आहे, तितकेच किंबहुना अधिक मोठे त्यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान आहे. आदिवासी लोकसमुदाय स्वतंत्र आणि समान असून त्यांना जन्मतःच हक्क प्राप्त आहेत. प्रचलित आंतरराष्ट्रीय नियमानुसार प्रतिष्ठेने जगण्याचा आणि हक्क उपभोगण्याचा अधिकार त्यांना आहे. म्हणूनच भारतीय संविधानाने आदिवासींचा अनुसूचित जमातींमध्ये समावेश करून आरक्षणाची स्वतंत्र व्यवस्था केली आहे.

महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या जवळजवळ १,०५,१०,२१३ (९.३५%) इतकी आहे. सह्याद्री आणि सातपुडा पर्वत रांगेत वसलेला हा आदिवासी समाज पश्चिम महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव, पालघर, ठाणे, नाशिक आणि पूर्वेकडील भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आढळतो. महाराष्ट्रात गोंड, कोळी, भिल्ल, महादेव कोळी, वारली, कातकरी अशा काही आदिवासी जमाती आहेत. पर्वत रांगेत असलेली काही गावे अजूनही मुख्य रस्त्यापर्यंत जोडली गेली नाहीत. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील केलखाडी हे तसेच एक गाव आहे. हा जिल्हा आदिवासीबहुल असून सातपुडा पर्वताच्या डोंगर रांगेत वसलेले केलखाडी हे गाव ४०० लोकवस्तीच आहे. ग्रामस्थ डोंगर उतरून नदीकाठावर येतात. या गावाजवळ वीस फूट खोल केलखाडी नदी असून त्यावर पुल नसल्याने २० विद्यार्थ्यांना २४ फूट लांब झाडांच्या फांदीवरून दोरीच्या साह्याने पलीकडच्या जिल्हा परिषद शाळेत जावे लागते. हा प्रवास अवघड असल्याने विद्यार्थी जीव धोक्यात घालत शाळेत जातात. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच या गावाला रस्ता नाही. गेल्या काही वर्षापासून ग्रामस्थ या रस्त्याकरीता, नदीवरील पुलासाठी पाठपुरावा करीत आहेत. ग्रामस्थ अशाप्रकारे जीवघेणी कसरत करीत असतात. असे प्रकार अनेक ठिकाणी आहेत. पालघर जिल्ह्यातील सोनाळे खुर्द गावातील रायकर पाड्यातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी वैतरणा नदीच्या पुरातून तराफ्यावरून प्रवास करावा लागतो आहे. तसेच आदिवासी भागातील शाळांच्या इमारतींची अवस्थाही बिकट आहे. अनेक ठिकाणी शिक्षकांची संख्याही कमी आहे. हे भयान वास्तव आदिवासी विकास योजनांचा खरा चेहरा म्हणावा लागेल.

अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघातील हे गाव असून शिवसेनेचे आमश्या फुलजी पाडवी हे विद्यमान आमदार आहेत. म्हणजेच या गावातील नागरिक मतदार आहेत. शबरी आदिवासी विकास योजनेअंतर्गत आदिवासी समाजाचे जीवन स्तर उंचविण्यासाठी प्रयत्न केले जातात. नंदुरबार जिल्हा नाशिक विभागात येत असून त्यांच्या विकासाकरिता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना १९९८ मध्येच करण्यात आली. आदिवासी समाजातील नागरिकांचा आर्थिक विकास आणि कल्याणाकरिता या महामंडळाचे गठण करण्यात आले. आदिवासींच्या कौशल्य विकासाकरिता तसेच आदिवासी विभागाच्या विकासाकरिता योजना राबविल्या जातात. प्रधानमंत्री वन धन योजनाही राबविली जाते. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (आयटीडीपी) आणि आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय) आदिवासींसाठी कार्य करते. १९७२ मध्ये समाज कल्याण विभागांतर्गत आदिवासी विकास संचालनाची स्थापना करण्यात आली. १९९२ मध्ये त्याचे आदिवासी विकास आयुक्तालयात विलीनीकरण करण्यात आले. १९८३ मध्ये स्वतंत्र आदिवासी विकास विभाग स्थापन करण्यात आला. आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण करण्यास मनाई असणारा कायदा महाराष्ट्रात लागू आहे. आदिवासी विकास मंत्रालय हा स्वतंत्र विभाग महाराष्ट्र शासनाचा आहे. अशा विविध विभागांतर्गत आदिवासींना संरक्षण देण्याचा प्रयत्न सरकार करीत असले तरी आदिवासी भाग मात्र अजूनही अविकसित आहे हे वरील शाळेचा रस्ता दर्शविते. विकास योजना आणि प्रत्यक्ष विकास यामध्ये निश्चितच अंतर दिसते. म्हणूनच बिरसा मुंडा यांच्या संघर्षाची आठवण होते.

आदिवासी समाजाचे महानायक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती वर्ष म्हणून २०२५ हे वर्ष साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. त्यांच्या जयंती निमित्ताने १५ नोव्हेंबर हा दिवस जनजातीय गौरव दिवस म्हणून साजरा केला जातो. मात्र त्यांचेच आदिवासी अनुयायी आजही जीवन जगण्यासाठी संघर्ष करीत आहेत. आदिवासींच्या जीवनावश्यक गरजा शासनाने पूर्ण केल्यास तो खरा आदिवासींचा जीवनगौरव ठरेल. एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये हे सरकारचे धोरण कौतुकास्पद असले तरी त्या मूलभूत अधिकारांकरिता आवश्यक असणाऱ्या सुख-सुविधाही पुरविणे सरकारचेच कर्तव्य ठरते. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान हा प्रश्न पुढे आल्याने त्यावर चर्चा होणे अपेक्षितच होते. एकीकडे शिक्षण कोणत्या भाषेत आणि कसे द्यावे याबाबत राजकीय संघर्ष तर दुसरीकडे शिक्षणाकरिता आदिवासी विद्यार्थ्यांना शोधाव्या लागणाऱ्या वाटेचा संघर्ष आहे. सत्ताधारी विरुद्ध विरोधक या संघर्षात बळी मात्र अविकसित भागातील समाजाचा जातो आहे. नेहमीप्रमाणे विरोधकांना शेतकरी प्रश्नांसह हा मुद्दा मिळाला असला तरी त्यावर चर्चेपलीकडे काही होईल असे दिसत नाही. भारतात ब्रिटिश काळापासूनच आदिवासींचा विकास हा मुद्दा वादाचा राहिला. बिरसा मुंडा यांनी इंग्रजांविरुद्ध लढा उभारून आदिवासींना न्यायिक हक्क मिळवून दिले. मात्र वरील परिस्थिती पाहिल्यास तो संघर्ष अजूनही संपलेला नाही असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.



प्रासंगिक

संजय एम. देशमुख
9881304546

# हिन्दी-मराठी मंथनातून मतलबाचे लोणी खाण्याचे प्रयत्न!

धार्मिक,प्रांतिक,वंशिक आणि जाती जातीचे वाद लाऊन संघर्षाच्या तप्त उद्रेकातून स्वत:च्या मतलबाच्या पोळ्या शेकणारे आता भाषावादावर येऊन पोहचले आहेत.हिन्दी- मराठी भाषिक मंथनातून राजकीय मतलबाचं लोणी खाण्यासाठी सिध्द झालेले आहेत.मुळात सरकारने हिन्दी सक्तीचा जी.आर काढला नसता तर या वादाला सुरूवात झाली नसती.आपल्या नकली जनसेवेचे आणि भाषाप्रेमाचे डंके वाजवण्यासाठी लंका पेटविण्याची कोलितं सुध्दा समाजविघातकांच्या हाती मिळाली नसती.''स्वत:चं ठेवावं झाकून आणि दुसऱ्याचं पहावं वाकून'' या न्यायाने स्वत:च्या राज्याततच उद्रेक असतांना ईतर राज्यांच्या अंतर्गत मामल्यात नाक खुपसण्याचा महाराष्ट्राला नैतिक अधिकार उरत नाही.त्यामुळे मतांच्या लालसेतून मुंब्रईवर अधिराज्याची स्वप्ने पाहणाऱ्या नेत्यांना कर्नाटकसारख्या ईतर राज्यांना उपदेशाचे डोस पाजण्याचा अधिकार उरत नाही. महाराष्ट्र आणि मराठीच्या थोरवी आणि ऐश्वर्याचा ईतिहास शासनकर्त्यांना माहिती नाही असे म्हणता येणार नाही. कारण सारेच नेते हे काही शाळेतून वरपास किंवा ढकलून पास झालेले नाहीत.परंतू सत्तेच्या अघोरी महत्वाकांक्षांनी त्यांना डोळे असून आंधळेपण आणि कान असून मतलबी बहिरेपण स्विकारण्याचा अप्रामाणिकपणा शिकविलेला आहे. त्यामुळे कोणत्या संघर्षातून काय उद्भवेल याची चिंता करण्याची गरज त्यांना वाटत नाही. पडलेल्या ठीणग्यांमध्ये माणसं जळतील,मेली तर माणसंच मरतील आणि जखमी झालीत तर कधीतरी सुधारतील. परंतू सत्तांकाक्षेच्या ध्येयसिध्दीचे यश प्राप्त करणे हे एकमेव ऑपरेशन त्यांच्यासाठी महत्वाचे असते.

मराठी- हिन्दीच्या या वादात अनेक मतीभ्रष्टांनी उडी घेतली. महाराष्ट्राच्या भरवशावर आपल्या पोटांची खळगी भरणारांच्या नेत्यांनी महाराष्ट्रालाच दुषणे लावण्याचा आगाऊपणा सुरू केला.त्यावर मात म्हणून सत्तेतल्या आणि विरोधकांतील नेत्यांनी दुबेला आपटून,पटकून मारू म्हणून पोकळ धमक्यांची दादागिरी पण सुरू केलेली आहे.दगडफेकीचे प्रकार आणि मारहाणीच्या घटना पण घडत आहेत. निशिकांत दुबेसारखे अनेक माथेफिरू वाचाळवीर ही भाजपाचीच अपत्ये आहेत. त्यामुळे या डरकाळ्या फोडणारांना वेसणं घालण्याची आवश्यकता भाजपला वाटू नये ही महाराष्ट्र आणि मराठी भाषेची होणारी फार मोठी प्रतारणा म्हणावी लागेल. आजकाल जन्मदाते बाप बाजुला ठेऊन सत्तेची मलाई चॉकलेटं देणाऱ्या नेत्यांनाच राजकीय बाप बनवण्याची नवी संस्कृती येथे उदयाला आलेली आहे. राजकारणासाठी काही पण.... करण्याच्या हव्यासातून बापाप्रमाणेच आपली मायमराठी बाजूला सारून राजकीय मतलबासाठी हिन्दी प्रेम आळवणे असा हा सारा कृतघ्नपणा आहे.प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच झाले पाहिजे असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अ.भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर म्हणतात. मग राज्य सरकारलाच ही सक्ती कशासाठी महत्वाची वाटत होती? आपण जनतेच्या मतांवर निवडून येतो,मग त्यांच्या भावनांचा आदर करणे हे प्रत्येक नेत्याचे सामाजिक कर्तव्य आहे.मग त्यातील मराठी भाषिकांवर अन्याय कशासाठी?

आमच्या उद्योगांच्या भरवशावर महाराष्ट्र आहे.महाराष्ट्रात काय आहे.... हे म्हणणाऱ्या भाजपच्या युपी आणि ईतर ठीकाणच्या बेकाबू वेड्यांनी येथील संस्कृतीचा आणि मराठीच्या प्राचिन ईतिहाहासाचा अगोदर अभ्यास करावा. महाराष्ट्राच्या शासनकर्त्यांनी सुध्दा या माथेफिरूंना करण्यास तो सांगावा. म्हणूनच या राज्याच्या नावात ''महा'' म्हणजे महानता आहे आणि शेवटी ''राष्ट्र'' म्हणजे उदात्त राष्ट्रभावना आहे. कोणतंही नाव अंगभूत कौशल्य आणि कर्तृत्वातून प्राप्त होत असते. हे या फालतू बडबड करणाऱ्यांना समजलं पाहिजे.मराठी भाषा आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीला देशातील सर्वात मोठा ऐतिहासिक वारसा आहे. अटकेपासून ओरिसातल्या कटकेपर्यंत मराठी साम्राज्य पसरलेले होते.तरीही सर्व प्रकारचे प्रांतिक,भाषावाद विसरून सर्व भावंडांना गुण्यागोविंदाची वागणूक देणारा महाराष्ट्र आहे.मानवतेवर आधारीत समतावाद निर्माण करणारे, संविधान, लोकशाही खऱ्या अर्थाने जगणारे आणि जगविणारे हे राज्य आहे. म्हणूनच उदात्त दृष्टीकोण बाळगणारे सर्वात लोकसंख्येने नव्हे, तर आदर्श जीवनमुल्ल्यांनी मराठी हिच प्राचिन भाषा आणि महाराष्ट्र हेच देशातील मोठे राज्य आहे.बडोद्याचे राजे हे मराठी होते. या प्राप्त प्राचीन थोरवीमुळे मराठी ही राष्ट्रीय भाषाच असली पाहिजे.

मराठी भाषेला ३ लाख वर्षापूर्वीचा ईतिहास आहे असं सांगीतलं जाते.एवढी जुणी आणि साऱ्या देशात विस्तारलेली ही भाषा आहे. तिच्यात सद्भावनांचा गोडवा आणि विविधतेत एकता साधणारा मायेचा विलक्षण जादुई आविष्कार आहे.म्हणून मध्यप्रदेशाची पण पूर्वी मराठी ही राजभाषा होती,आणि बहुसंख्य मराठी बांधव हे मध्यप्रदेशात राहतात. हिन्दीचा उदय हा १५० वर्षातला आहे तर मराठीचा ईतिहास हा ३ लाख वर्षांपूर्वीचा आहे. राममंदिराची निर्मिती उत्तरप्रदेशात जरी झालेली असली तरी महाराष्ट्र हिच प्रभू रामचंद्रांची मुळ भूमी आहे.रामायण - महाभारताची उत्पत्ती सुध्दा महाराष्ट्रातून झालेली आहे याचा उल्लेख ऋग्वेदात असल्याचे सांगीतले जाते. म्हणून ऐतिहासिक सत्य तेच वर्तमानातही सत्य म्हणून स्विकारले जावे.त्याला ईतर प्रांतियांनी मोठ्या मनाने प्रतिसाद द्यावा. सर्व भाषा शिकणे बोलणे, हा ज्ञानार्जनाचा आणि आयुष्यात विकासाच्या दिशेने जाण्यासाठी एक आवश्यक भाग आहे. आपण लोकशाहीतील स्वातंत्र्यात जगतो आहोत.प्रत्येकाला ईच्छेनुसार पाहिजे ते स्विकारण्याचं स्वातंत्र्य संविधानाने दिलेलं आहे.मग भाषावादात सक्तीचे घोडे का नाचविले जावेत? हिंदी भाषिकांच्या मतांवर डोळा ठेऊन जनतेच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणण्याचे काम महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी करू नये. भाषा आणि प्रांतवादाची कोलितं समाजविघातकांच्या हाती देऊन राजकीय लोणी खाण्याच्या महत्वाकांक्षांना आवर घालावा. सर्वसामान्य नागरीकांना मनस्ताप देऊ नये, हीच महाराष्ट्रहिताची अपेक्षा आहे!



लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

## उज्वल



भारताच्या राष्ट्रपतींनी
केले योग्य नामनिर्देशन
महाराष्ट्राच्या विधिज्ञानी
मिळविला खरा बहुमान

ह्या न्याय दानाच्या क्षेत्रात
उज्वल तुमची कामगिरी
अनेक क्लिष्ट प्रकरणात
दाखवली तुम्ही कर्तबगारी

सर्व सामान्य माणसाला
न्याय दिला तुम्ही खास
त्या देशद्रोही कसाबला
लटकवला अखेर फास

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

गीता बायबल
वा वाचा कुराण ।
व्यर्थ जाते ज्ञान
अहं येता ॥

अहंकार चक्र
उलटे फिरते ।
डोक्यातून जाते
तळपायी ॥

अहंकार माझा
भलताच धोड ।
माझा मला गोड
वाटे सदा ॥

अहंकार आहे
खेकड्या सारखा ।
ओढतो सारखा
मागे मागे ॥

# एआयची कमाल! 'टायटॅनिक'च्या रोमँटिक सीनमध्ये दिसले माधुरी दीक्षित आणि सलमान खान




एआयमुळे कल्पनाशक्तीमधील गोष्टी प्रत्यक्षात पाहता येतात. सध्या एआयमुळे अनेक गोष्टी सोप्या होताना दिसत आहेत. माहिती मिळवण्यापासून काही क्रिएटिव्ह गोष्टी तयार करण्यासाठी एआयचा वापर केला जात आहे. आता सोशल मीडियावर असाच एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ हॉलीवूडच्या 'टायटॅनिक' चित्रपटातील सीन आहे. आता या सीनची इतकी चर्चा होण्याचे कारण म्हणजे चित्रपटातील मूळ कलाकार नाही तर बॉलीवूडचे दोन लोकप्रिय चेहरे या व्हिडीओमध्ये दिसत आहेत. हे दोन लोकप्रिय कलाकार म्हणजे माधुरी दीक्षित आणि सलमान खान हे आहेत. 'टायटॅनिक' हा जगभर गाजलेला चित्रपट आहे. या चित्रपटातील काही सीन मोठे लोकप्रिय ठरले होते. यामध्ये लिओनार्डो डिकॅप्रियो आणि केट विन्सलेट यांनी प्रमुख भूमिकेत काम केले होते. मात्र, एआयद्वारे तयार केलेल्या या व्हिडीओमध्ये या कलाकारांऐवजी सलमान खान व माधुरी दीक्षित दिसत आहे.

माधुरी रोझ या भूमिकेत तर सलमान जॅक या भूमिकेत दिसत आहे. रोझ व जॅक यांच्यातील रोमँटिक, भावनिक सीन या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहेत. त्यामुळे सोशल मीडियावर हा व्हिडीओ धुमाकूळ घालताना दिसत आहे. चाहते या व्हिडीओला भरभरून प्रतिसाद देताना दिसत आहेत. माधुरी व सलमान यांच्याबरोबरच सिमी गरेवाल, आमिर खान, अनुपम खेर, नसरुद्दीन शाह, असे अनेक कलाकारदेखील दिसत आहेत.हा व्हिडीओ अनधिकृत आणि एआयने तयार केलेला असला तरी तो उत्तमरित्या तयार केल्याचे चाहते कमेंट करत म्हणत आहेत.सलमान खान व माधुरी दीक्षित ही जोडी 'साजन', 'दिल तेरा आशिक' या चित्रपटांत एकत्र दिसली होती. सलमान खानच्या कामाविषयी बोलायचे तर अभिनेता सिंकदर या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. मात्र, या चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसले. आता अभिनेता कोणत्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# 'आमचे आधीच ठरलेले'; 'वेड' चित्रपटाचा दुसरा भाग येणार-जिनिलीया देशमुख



२०२३ मध्ये आलेल्या रितेश देशमुखच्या 'वेड' या मराठी चित्रपटाने अनेक प्रेक्षकांना वेड लावलं होतं. या चित्रपटाद्वारे रितेश दिग्दर्शनात पदार्पण केलं होतं. शिवाय याच चित्रपटातून त्याची पत्नी आणि अभिनेत्री जिनिलीयाने मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केलं होतं. 'वेड' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई तर केलीच; शिवाय अनेक पुरस्कार सोहळ्यांमध्येही आपलं वर्चस्व गाजवलं. 'वेड' हा चित्रपट २०१९ मध्ये आलेल्या 'मजिली' या चित्रपटाचा रिमेक होता. 'वेड' चित्रपटातील गाणी, संवाद तसंच रितेश-जिनिलीया यांच्यातील केमिस्ट्रीमुळे आजही हा चित्रपट अनेकांचा आवडता आहे.

'वेड'च्या भरघोस यशानंतर अनेकांनी रितेशला या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाबदल विचारणा केली होती. अशातच आता स्वत: जिनिलीयाने 'वेड २'बद्दल प्रतिक्रिया दिली आहे. अभिनेत्रीने नुकत्याच एका मुलाखतीत 'वेड २'वर काम सुरू असून लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचं म्हटलं आहे.'वेड २'बद्दल 'मिरर'शी साधलेल्या संवादात जिनिलीया देशमुख म्हणाली, ''सध्या मी आणि रितेश आम्ही दोघंही आमच्या वैयक्तिक प्रोजेक्ट्समध्ये व्यग्र आहोत. पण वेळ मिळाल्यावर आम्ही नक्कीच पुन्हा एकत्र काम करू. 'वेड २' ठरलेलंच आहे! त्याला थोडा वेळ लागू शकतो, कदाचित एक किंवा दोन वर्ष. पण प्रेक्षक सतत याबद्दल विचारत असतात; त्यामुळे हा चित्रपट नक्की होणार.''यापुढे तिने असंही सांगितलं की, '''वेड' फक्त प्रेक्षकांच्याच नव्हे; तर आमची मुलं रिआन आणि राहील यांच्याही खूप पसंतीस उतरला. आम्ही त्यांना 'वेड' आणि 'धमाल' हे चित्रपट दाखवले आहेत.

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 101



## हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
- कद
- कान
- जरी
- तग
- तरू
- तव
- ताक
- दान
- धन
- पाक
- पावा
- मज
- भला
- यम
- वसा
- शुक्र
- शुद्ध
- सर
- सह
- साक्ष
- हाक

**तीन अक्षरी**
- कणाद
- कनक
- कमळ
- कवच
- कसर
- कामना
- काळीमा
- कॉलरा
- गजर
- गिरणी
- चमक
- डहाळी
- तपन
- तमस
- तमाशा
- दरड
- दामाद
- दामिनी
- प्रसाद
- प्रस्तर
- बिऱ्हाड
- भरीत
- मकर
- ममता
- मळका
- माकड
- माहेर
- मुदत
- रतन
- लायक
- विनय
- विद्वान
- शारदा
- शालक
- सहारा
- साक्षर

**चार अक्षरी**
- अवतार
- काकरव
- खरवड
- दरम्यान
- दशानन
- नीरवता
- परवड
- प्रसाधन
- भारदस्त
- मतदान
- मसलत
- रुजवात
- सभासद
- सुनमुख
- हावभाव
- हेरगिरी

**पाच अक्षरी**
- केविलवाणा
- महाप्रसाद
- महाभारत
- हातचलाखी

**सहा अक्षरी**
- दाम करी काम
- नमक हराम
- सुदर्शन चक्र

(उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 482



**आडवी विधानेः–**

1) नशिबात लिहिलेली व कधी न टळणारी गोष्ट
4) निरीक्षण, परीक्षा, देखरेख
6) विरुद्ध पक्षाच्या वकिलाने साक्षीदाराला उलट प्रश्न विचारणे
10) मनाची अस्थिरता
12) क्षण, सेकंद (हिं).
13) बुद्धिबळाच्या खेळात शत्रूच्या राजाचा हत्ती, घोडा इ. नी प्रतिबंधा केला असता होणारा डाव
15) पावसाची आतुरतेने वाट बघणारा एक पक्षी
17) अर्धांग वायू, एक अशी व्याधी ज्यात अर्धे अवयव निकामी होतात
18) बौद्ध धर्मीयांचे एक तीर्थक्षेत्र
20) पक्ष्यांची किलबिल
22) चोवीस कागदांचा एक दस्ता याप्रमाणे वीस दस्त्यांचे पुडके
23) उत्कृष्ट दर्जाचे एक लाकूड
24) येशु ख्रिस्त
26) रुळणे, सवय होणे
28) पैसा, संपत्ती
30) उपकाराची पूर्तता करणे
33) पर्ण, तांबुल
35) एक द्विदल धान्य
36) उच्च मर्यादा पार करणे
38) श्रीगणेश, गणपती
39) मुख्य, श्रेष्ठ (उर्दू)
41) ऐवज, द्रव्यसंख्या
42) ढीग, श्रीकृष्णाने गोपिकांसवे केलेले नृत्य
44) थंड, शीतल
46) चांदी
48) झुंज, डोक्याला डोके भिडणे,
50) रात्री प्रकाशणारा किडा
52) प्रकाशणे, चकाकणे
54) दुष्ट, वाईट प्रवृत्तीचा मनुष्य
56) पाहुणा
57) दिव्याची ज्योत
58) आश्चर्यचकित होणे
59) लक्ष्मी 62) पराभव
63) गोंगाट, जोराचा आवाज, गडबड
65) टिकाव, निभाव
66) घोड्याच्या पाठीवरचे जीन
68) एकात एक गुंतलेले केस
69) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा
71) मुंबईतील एक उपनगर
73) बारा वर्षाची मुदत
75) पळवून नेणे
76) गर्दभ, गाढव 77) लहान
79) एक प्रसिद्ध मराठी नाटक, नटात श्रेष्ठ
80) अल्प, कमी
81) लहानपणचे संस्कार, बाळपणी देण्यात येणारी एक औषधी
83) आपली कला प्रकट करणारा
85) सांखळी,
86) सर्पणाची लाकडे मिळण्याचे दुकान
87) विध्वंस, नष्ट 88) गणपती
89) आजारी,, व्याधीने ग्रस्त

**उभी विधानेः–**

1) अविवाहीत मनुष्य
2) प्राणायाम करतांना आंत घेतलेला श्वास बाहेर सोडणे
3) कातडे, बाहेरची त्वचा (हिं.)
4) पचविणारे
5) मिठाई तयार करुन विकणारा
6) वैराग्य, पश्चाताप
7) सुंदर स्त्री
8) काळजी, फिकीर
9) पाप, दुष्कर्म
11) मिठी मारणे, कवटाळणे
14) दक्ष, जागृत
16) अंधार, अंधःकार
19) थकलेले, येणे असलेली राशी
21) विवाह
23) व्याजाने कर्जाऊ रकमा देणारा
25) साधना करणारा
27) एक दशरथ पुत्र
29) डंका, नौबत
30) कमी
31) क्रोध, संताप
32) एकच गोष्ट क्रमाने तीन वेळा घडणे
33) पानाला पीठ लावून निखाऱ्यावर भाजलेली भाकरी
34) म्हातारपण
36) कागदावर दिसणे, स्पष्ट होणे 37) खोकला, ढांस
40) न्यायाधीश (इं.)
43) व्देष, मत्सर
45) गुप्त गोष्ट, गूढ
47) समशेर, खड्ग
49) राखण करणारा
51) सीतेचा पिता
53) सापाने टाकलेली त्वचा
55) दैव, नशीब (इं.)
56) हळूच, इकडे तिकडे स्पर्श न होता
58) चढाओढ, प्रतिस्पर्धा, समोर जाण्याची प्रवृत्ती
60) निवडणुकीतील एक दिवसाचा राजा
61) गीताला चढविलेला वाद्यांचा साज
62) बाजार
64) हाकेस दिलेली साद
67) चापट किंवा मऊ पदार्थाचा आघात
68) राणीवसा
70) युद्धभूमी 72) रसभरीत, चवदार
74) नवऱ्याचा मोठा भाऊ
75) गुंतून किंवा अडकून पडणे
76) जोराचे भांडण
78) अपुऱ्या किंवा चपट्या नाकाचा
81) लहान मुलांचा नामकरणविधी
82) बसल्या – बसल्या येणारा झोपेचा झटका
84) मृतदेह (हिं.)

## मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# राशी-भविष्य

**मेष :** तुम्हाला वाटेल की वेळ अनुकूल आहे. कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने काही मोठे काम करता येईल. मालमत्तेशी संबंधित प्रकरणे सोडवता येतील.

**वृषभः** दिवसाच्या सुरुवातीला आळसामुळे काहीही न करण्याचे तुम्हाला वाटेल. महत्त्वाची कामे प्राधान्याने पूर्ण करा.

**मिथून :** कारखान्यात नवीन यंत्रसामग्री बसवल्याने नफा होईल. वेळ तुम्हाला स्वतःची आणि इतरांची ओळख पटवेल. जोडीदाराच्या वागण्यात बदल होईल.

**कर्क :** तुमच्या चंचलतेमुळे नातेसंबंध कमकुवत होतील. कोणतेही काम करण्यापूर्वी ते समजून घ्या आणि त्यासाठी समर्पित राहा, तरच तुम्ही यशस्वी व्हाल.

**सिंह :** कामे वेळेवर पूर्ण करा. तुमच्या स्वतःच्या जमिनीशी संबंधित काम बराच काळ अडकले आहे, तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करत आहात.

**कन्या :** कोणतेही काम करण्यासाठी आत्मविश्वास असला पाहिजे. धाडसामुळे मोठे यश मिळेल. घरगुती खर्च वाढतील.

**तुळ :** कामात अडथळे येऊ शकतात. वारंवार बिघडणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी वास्तुनुसार तुमच्या कामाच्या ठिकाणी बदल केल्याने तुम्हाला फायदा होईल.

**वृश्चिक :** शुभ कामांमध्ये खर्च होईल. विरोधक सक्रिय असतील. व्यवसायाचा विस्तार होईल. नवीन मित्र बनतील. धार्मिक कामांमध्ये रस वाढेल.

**धनु :** कौटुंबिक सुसंवाद राहील. नातेवाईकाच्या मदतीने काम पूर्ण होईल. व्यवसायात बदल होण्याची शक्यता आहे.

**मकर :** तुम्ही तुमच्या व्यवसायावर खूश नाही आहात, कालांतराने परिस्थिती तुमच्यासाठी अनुकूल होईल. जोडीदाराच्या वागण्यामुळे तुमचे मनोबल वाढेल.

**कुंभ :** सहकाऱ्यांशी बोलण्यात सौम्यता बाळगा. परदेशात व्यवसाय सुरू करण्याचा विचार यशस्वी होईल. नोकरी बदलण्याची शक्यता आहे. एखाद्याच्या शिफारशीने काम करता येईल.

**मीनः** हा काळ फायदेशीर आहे. उद्देशपूर्ण प्रवास फायदेशीर ठरेल. आज महत्वाचे करार होऊ शकतात.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# थोडक्यात

## पार्डी(देवी) रेल्वे गेट भुयारी मार्गाचे पाणी काढून मार्ग सुरु करावा-खा.बळवंत वानखडे



**अंजनगाव बारी:**अंजनगाव बारी ते पार्डी (देवी) भुयारी मार्गचे पाणी काढण्याची व्यवस्था रेल्वे प्रशासनाकडे असुन शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरल्याने याला जबाबदार रेल्वे प्रशासन असुन शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास व पार्डी (देवी) भुयारी मार्ग पुर्ववत सुरू न केल्यास रेल्वे प्रशासना विरोधात लोकसभेत प्रश्न उपस्थित करू असे अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर सांगितले तसेच रेल्वे प्रशासनानेही एका महिन्यात ही समस्या सोडवणार असल्याचे सांगितले.

माजी आमदार विरेंद्र जगताप, प्रा.शैलेश गवई,सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष गुलामनबी इंदलेकर माजी सरपंच पार्डी तसेच महिला आघाडी अध्यक्ष रक्षणा सरदार, पोलीस पाटील नितीन बेंडे , राजू पिसे, गिरीश सोनोने, अमोल चंदने, संजू ढेंबरे, संघपाल सरदार, देविदास ढेंबरे, साहेबराव ढेंबरे आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पार्डी येथील उपसरपंच प्रतिभा बनसोड, किशोर ढेपे, अशोक ढेम्बरे, प्रविण ढेंबरे, सुरज हटवार, साहेबराव हटवार, सुरेश इंदाणे, डॉ. बाबाराव ढेंबरे, संघशील बळगे, राहुल ढेंबरे, तुकाराम चव्हाण, घनश्याम ब्राह्मणे, संजय नितनवरे, किशोर कोरडे, चंद्रकांत महल्ले, प्रकाश खंडार, गणेश सुरजुसे तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला आघाडीच्यावतीने खा.अरविंद सावंत यांचा सत्कार



**दर्यापूर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा परिषद,पंचायत समिती, महानगर पालिका व नगर परिषद आढावा व नियोजन मेळावा रविवार, दि. १३ जुलै २०२५ सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे संपन्न झाला त्या मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक खासदार अरविंद सावंत शिवसेना नेते तर प्रमुख उपस्थिती म्हणून नितीन बाप्पू देशमुख शिवसेना उपनेते तथा बाळापुर विधानसभा आमदार व गजानन लवटे आमदार दर्यापूर विधानसभा मतदार संघ हे होते त्यावेळी शिवसैनिक यांनी शिवसेना पक्ष वाढवण्यासाठी मेहनत करावी व उध्दव बाळासाहेब ठाकरे यांचे हात बळकट करा असे आवाहन खा. अरविंद सावंत यांनी केले त्यावेळी महिला आघाडी च्या वतीने खा.अरविंद सावंत यांचे स्वागत करण्यात आले त्यामध्ये शिवसेना महिला आघाडी सहसंपर्क प्रमुख प्रतिभाताई बोपशेट्टी, समन्वयक आसावरीताई देशमुख, महिला आघाडी अमरावती जिल्हाप्रमुख सौ अलका निलेश पारडे, महिला आघाडी अंजनगाव तालुका प्रमुख संगीताताई तूरखडे, अंजनगाव शहर प्रमुख वर्षाताई भोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा हिंगोलीत निषेध

**हिंगोली:** संभाजी ब्रिगेडचे प्रविण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे काही समाज कंटकांनी भ्याड हल्ला केला. या घटनेचा समविचारी बांधवाच्या वतीने जाहिर निषेध व्यक्त करुन सुत्रधारकांना अटक करावी अशी मागणी सोमवारी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. सामाजिक चळवळीमध्ये योगदान असलेले महाराष्ट्रातील अभ्यासू व्यक्तीमत्व संभाजी ब्रिगेडचे प्रविण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट जि. सोलापुर यांच्यावर काही माथेफेरू समाज कंटकांनी, भ्याड हल्ला करून काळे फासले आहे. ही घटना अत्यंत निंदनीय असून यातुन 'छत्रपती शिवराय, शाहू, फुले, आंबेडकर विचाराना दाबण्याचा पर्यंत होत आहे. या निंदनीय घटनेचा तिव्र निषेध व्यक्त करण्यात आला.महाराष्ट्रात अशा घटना होत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## निधन वार्ता

### मनोज मकासरे



**अकोला:** खदान, ख्रिश्चन कॉलनी, अकोला येथील प्रतिष्ठित नागरिक मनोज मनुवेल मकासरे (वय ५८) यांचे रविवारी दुपारी दु:खद निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी दुपारी सिंधी कॅम्पमधील ख्रिश्चन स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील आणि समाजातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. मनोज मकासरे यांच्या पश्चात पत्नी सुनिता, मुले समीर आणि सागर तसेच मुलगी नेहा, जावई, सून नातवंडे आणि बराच मोठा आप्त परिवार आहे.

# 'सातबारा कोरा' आंदोलन निर्णायक टप्प्यावर

## आंबोडा येथे ऐतिहासिक सभा, २४ जुलै रोजी महाराष्ट्र बंदचा एल्गार!





**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**आंबोडा , दि. १४ :** शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठीचा सातबारा कोरा कोरा लढा आता निर्णायक वळणावर पोहोचला आहे. १४२ किलोमीटरचा संघर्षपूर्ण प्रवास पार करून हजारो शेतकरी आणि शेतमजूरांनी आंबोडा येथे ऐतिहासिक सभा घेतली. या सभेने सरकारला थेट इशारा दिला ''आता मागे हटायचं नाही, लढा अंतिम विजयापर्यंत सुरूच राहणार!''

जात, धर्म, पंथ विसरून, ''आम्ही शेतकरी आहोत'' या एकाच ओळखीवर एकवटलेले शेतकरी स्वाभिमानासाठी उभे ठाकले.

**बच्चू कडू यांचा आक्रमक पवित्रा**

**शासनाच्या धोरणांवर सडकून टीका**

आंदोलनाचे प्रमुख नेतृत्व करणारे आमदार बच्चूभाऊ कडू यांनी सरकारवर ताशेरे ओढत सांगितले. ''राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत, आणि सरकार मात्र आंधळेपणाचं सोंग घेतंय!''

२४ जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्र बंद आणि चक्काजाम आंदोलन जाहीर करत त्यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, ''शासनाला गुडघ्यावर आणल्याशिवाय मागे हटायचं नाही.'' राजकीय आणि सामाजिक पातळीवर पाठिंबा वाढतोय

सभेला उपस्थित असलेले आ. रोहित पाटील यांनी आंदोलनास उघड पाठिंबा देत म्हटले, बच्चू कडू यांच्या शेतकरी कर्जमुक्तीच्या लढ्याला मी तन-मन-धनाने साथ देतो.'सत्यपाल महाराज यांनीही ठामपणे सांगितले, आजच्या घडीला शेतकऱ्यांना वाचवू शकतो तो एकच बच्चूभाऊ कडू!''

### महामार्ग ठप्प; ट्रॅक्टरचा महासागर आंदोलनात उतरला

नागपूरकोल्हापूर राज्य महामार्गावर तब्बल तीन तास चक्काजाम करून शेकडो ट्रॅक्टरसह शेतकरी रस्त्यावर उतरले. लाटा, काटा, रुमणे घेऊन आंदोलकांनी शासनाच्या अन्यायाचा हिशोब मागितला. या रोषपूर्ण आंदोलनामुळे सरकारच्या हालचालींना वेग आला असला, तरी शेतकऱ्यांची संतप्त ऊर्जा पाहता लढ्याची तीव्रता कमी होण्याची शक्यता नाही.

### 'हे आंदोलन मागण्यांसाठी नाही; हे आहे स्वाभिमानासाठी'

'सातबारा कोरा' ही घोषणा आता केवळ घोषणा राहिलेली नसून ती जनतेचा आवाज आणि शासनासाठी थेट आव्हान बनली आहे. २४ जुलैचा चक्काजाम महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरा देईल, असा विश्वास या सभेतून प्रकट झाला.

## गंगानगरातील सुविधांअभावी संताप : सत्ताधारी पक्षाच्या युवक उपाध्यक्षांचा 'झोपा काढा आंदोलन' इशारा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला , दि. १४ :**अकोला शहरातील गंगानगर १ व २ परिसरात गेल्या दोन वर्षांपासून मूलभूत सुविधांचा अभाव असून, प्रशासनाने वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे अकोला महानगर उपाध्यक्ष अब्दुल नईम यांनी सोमवार, १४ जुलै २०२५ रोजी महापालिका आयुक्तांना निवेदन देत 'झोपा काढा आंदोलन' करण्याचा इशारा दिला आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून गंगानगर परिसरात पाणी, गटार, रस्ते, वीज आणि सफाई यासारख्या मूलभूत सुविधांसाठी नागरिक प्रशासन दरवाजा झिजवत आहेत. परंतु समस्यांचे जैसे थे स्थितीत रूपांतर झाले असून, सत्ताधारी पक्षाशी संबंधित व्यक्तीलाही आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे, हे प्रशासनाच्या अपयशाचे लक्षण मानले जात आहे. नईम यांनी निवेदनात स्पष्ट केले की, येत्या आठवड्यात प्रशासनाने ठोस निर्णय न घेतल्यास, महानगरपालिका परिसरात लोकशाही मार्गाने 'झोपा काढा आंदोलन' करण्यात येईल. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीस पूर्णतः प्रशासन जबाबदार राहील, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच महापालिकेविरुद्ध आंदोलनाचा इशारा द्यावा लागतो, ही बाब अकोल्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरत आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे वेळेवर लक्ष न दिल्यास अशा प्रकारचे जनआंदोलन पुढे वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.याप्रसंगी परिसरातील नसीम खान, रऊफ शेख, शेख हारून, शेख इरशाद, शेख अफगान ,शेख शब्बीर, उमर अंसारी ,शेख शाकीर,जावेद मिर्जा, आरिफ शाह, सुफियान शेख, मोहम्मद हनीफ, मोहम्मद माज, मोहम्मद जावेद, सुफियान शेख, आदिसह अनेक नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## पुरामुळे खरडली कोवळी पिके; अनेकांपुढे दुबार पेरणीचे संकट



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**गडचिरोली , दि. १४ :** गेल्या आठवडाभरापासून जिल्ह्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती आता बऱ्याच अंशी निवळली आहे. शुक्रवारी संध्याकाळपर्यंत बंद असलेले ५ मार्गही पूर्ववत सुरू झाले आहेत. मात्र नदी-नाल्यांच्या परिसरातील शेतांमधील कोवळे धानपीक पुराच्या पाण्याने खरडून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आता नुकसानीच्या पंचनाम्यांना वेग येणार आहे.

सर्व शेतकऱ्यांनी धानाचे पऱ्हे टाकले होते. अर्ध्याअधिक शेतकऱ्यांची रोवणीही आटोपली होती, तर काही शेतकरी बांधीत पुरेसे पाणी जमा होण्याची प्रतीक्षा करत होते. पण पावसाने उसंतच घेतली नाही. त्यातच मोठ्या प्रमाणावर गोसीखुर्दचे पाणी सोडल्याने सर्वत्र पूरपरिस्थिती निर्माण झाली. अनेक शेतात आठवडाभर पाणी जमलेले असल्याने धानाचे कोवळे रोप सडले. त्यामुळे लागवड खर्चासह रोपांना दिलेले खतही वाया गेल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले. अशा स्थितीत आता दुबार पेरणी करण्यासाठी पऱ्हे टाकण्याची वेळ निघून गेल्याने शेतकऱ्यांना आवते पद्धतीने धानाची पेरणी करावी लागणार आहे.

### पुरात वाहून गेलेल्याचा मृतदेह सापडला

आरमोरी तालुक्यातल्या कुरंजा गावातील राजू विश्वनाथ तुमराम (४५ वर्ष) हे नाल्याच्या पुरात वाहून गेले होते. त्यांचा मृतदेह देलोडा खुर्द गावाजवळील शेतालगतच्या झुडूपात आढळला. ते ८ जुलै रोजी बांधकामावरील मजुरीचे काम आटोपून सायकलने आपल्या गावाला जात असताना वडधा ते देवीपूर मार्गावरच्या नाल्याच्या पुरात सायकलसह वाहून गेले होते.

## फसव्या घोषणा करणाऱ्या सरकारला अधिवेशनात जाब विचारणार - आ. साजिद पठाण



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला , दि. १४ :**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या बेरोजगार युवक-युवतींचा प्रशिक्षण कालावधी आता संपत आला असून, या प्रशिक्षणार्थ्यांमध्ये पुढील भवितव्याबाबत अस्वस्थता निर्माण झाली आहे. ''आम्हाला प्रशिक्षण नको, आता कायमस्वरूपी रोजगार द्या'' असा जोरदार आवाज देत राज्यभरातील हजारो प्रशिक्षणार्थींनी आज मुंबईतील आझाद मैदानावर छत्री आंदोलन केले.

अतिवृष्टीच्या परिस्थितीत देखील प्रचंड संख्येने उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. या आंदोलनाला काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी भरघोस पाठिंबा दिला. अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांना आश्वस्त केले की, ''मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील सर्व प्रशिक्षणार्थ्यांचा प्रश्न पावसाळी अधिवेशनात प्रभावीपणे मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष खंबीरपणे त्यांच्यासोबत उभा राहील.'' या आंदोलनात सरकारवर तीव्र शब्दांत टीका करताना आमदार पठाण म्हणाले की, ''महायुती सरकारने केवळ निवडणूकपूर्व मतांसाठी बेरोजगार युवक-युवतींचा वापर केला असून, आता त्यांना दुर्लक्षित केले जात आहे. हे केवळ आश्वासनाचे नाटक असून, सरकारने बेरोजगारांच्या भावनांशी विश्वासघात केला आहे. या फसव्या सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे.'' आंदोलनात युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांचे प्रमुख नेते माजी खासदार हरिभाऊ राठोड, बालाजी पाटील चाकूरकर, हभप श्री संत तुकाराम बाबा महाराज, अनुप चव्हाण, प्रकाश साबळे यांसह गुड्डू पठाण, मो. मोईन उर्फ मंटूभाई, रिजवान खान, खिजर नवाब आणि महाराष्ट्रभरातून आलेले हजारो प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

## पोलीस शिपाई सौरव घोगरे यांचे निधन



**अकोला:** अकोला जिल्ह्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई सौरव पद्माकर घोगरे (बक्कल नं. ४१) यांचे दिनांक १३ जुलै २०२५ रोजी रात्री १०:३० वाजता नागपूर येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दु:खद निधन झाले. त्यांचा रविवारी अकोला ते पातुर मार्गावर दुचाकीचा अपघात झाला होता या अपघातात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांना नागपूर येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. त्यांच्या निधनामुळे पोलीस दलात आणि मित्रपरिवारात शोककळा पसरली आहे. अंत्यविधीचा कार्यक्रम त्यांचे मूळ गाव भरतपुर (ता. बाळापुर) येथील त्यांच्या शेतात (भरतपुर ते वाडेगाव रोड) दिनांक १४ जुलै २०२५ रोजी पार पडला.

## विकास, करवाढ आणि अन्यायाविरोधात आपचे उपोषण; नेत्यांना थेट आव्हान

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला , दि. १४ :** अकोला महानगरपालिका समोर आम आदमी पार्टी (आप)च्या वतीने सुरू असलेल्या साखळी उपोषणाला आता राजकीय रंग चढू लागला आहे. महानगर अध्यक्ष अल्हाज मसुद अहमद खान यांनी पालकमंत्री, खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आ.साजीद खान पठाण व आ.नितीन देशमुख यांना पत्र पाठवून जनतेच्या हितासाठी पक्षपात विसरून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

दि. ७ जुलै २०२५ पासून अकोला मनपा समोर सुरू असलेलं साखळी उपोषण शहराच्या विकासासोबतच नागरिकांच्या मूलभूत गरजांसाठी आहे. यात शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, आणि सर्वसामान्य नागरिकांवर लादण्यात आलेली सन २०१७ पासूनची भरमसाठ करवाढ रद्द करणे यासारख्या नऊ मुख्य मागण्या समाविष्ट आहेत. या आंदोलनाची दखल घेत खान यांनी जनतेचे निवडून आलेले प्रतिनिधी म्हणून संबंधित लोकप्रतिनिधींना पत्राद्वारे विनंती केली आहे की त्यांनी पक्षभेद बाजूला ठेवून शासन स्तरावर या मागण्या मान्य होण्यासाठी प्रयत्न करावेत, मसुद अहमद खान यांनी आपल्या पत्रात नमूद केलं आहे की, आपल्यावर जनतेच्या हितासाठी काम करण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे आमच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन अकोल्याच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्न व्हावेत.

सदर पत्रासोबत ७ जुलै रोजी मनपा प्रशासनाला देण्यात आलेले मागणीपत्रही जोडण्यात आले आहे. तसेच माजी महापौर विजय अग्रवाल आणि माजी विरोधी पक्षनेते डॉ. झीशान हुसेन यांनाही प्रत पाठवून योग्य कार्यवाहीची विनंती करण्यात आली आहे.आप च्या आंदोलनाला आता सर्वपक्षीय पाठिंबा मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सुभाष चांडक 'भारत भूषण अवॉर्ड'ने सन्मानित

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

### रामदास आठवले यांनी केला गौरव



**अकोला , दि. १४ :**नवी दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशनल क्लब हॉलमध्ये नुकत्याच संपन्न झालेल्या अवॉर्ड सोहळ्यात समाजसेवी सुभाषचंद्र चांडक यांचा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते अत्यंत प्रतिष्ठेच्या डॉ बी. आर. आंबेडकर भारत भूषण एक्सलन्स अवार्ड २०२५ ने सन्मानित करण्यात आले. सुभाषचंद्र चांडक यांच्या सेवाभावी उल्लेखनीय कार्याचा इतिहास बघता ज्यामध्ये २१९६ मोफत हार्ट सर्जरी मुंबईचे जे जे हॉस्पिटलचे डॉ एस ए पोटवार, डॉ के एन भोसले,डॉ अंबरीश खटोड यांच्याकडून मोफत हार्ट सर्जरी मेन हॉस्पिटल अकोला,जे जे हॉस्पिटल मुंबई,माऊली डायलिसिस एन्ड हार्ट केअर सेंटर शेगाव व वेगवेगळ्या ठिकाणी केली.तसेंच विशाखापट्टणम चे डॉ आदीनारायण राव यांच्या कडून अकोला येथे २३४ रुग्णांची पॉलिओ सर्जरी करून त्यांना नवीन जीवन देऊन सुभाष चांडक यांनी इतिहास घडविला.तसेच त्यांनी लायन्स क्लब ऑफ अकोला मिडटाऊन द्वारे इतर अनेक सामजिक उपक्रम राबविलेत. करीता त्यांना यावेळी विशेष अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी मंचावर निमंत्रित करून त्यांच्या हस्ते भारतभरातून आलेल्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा अवॉर्ड देऊन सन्मान करण्यात आला.या सोहळ्यासाठी केंद्रीय आयुष्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनाही आमंत्रित करण्यात आले होते.

### सुभाष चांडक अनेक पुरस्काराने सन्मानित

सुभाष चांडक यांना यापूर्वी ही अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.या अगोदर त्यांना दोन वेळा महाराष्ट्र शासन द्वारा राज्यपाल यांच्या हस्ते दहा हजार रुपये रोख व सन्मानपत्र, तसेच स्व. वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान पुसदचा पुरस्कार, इंडियन असोसिएशन ऑफ बँकॉक(थायलंड) दोन वेळा इंडियन रेडक्रॉस सोसायटीचा पुरस्कार, तीन वेळा माहेश्वरी समाज ट्रस्ट अकोलाचा पुरस्कार, दोन वेळा विश्व सिंधी सेवा संगमचा पुरस्कार, भारतीय स्टेट बँक अकोला,राष्ट्रीय केमिकल अँड फर्टीलायझर मुंबई, नारायण सेवा संस्थान उदयपूर,लायन्स इंटरनॅशनल,लायन्सचा लाइफटाइम अचीवमेंट अवॉर्ड,मल्टिपल, डिस्ट्रिक्ट, रिजन, झोन यांचे अनेक वेळा पुरस्कार मिळाले आहेत. सुभाष चांडक यांच्या या उपलब्धीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



चौथ्या सेटमध्ये कार्लोस अल्काराझने कमबॅक केलं होतं. पण सिनरचा चॅम्पियनसारखा खेळ पाहून कार्लोस अल्काराझला माघार घ्यावीच लागली. चौथा सेटही सिनरने ६-४ ने आपल्या नावावर केला. यासह हा सामना ४-६,६-४,६-४-६-४ ने जिंकून पहिल्यांदाच विम्बल्डन चॅम्पियन होण्याचा मान पटकावला.

# सिनर विम्बल्डनचा राजा!

## कार्लोस अल्काराझला नमवीत पटकाविला जेतेपदाचा मान

टेनिस विश्वात सर्वात मानाची स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विम्बल्डन २०२५ स्पर्धेचा अंतिम सामना रविवारी पार पडला. या स्पर्धेतील पुरुष एकेरी प्रकारातील अंतिम सामन्यात कार्लोस अल्काराझ आणि जेनिक सिनर हे दोन्ही स्टार खेळाडू आमनेसामने आले होते. दोन्ही खेळाडूंमध्ये जेतेपदासाठी जोरदार लढत पाहायला मिळाली. दरम्यान या सामन्यात शेवटी जेनिक सिनरने बाजी मारत पहिल्यांदाच विम्बल्डन चॅम्पियन होण्याचा मान पटकावला आहे.

हा सामना दोन्ही खेळाडूंसाठी अतिशय खास होता. कारण याआधी फ्रेंच ओपन २०२५ स्पर्धेतील अंतिम सामन्यातही दोन्ही खेळाडू जेतेपदासाठी आमनेसामने आले होते. या सामन्यातही जेनिक सिनरला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. पण शेवटी कार्लोस अल्काराझने दमदार कमबॅक केलं आणि अविश्वसनीय विजयाची नोंद केली होती. त्यामुळे विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना हा केवळ जेतेपद जिंकण्याची संधी नसून पराभवाची व्याजासह परतफेड करण्याची संधी होती. या संधीचा दोन्ही हातांनी स्वीकार करत सिनरने अंतिम सामन्यात अल्काराझवर ४-६,६-४,६-४,६-४ ने विजय मिळवत जेतेपदाचा मान मिळवला. कार्लोस अल्काराझ हा दोन वेळचा चॅम्पियन खेळाडू आहे. त्यामुळे जेनिक सिनरकडे दोन वेळचा चॅम्पियन खेळाडूला पराभूत करून पहिल्यांदाच विम्बल्डन चॅम्पियन होण्याची संधी होती. सिनरने संपूर्ण सामन्यात कार्लोस अल्काराझला बॅकफूटवर ठेवलं.

सिनरला पहिला सेट गमवावा लागला होता. पण त्यानंतर सिनरने दमदार कमबॅक केलं आणि मग मागे वळून पाहिलंच नाही.दुसऱ्या सेटमध्ये सिनरने कमबॅक केलं आणि ६-४ ने विजय मिळवला. त्यानंतर तिसऱ्या सेटमध्येही ६-४ ने विजय मिळवला.




# सिराजला 'लॉर्डस'वरील आक्रमकता पडली महागात;आयसीसीने ठोठावला आर्थिक दंड

**नवी दिल्ली: दि. १४ प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजवर दंडात्मक कारवाई केली आहे. रविवारी (दि. १३) लॉर्ड्स कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी, इंग्लंडचा फलंदाज बेन डकेटला बाद केल्यानंतर त्याच्या जवळ जाऊन आक्रमकपणे जल्लोष केल्याप्रकरणी आयसीसीने ही शिक्षा सुनावली आहे. या कारवाईअंतर्गत सिराजच्या सामना शुल्कामधून १५ टक्के रक्कम कापण्यात येणार आहे.लंडन येथील लॉर्ड्स मैदानावर भारत आणि इंग्लंड यांच्यात तिसरा कसोटी सामना खेळवला जात आहे. सामन्याच्या अंतिम दिवसाचा खेळ सुरू होण्यापूर्वी काही तास आधी, आयसीसीने ही कारवाई जाहीर केली. सिराजने इंग्लंडच्या फलंदाजाला बाद केल्यानंतर केलेल्या एका कृतीमुळे त्याच्यावर हा दंड ठोठावण्यात आला आहे. यानुसार, सिराजच्या सामना शुल्कातून १५ टक्के कपात केली जाणार असून त्याच्या नावावर एका डिमेरिट गुणाचीही ( ) नोंद करण्यात आली आहे.आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार, मोहम्मद सिराज आयसीसीच्या आचारसंहितेच्या लेव्हल १ च्या उल्लंघनासाठी दोषी आढळला आहे. खेळाडू आणि खेळाडूंच्या साहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.५ चे त्याने उल्लंघन केले. या कलमांतर्गत, 'एखाद्या आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान फलंदाज बाद झाल्यावर त्याच्या दिशेने अपमानास्पद भाषा, कृती किंवा हावभाव करणे, किंवा फलंदाजाला आक्रमक प्रतिक्रियेसाठी प्रवृत्त करणे,' या कृतींचा समावेश होतो.या दंडात्मक कारवाईसोबतच, सिराजच्या शिस्तभंगाच्या नोंदीमध्ये एका डिमेरिट गुणाची भर पडली आहे. गेल्या २४ महिन्यांच्या कालावधीतील हा त्याचा दुसरा गुन्हा असून, यामुळे त्याच्या एकूण डिमेरिट गुणांची संख्या दोन झाली आहे. यापूर्वी ७ डिसेंबर २०२४ रोजी ॲडलेड येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान सिराजला पहिला डिमेरिट गुण मिळाला होता.

# सायना नेहवाल-पारूपल्ली कश्यप विभक्त



**नवी दिल्ली: दि. १४ प्रतिनिधी**

भारताची प्रसिद्ध बॅडमिंटनपटू सायना नेहवाल आणि तिचा पती भारतीय बॅडमिंटनपटू पारूपल्ली कश्यप विभक्त होत असल्याची माहिती सायना नेहवालने पोस्ट शेअर करत दिली आहे. सायना नेहवाल आणि पारूपल्ली कश्यप हे करियरच्या सुरूवातीपासून एकमेकांना ओळखतात आणि बॅडमिंटनच्या कोर्टवर दोघेही प्रेमात पडले होते. २०१८ मध्ये लग्न झाल्यानंतर आता हे बॅडमिंटनपटू जोडपं वेगळं होणार आहे.

सायना नेहवाल आणि पारूपल्ली कश्यप यांनी एकत्र बॅडमिंटनचे धडे गिरवले आहेत. सायना आणि कश्यप एकत्र खेळायचे. यादरम्यान त्यांची मैत्री झाली आणि ही मैत्री प्रेमात कशी खुलत गेलीॅ हे त्यांनाही कळलं नाही. एका दशकभराचा काळ एकमेकांना डेट केल्यानंतर, दोघांनीही १४ डिसेंबर २०१८ मध्ये लग्न केलं.सायना नेहवालने इन्स्टाग्रामवर अचानक पोस्ट शेअर सर्वांनाच धक्का दिला. सायनाने या पोस्टमध्ये लिहिलं आहे, ''कधी कधी आयुष्य आपल्याला वेगळ्या वळणावर घेऊन जातं. बराच विचार केल्यानंतर आता कश्यप पारूपल्ली आणि मी वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही दोघेही स्वतःसाठी आणि एकमेकांसाठी स्थैर्य, यश आणि शांततापूर्ण जीवन जगणं निवडत आहोत.''. या प्रवासात पुढे जाताना मी चांगल्या शुभेच्छा देत सर्व छान आठवणींसाठी आभार मानते.''सायना आणि ३८ वर्षीय कश्यप गेल्या ७ वर्षांपासून लग्नबंधनात होते. दोघांनीही २०१८ मध्ये त्यांच्या लग्नाची घोषणा करून सर्वांना आश्चर्यचकित केले होते, कारण बराच काळ या दोन्ही स्टार्सनी त्यांचे नाते मीडिया आणि चाहत्यांच्या नजरेपासून दूर ठेवले होते. दोघांची भेट हैदराबादमधील दिग्गज भारतीय बॅडमिंटनपटू पुलेला गोपीचंद यांच्या अकादमीत झाली, जिथे दोघेही दिग्गज प्रशिक्षकाच्या देखरेखीखाली प्रशिक्षण घेत होते. इथूनच त्यांची लव्हस्टोरी सुरू झाली. सायना नेहवालच्या इन्स्टाग्रामवर कश्यपबरोबरचा एकही फोटो दिसत नाहीये. तर याउलट कश्यपच्या इन्स्टाग्रामवर सायनाबरोबरचे फोटो, व्हीडिओ अजूनही तसेच आहेत. मार्चमध्ये सायनाच्या वाढदिवसाला केलेली पोस्टही यामध्ये दिसत आहे. तर काही बॅडमिंटनसंबंधित सायनाबरोबरचे व्हीडिओदेखील आहेत.

# वॉशिंग्टन फ्रीडमला एम.आय. न्यूयॉर्कने अंतिमच्या सामन्यात केले पराभूत

**नवी दिल्ली: दि. १४ प्रतिनिधी**

मेजर क्रिकेट लीग २०२५ चा आज फायनलचा सामना खेळवण्यात आला. या सामन्यामध्ये एमआय न्यूयॉर्क विरुद्ध वॉशिंग्टन फ्रीडम या दोन संघांमध्ये लढत पाहायला मिळाली. या सामन्यात वॉशिंग्टन फ्रीडमच्या संघाला एमआय न्यूयॉर्कच्या संघाने पराभूत करून मेजर क्रिकेट लीग २०२५ जेतेपद नावावर केले आहे. या सामन्यांमध्ये रचिन रवींद्र याने वॉशिंग्टन फ्रीडमच्या संघासाठी चांगली कामगिरी केली होती, पण तो संघाला विजयापर्यंत नेण्यात अपयशी ठरला. तर एम आय न्यूयॉर्क संघासाठी क्विंटन डीकॉक याने दमदार फलंदाजी केली. एम आय न्यूयॉर्कचे कर्णधारपद हे निकलस पुरण याच्याकडे होते तर वॉशिंग्टन फ्रीडमचे नेतृत्व ग्लेन मॅक्सवेल करत होता. एमआय न्यूयॉर्क विरुद्ध वॉशिंग्टन फ्रीडम या सामन्यामध्ये दोन्ही संघांची कामगिरी कशी राहिली यासंदर्भात सविस्तर वाचा. सामन्यामध्ये वॉशिंग्टन फ्रीडमच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिले करून त्याची करण्याचा निर्णय घेतला होता. संघाने पहिले फलंदाजी परत २० ओव्हरमध्ये ७ विकेट गमावून १८० धावा केल्या होता. एमआय न्यूयॉर्कसाठी दोन्ही सलामीवीर फलंदाजांनी चांगली सुरुवात करून दिली.



मोनक पटेल याने २८ धावांची खेळी खेळली या मैदानावर एक षटकार आणि दोन चौकार मारले. प्रिंटन टीका करण्याचे ४० चेंडूमध्ये ७७ धावा केल्या. यामध्ये मोनक पटेलने ४ षटकार आणि ६ चौकार मारले. प्रत्युत्तरात, वॉशिंग्टन फ्रीडम संघाला ५ विकेट गमावल्यानंतर फक्त १७५ धावा करता आल्या. ग्लेन फिलिप्सने आपल्या संघाला विजय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पण शेवटच्या षटकात रुशील उगारकरने १२ धावांचा बचाव केला आणि एमआयला विजेतेपद मिळवून दिले. रुशील उगारकरने ४ षटकात ३२ धावा देत २ विकेट घेतल्या. त्याच वेळी, ट्रेंट बोल्टनेही ३२ धावा देत २ विकेट घेतल्या.एमआय न्यू यॉर्क संघासाठी एमएलसी २०२५ ची सुरुवात खूपच निराशाजनक झाली, परंतु असे म्हटले जाते की जर तुम्ही काहीतरी साध्य करण्याचा दृढनिश्चय केला तर कितीही अडचणी आल्या तरी एक दिवस तुम्हाला यश मिळेलच. नवीन कर्णधार निकोलस पूरनच्या संघानेही तेच केले. पूरनच्या संघाने एमएलसी सामने खेळत राहिले. पहिल्या ७ पैकी ६ सामन्यांमध्ये संघाला पराभवाचा सामना करावा लागला, परंतु त्यानंतर त्यांनी सलग दोन सामने जिंकले आणि एलिमिनेटर सामनाही जिंकला.

# अँडरसन फिलिपने हेडचा घेतला चमत्कारिक झेल

**नवी दिल्ली: दि. १४ प्रतिनिधी**

वेस्ट इंडिज आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळवण्यात येत असलेल्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा डे-नाईट कसोटी सामना सुरू आहे. या सामन्याच्या पहिल्या डावात वेस्ट इंडिजने ऑस्ट्रेलियाला २२५ धावांवर रोखलं. या डावात एक अद्भुत नजारा पाहायला मिळाला. ज्यामूळे क्रिकेट विश्वात खळबळ उडाली आहे. वेस्ट इंडिजचा अँडरसन फिलिपने एक चमत्कारिक झेल टिपला आहे. फिलिपने मिड-ऑफवर हवेत सूर मारत कॅच पकडला आहे. हा व्हिडिओ सद्या खूप वेगाने व्हायरल होत आहे.ऑस्ट्रेलिया पहिल्या डावात फलंदाजी करत असताना, जस्टिन ग्रेव्हज वेस्ट इंडिजसाठी ६५ वे षटक टाकायला आला. या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर, ट्रॅव्हिस हेडने मिड-ऑफच्या दिशेने हवेत फटका मारला. तथापि, तो मिड-ऑफवर उभ्या असलेल्या क्षेत्ररक्षकापासून काही अंतरावर होता. मिड-ऑफवर उभा असलेला फिलिप वेगाने येत त्याने उजवीकडे धावत डाईव्ह मारला आणि चमत्कारिक असावा असा झेल टिपला.

या उत्तम झेलचा व्हिडिओ खूप व्हायरल झाला आहे.या दौऱ्यात ऑस्ट्रेलियाचे फलंदाज संघर्ष करताना दिसत आहेत. आतापर्यंत खेळलेल्या ५ डावांमध्ये या फलंदाजांना केवळ एकदाच ३०० धावांचा टप्पा पार करण्यात यश आले आहे. पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलिया संघाने ३१० धावा केल्या होत्या.



# फक्त काही आठवड्याचे मॅग्नेट उपलब्ध



**नवी दिल्ली :** वाहन क्षेत्राला विशेषतः इलेक्ट्रिक वाहन क्षेत्राला रेअर अर्थ मॅग्नेटची गरज असते. चीनने या रेअर अर्थ मॅग्नेटचा पुरवठा थांबविला आहे. आता भारतातील इलेक्ट्रिक वाहन कंपन्याकडे फक्त चार ते सहा आठवड्याचा मॅग्नेटचा साठा आहे. अशा परिस्थितीत भारताला पर्यायी उपाययजना करण्यावर भर द्यावा लागणार असल्याचे समजले जात आहे.२०२४ च्या मध्यात चीनने देशांतर्गत आवश्यकतेसाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली रेअर अर्थ मॅग्नेट पुरवठा इतर देशांना मर्यादित प्रमाणात केला. त्यामुळे भारतासमोरच नाहीतर जगातील इतर अनेक देशासमोर प्रश्न निर्माण झाले आहेत. वाहन, इलेक्ट्रिक वाहन आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रावर याचा परिणाम होत आहे. रेअर अर्थ मॅग्नेटच्या किमती वाढत आहेत. एवढेच नाही तर काही देशांमध्ये या उत्पादनावर आधारित वाहनांचे उत्पादन थांबले आहे.भारताने इलेक्ट्रिक वाहनांची संख्या वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यासाठी सरकारने आणि वाहन कंपन्यांनी तयारी केली आहे. मात्र अशातच मॅग्नेट उपलब्ध नसल्यामुळे या सर्व प्रक्रियेवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत एक तर मॅग्नेटसाठी पर्यायी स्त्रोत निर्माण करावे लागतील किंवा पर्यायी तंत्रज्ञान विकसित करावे लागणार आहे. मात्र यासाठी बराच वेळ लागू शकतो. त्यातून कसा मार्ग काढायचा याचे आव्हान भारत सरकार आणि भारतातील विविध क्षेत्रासमोर आहे. यासंदर्भात भारत सरकार आणि भारतीय वाहन कंपन्या चीनकडे विचारणा करत आहेत. मात्र चीनकडून या संदर्भात संदिग्ध प्रतिसाद मिळत आहे. भारतीय वाहन कंपन्यांचे शिष्टमंडळ चीनला जाण्यासाठी तयार आहे.

# व्यापार करारावर वाटाघाटी करण्यासाठी भारतीय पथक वॉशिंग्टनला

**नवी दिल्ली: दि. १४ प्रतिनिधी**

प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करार () बाबत भारत आणि अमेरिका यांच्यात चर्चेचा आणखी एक टप्पा सुरू होणार आहे. यासाठी भारतीय वाणिज्य मंत्रालयाचे एक पथक वॉशिंग्टन डीसीला पोहोचले आहे. ही चार दिवसांची चर्चा आजपासून म्हणजेच सोमवारपर्यंत सुरू होईल आणि गुरुवारपर्यंत चालेल. या काळात, शेती आणि ऑटोमोबाईलसारख्या प्रमुख व्यापार मुद्द्यांवर दोन्ही देशांमधील मतभेद दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातील.भारताचे मुख्य वाटाघाटीकार आणि वाणिज्य विभागाचे विशेष सचिव राजेश अग्रवाल बुधवारी या पथकात सामील होतील. याशिवाय, भारताचे उपमुख्य वाटाघाटीकार आधीच वॉशिंग्टनला पोहोचले आहेत आणि ते चर्चेच्या पहिल्या टप्प्यात सहभागी होतील.

ही भेट विशेष आहे कारण अमेरिकेने भारतासह अनेक देशांवर अतिरिक्त शुल्क लादण्याची अंतिम मुदत १ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे.गेल्या आठवड्यात एका अधिकाऱ्याने सांगितले की, भारत या कराराकडे अंतरिम किंवा पहिला टप्पा म्हणून पाहत नाही, तर 'पूर्ण व्यापार करार' वर काम करत आहे. ते म्हणाले, ''आम्ही संपूर्ण कराराबद्दल बोलत आहोत. जे काही मुद्दे पूर्ण झाले आहेत, ते अंतरिम करार म्हणून सादर केले जाऊ शकतात. उर्वरित मुद्द्यांवर चर्चा पुढे सुरू राहील.''



यापूर्वी, जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून ते जुलैच्या सुरुवातीपर्यंत, भारतीय पथक वॉशिंग्टनमध्ये होते, जिथे २६ जून ते २ जुलै या कालावधीत दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाली. कृषी आणि दुग्धजन्य पदार्थांवरील शुल्कात सवलत देण्याच्या अमेरिकेच्या मागणीवर भारताने कडक भूमिका घेतली आहे. भारताने अद्याप कोणत्याही व्यापारी भागीदारासोबतच्या मुक्त व्यापार करारात () दुग्धजन्य क्षेत्रात कोणतीही सवलत दिलेली नाही. दुसरीकडे, भारत अमेरिकेकडून स्टील आणि ॲल्युमिनियमवरील शुल्कात ५० टक्के आणि ऑटो क्षेत्रावर २५ टक्के कपात करण्याची मागणी करत आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या () नियमांनुसार प्रत्युत्तरात्मक शुल्क लादण्याचा अधिकारही भारताने राखून ठेवला आहे. अमेरिकेने २ एप्रिल रोजी भारतासह अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात कर लादण्याची घोषणा केली होती, परंतु ती प्रथम ९ जुलै आणि नंतर १ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलण्यात आली. ट्रम्प प्रशासनाने अलीकडेच बांगलादेश, इंडोनेशिया, जपान, दक्षिण कोरिया, मलेशिया, थायलंड, दक्षिण आफ्रिका, बोस्निया आणि हर्जेगोविना, कंबोडिया, कझाकस्तान, लाओस, सर्बिया आणि ट्युनिशिया यासारख्या देशांना कर-संबंधित पत्रे पाठवली आहेत.

# श्रावणाची चाहूल अन् भाज्यांचे दर गडगडले

**नवी दिल्ली: दि. १४ प्रतिनिधी**

अन्न आणि इंधनाच्या किमती कमी झाल्यामुळे जून २०२५ मध्ये घाऊक महागाई दर २० महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आला आहे. सोमवारी वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, भारताचा घाऊक महागाई दर जूनमध्ये वार्षिक आधारावर -०.१३ टक्क्यांपर्यंत घसरला. ऑक्टोबर २०२३ नंतरचा हा सर्वात कमी दर आहे. मे महिन्यात तो १४ महिन्यांच्या नीचांकी ०.३९ टक्क्यांवर होता. जूनसाठी किरकोळ महागाई डेटा आज उशिरा जाहीर होण्याची अपेक्षा आहे.घाऊक किंमत निर्देशांक मोठ्या प्रमाणात विकल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमतींमधील सरासरी बदल मोजतो आणि उत्पादक पातळीवर चलनवाढीचा एक महत्त्वाचा सूचक आहे. हे कृषी, खाणकाम आणि उत्पादन यासारख्या क्षेत्रातील पुरवठा आणि मागणीच्या ट्रेंडचे प्रतिबिंबित करते. आकडेवारीनुसार, अन्नपदार्थांच्या किमतींमध्ये



मोठी घसरण नोंदवण्यात आली आहे. जूनमध्ये भाज्यांचा महागाई दर -२२.६५% पर्यंत घसरला, तर मेमध्ये तो -२१.६२% होता. कांद्याचा महागाई दर गेल्या महिन्याच्या -१४.४१% वरून -३३.४९% पर्यंत घसरला. तर मेमध्ये बटाट्याचा महागाई दर (-) २९.४२% वरून (-) ३२.६७% नोंदवण्यात आला. त्याच वेळी, डाळींच्या किमती मेमध्ये मोठ्या प्रमाणात घसरल्या. देशातील किरकोळ महागाई मे २०२५ मध्ये सहा वर्षांच्या नीचांकी पातळीवर घसरली, जी २.८२% वरून मे महिन्यात घसरली.आकडेवारीनुसार, जूनमध्ये उत्पादित उत्पादनांमध्ये महागाई १.९७ टक्के होती.

# ट्रम्पच्या टॅरिफ धमक्यांमुळे आज रुपया पुन्हा कमकुवत

**नवी दिल्ली: दि. १४ प्रतिनिधी**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील देशांविरुद्ध सततच्या टॅरिफच्या धमक्यांमुळे आज आठवड्याच्या पहिल्या व्यापारी दिवशी रुपया पुन्हा एकदा २१ पैशांनी कमकुवत झाला.

सोमवारी रुपया सुरुवातीच्या व्यवहारात १७ पैशांनी घसरून ८६.०२ वर उघडला, ज्यामुळे अमेरिकन डॉलरमध्ये मोठी वाढ झाली आणि परकीय भांडवलाचा प्रवाह बहिर्गमन झाला.अमेरिकेच्या व्यापारी शुल्काबाबत अनिश्चिततेमुळे रुपयावर दबाव येत असल्याचे परकीय चलन व्यापाऱ्यांनी सांगितले. आंतरबँकिंग परकीय चलन विनिमय बाजारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया



८५.९६ वर उघडला, जो मागील बंद दिवसाच्या तुलनेत २१ पैशांनी वाढला. मागील सत्राच्या शेवटच्या दिवशी, शुक्रवारी, रुपया डॉलरच्या तुलनेत ८५.८० वर बंद झाला.

दरम्यान, सहा प्रमुख चलनांच्या तुलनेत अमेरिकन डॉलरची ताकद मोजणारा डॉलर निर्देशांक ०.०८ टक्क्यांनी वाढून ९७.९३ वर पोहोचला. गेल्या सत्रात तो ९७.८५ च्या पातळीवर बंद झाला होता.दरम्यान, स्थानिक शेअर बाजारात, सकाळी सुरुवातीच्या व्यवहारात बीएसईवरील ३० शेअर्सचा सेन्सेक्स २९५.३७ अंकांनी घसरून ८२,२०५.१० वर बंद झाला. तर एनएसईवरील निफ्टी ५० देखील ७१.४ अंकांनी घसरून २५,०७८.४५ अंकांवर बंद झाला.

दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय दर्जाचे ब्रेंट क्रूड ०.१९ टक्क्यांनी घसरून ७०.०२ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. शेअर बाजाराच्या आकडेवारीनुसार, शुक्रवारी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार म्हणजेच एफआयआय विक्रेते होते. त्यांनी ५,१०४.२२ कोटी रुपयांचे शेअर्स विकले.

दरम्यान, १२ जुलै रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युरोपियन कमिशनचे अध्यक्ष उर्सुल वॉन डी लेयन आणि मेक्सिकोच्या अध्यक्षा क्लॉडिया शीनबॉम यांना धमकी दिली आणि १ ऑगस्टपासून त्यांच्यावर ३० टक्के कर लादण्याची धमकी दिली.

थोडक्यात

### अभिर राऊतचे परिक्षेत सुयश



**नागपूर :** सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ, नागपूर येथील विद्यार्थी अभिर राऊत याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचालित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा वर्ग ८ वीत ८४.४६ टक्के गुण घेऊन नागपूर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तो ॲड. अमोल व डॉ. भाग्यश्री राऊत यांचा मुलगा आहे अभिरने आपल्या यशाचे श्रेय आईवडील, सर्व शिक्षिक आणि मार्गदर्शक मनीषा दहीगावकर यांना दिले आहे.

### हद्दपार इसमास केली अटक

**नागपूर :** धंतोली पोलिसांच्या पथकाने रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास हद्दपार इसमाला अटक केली. प्रफुल्ल उर्फ गोट्या फुलचंद पाटील (राहुल नगर झोपडपट्टी, नवजीवन कॉलनी, धंतोली) असे त्याचे नाव आहे.
धंतोली पोलिसांचे तपास पथक हद्दीत पेट्रोलिंग करत असता आरोपी राहुल नगर झोपडपट्टी येथे येणार असल्याची माहिती मिळाली त्यावरून नमूद ठिकाणी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता त्यास पोलिस उप आयुक्त परिमंडळ क्र. दोन यांचा हद्दपार आदेश क्र. १४/२०२४ दिनांक २६-०८-२०२४ अन्वये नागपूर शहर व ग्रामीण हद्दीतून एक वर्षाकरिता हद्दपार केल्याचे दिसू आले. यानंतर आरोपीविरुद्ध कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

### घातक शस्त्र सापडले

**नागपूर :** लकडगंज पोलिसांनी घातक शस्त्र बाळगणाऱ्यास अटक केली नितीन वसंतराव निपाने (चुनाखाये टेकडी, जुनी मंगळवारी) असे त्याचे नाव आहे
लकडगंज पोलिसांचे तपास पथक रविवारी सायंकाळी पावणेचारच्या सुमारास आपल्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना मालधक्का येथे आरोपी संशयास्पद स्थितीत दिसून आला पोलिसांना पाहून पळू लागल्याने पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या पँट्या आत लोखंडी चाकू मिळून आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने चाकू बाळगून मिळून आल्याने तसेच मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोहवा उमाकांत नागदेवे यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करत अटक केली.

### 'स्पायडर मशीन' ने नाल्यांची सफाई

**नागपूर :** नागपूर शहरातील लहान आणि अरुंद नाल्यांच्या सफाईसाठी आता 'स्पायडर मशीन'चा वापर केला जाणार आहे. सोमवारी मनपा आयुक्त अभिजीत चौधरी यांनी या मशीनच्या सफाई चाचणीची पाहणी केली. कोराडी मार्गावरील बाबा फरीदनगर नाला आणि गड्डीगोदाम येथील शक्ती नाल्यात या मशीनद्वारे सफाईची चाचणी झाली. यावेळी अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, उपायुक्त राजेश भगत, अशोक गराटे उपस्थित होते. ही मशीन जास्त पाण्यातही चार पायांवर उभी राहू शकते आणि ३६० अंशात फिरून स्वच्छता करू शकते. त्यामुळे लहान नाल्यांच्या स्वच्छतेसाठी ती उपयुक्त ठरणार आहे. मनपा आयुक्त चौधरी यांनी मशीनची कार्यक्षमता तपासून समाधान व्यक्त केले. या प्रयोगामुळे शहरातील स्वच्छता मोहिमेला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

# लवकरच धावणार 'पीएम ई-बस'

## मनपा आयुक्तांनी केली ट्रायल बसची पाहणी | एकूण १५० वाहने प्राप्त होणार | दोन डेपोमध्ये चार्जिंगची व्यवस्था

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर,दि. १४: शासनाच्या 'पीएम ई-बस' योजनेद्वारे देशातील विविध शहरांना विद्युत बसेस उपलब्ध होणार आहेत. यात विशेष म्हणजे पीएम ई-बस योजनेचा पहिला मान नागपूर महानगरपालिकेला मिळणार आहे योजने अंतर्गत 'ट्रायल बस' शहरात आली असून, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी आज मनपा मुख्यालय येथे पाहणी केली.**



शहरबस वाहतुकीच्या वाढीला प्रोत्साहन व समर्थन देण्यासाठी केंद्र शासनाच्या गृह निर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय नवी दिल्ली यांच्या मार्फत 'पीएम ई-बस' सेवा योजना देशाअंतर्गत राबविण्यात येत आहे. यामध्ये नागपूर शहराकरिता १५० ई-बसेस प्राप्त होणार आहेत. या सोबतच खापरी डेपो आणि कोराडी डेपो या दोन्ही डेपोचा विकास देखील मूलभूत सुविधेअंतर्गत करण्यात येणार आहे. शासनाकडून महावितरण अंतर्गत एचटी अँड एलटी इलेक्ट्रिक जोडणीसाठी तथा स्थापत्यविषयक कामांना निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. उपरोक्त दोन्ही डेपोंपैकी कोराडी डेपो तयार झाले असून, खापरी डेपोचे काम सुरू आहे. दोन्ही डेपोमध्ये प्रत्येकी ७५ बसेसच्या चार्जिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. शहरात फिरणार अत्याधुनिक विद्युत बसच्या पाहणीनंतर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी जेबीएम कंपनीच्या प्रतिनिधींना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. सदर बस पुढील तीन दिवस नागपूर शहरात मार्गक्रमण करणार आहे. पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, गृह निर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय नवी दिल्लीचे डेप्युटी टीम लीडर राम पौनिकर, सीआईआरटीचे तांत्रिक प्रमुख शेखर ढोले, जेबीएमचे भारत भूषण चावला, कुलदीप गांगुर्डे, मनपाचे परिवहन व्यवस्थापक विनोद जाधव यांच्यासह उपअभियंता केदार मिश्रा, यांत्रिकी अभियंता योगेश लुंगे, राजस्व निरीक्षक समीर परमार उपस्थित होते.

### बसची वैशिष्ट्ये

- बसची लांबी ९ मीटर
- पर्यावरण पूरक वातानुकूलित ई-बस
- फास्ट चार्जिंगची सोय
- दिव्यांगांसाठी विशेष हायड्रॉलिक ई-रॅम्प
- २५ प्रवासी बसण्याची व्यवस्था
- सुरक्षेसाठी ६ सीसीटीव्ही
- चार जागी डिस्प्ले

# महाराष्ट्रात देशातील सर्वोत्तम सायबर प्रयोगशाळा: मुख्यमंत्री

## प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या इमारतीचे भूमिपूजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर,दि. १४: महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. सोबतच मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळाची उभारणी होत आहेत तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करून प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



नागपूर येथील धंतोली परिसरात, प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार संदीप जोशी, आमदार संजय मेश्राम, महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) संजय वर्मा, महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचे संचालक डॉ. विजय ठाकरे उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, "नवीन भारतीय फौजदारी कायद्यांमुळे, गुन्हे सिद्ध करण्यासाठी न्यायसहायक पुराव्यांचे महत्त्व वाढले आहे. २०१४ नंतर, राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण ९ टक्क्यांवरून ५४ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात यश आले आहे. आता विकसित भारताच्या दिशेने जाताना, हे प्रमाण ९० टक्क्यांच्या पुढे नेण्याचे आमचे उद्दिष्ट आहे." या नवीन इमारतीच्या भूमिपूजनामुळे, न्यायदानास आणखी गती मिळेल. फेब्रुवारी २०२७ पर्यंत या इमारतीचे बांधकाम पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय ठाकरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नागपूरचे उपसंचालक अश्विन गेडाम यांनी केले.

### समाधानाची बाब

**नागपूर येथील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा ही अत्याधुनिक करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली. या प्रयोगशाळेच्या इमारतीचे भूमिपूजन ही एक समाधानाची बाब असून,फेब्रुवारी २०२७ पर्यंत इमारतीचे बांधकाम पूर्ण व्हावे, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.**

CAPTION नाला आणि पाईप्स...



**नागपूर : नागपुरातील अयोध्यानगर, पंचदीपनगर, सचिदानंदनगर परिसरातून वाहणारा हा नाला. कधी काळी तो शेतातील 'बांधी' होता, असेही सांगण्यात येते. सांगायचे असे ही त्याला आपापल्या पद्धतीने वळविण्यात आल्याचेही ऐकीवात आहे आता या नाल्यात दोन पाईप टाकण्यात आले त्यातून पाणी वाहत आहे विशेष असे, की नाल्याचाही प्रवाह सुरू आहे.**

# विचारभिन्नता चालेल, मात्र विचारशून्यता नसावी

## गडकरींच्या उपस्थितीत देशपांडे स्मृती पुरस्कार प्रदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १४ :** सामाजिक कार्य करताना वैचारिक भिन्नता असू शकते मात्र, विचारशून्यता नसावी कारण ही विचारशून्यता अडसर असते, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. ते स्व. प्रकाश देशपांडे स्मृती कुशल संघटक पुरस्कार वितरण समारंभात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष प्रदीप दाते होते. किर्लोस्कर उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक संजय किर्लोस्कर, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपूर जिल्हा खो-खो संघटनेचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे सरकार्यवाहक रविंद्र फडणवीस आणि साहित्यिक डॉ. बळवंत भोयर यांना संघटनात्मक संस्थांमधून सामाजिक बांधिलकी स्वीकारणारे कुशल संघटक म्हणून ह्यस्व. प्रकाश देशपांडे कुशल संघटक पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. बळवंत भोयर यांनी सत्काराला उत्तर देताना विदर्भ गौरव प्रतिष्ठानाकडून मिळालेला पुरस्कार अतिशय महत्त्वाचा असल्याची भावना व्यक्त केली रविंद्र फडणवीस यांनी त्यांच्या संस्थेकडून सुरू असलेल्या शैक्षणिक कार्याची माहिती दिली. क्रीडा आणि नाट्य क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या कार्याचीही माहिती दिली. प्रदीप दाते यांनी अध्यक्षीय भाषण सादर केले प्रास्ताविक शुभदा फडणवीस यांनी केले.

# मुलांना शालेय साहित्याचे वितरण

**नागपूर, दि. १४ :** आसमान फाउंडेशनतर्फे पारशिवनी तालुक्यातील भागीमहारी गावात शेतमजुरांच्या मुलांना शालेय साहित्य आणि मिठाईचे वाटप करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रतिष्ठानचे संस्थापक बबलू गाडवे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.यावेळी आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष रवि गिऱ्हे, सचिव नरेश शेंडे, कोषाध्यक्ष उषा जैन, आणि आसमान महिला क्रेडिट को-ऑप सोसायटीच्या अध्यक्षा मेघा गिऱ्हे उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भजने सादर केली. लहान गावात मोफत संस्कार वर्ग सुरू केल्याबद्दल रवि गिऱ्हे यांनी बबलू गाडवे यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व संचालन विद्यार्थ्यांनी केले.

# पोहताना हृदयविकाराच्या झटक्याने ज्येष्ठाचा मृत्यू

## सकाळच्या सुमारास घडली घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १४ :** उत्तर अंबाझरी मार्गावरील एनआयटी जलतरण तलावात पोहताना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने एका ज्येष्ठ नागरिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. जयंत कावरे (वय ६५, रा. अत्रे ले-आउट) असे त्यांचे नाव असून, शुक्रवारी सकाळी घडलेल्या या घटनेमुळे पोहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये आणि परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नेहमीप्रमाणे जयंत कावरे हे सकाळी पोहोण्यासाठी पाण्यात उतरले. मात्र, काही क्षणांतच त्यांना अस्वस्थ वाटू लागले आणि ते पाण्यातच कोसळले. सुदैवाने, गुडघाभर पाण्यातच ते पडल्याने, जीवरक्षक आणि उपस्थित नागरिकांनी त्यांना तातडीने बाहेर काढले. स्विमिंग पूल व्यवस्थापनाने वेळ न दवडता, त्यांना त्वरित जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानेच त्यांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक वैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाले आहे. या घटनेमुळे, जलतरण तलावातील सुरक्षेचा आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधांचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. घटनेची माहिती मिळताच बजाज नगर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आणि आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. या अनपेक्षित घटनेने कावरे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# पाणी तुंबण्याच्या कारणांचा शोध घ्या

## नितीन गडकरींनी अधिकाऱ्यांना खडसावले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १४ :** पावसाळा सुरू होण्याच्या आधी नाले आणि मालवाहिन्यांची सफाई करण्यात आली लोकांच्या घरात पावसाचे पाणी शिरले. ही परिस्थिती का उद्भवली पाणी तुंबण्याच्या कारणांचा शोध घेण्यात यावा, असे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अधिका०यांना दिले



जिल्हा विकासकामांबाबत आयोजित आढावा बैठकीत नितीन गडकरी यांनी अधिका०यांना सदर बाबीचा जाब विचारला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार चरणसिंग ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नासुप्रचे सभापती संजय मीणा यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, महामेट्रो तसेच संबंधित खात्यांचे अधिकारी उपस्थित होते. शहरात ७ ते ९ जुलै दरम्यान झालेल्या मुसळधार पावसाने भीषण परिस्थिती निर्माण केली. अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरले. नागपूरकरासमोर रात्र जागून काढण्यासह अनेक अडचणी समोर उभ्या राहिल्या मंत्र्यांनी यावेळी बेसा-बेलतरोडी, मनीषनगर भागात उद्भवलेल्या परिस्थितीवर प्रचंड नाराजी व्यक्त केली. संबंधित ठिकाणांचा अभ्यास करून पाणी तुंबण्याच्या कारणांचा शोध घ्या आणि आठ दिवसांत अहवाल सादर करण्यात यावा, असे निर्देश प्रशासनाला दिले.

### अनधिकृत बांधकाम तोडा

**बेसा-बेलतरोडी भागात अनधिकृत बांधकामामुळे देखील पावसाचे पाणी वस्त्यांमध्ये शिरल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली. त्यावर अनधिकृत बांधकाम तोडून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना गडकरी यांनी केल्या. आमदार कृष्णा खोपडे यांनी पारडीमधील परिस्थिती उपस्थितांसमोर मांडली. प्रवीण दटके यांनी मेट्रो स्थानकांचेही पावसामुळे हाल झाले असल्याची बाब मांडली.**

# सुरक्षारक्षकाच्या प्रामाणिकपणाला सलाम

## साडेतीन लाखांचा ऐवज केला परत: पोलिस आयुक्त डॉ. सिंगल यांच्याकडून सन्मान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १४ : कॉटन मार्केट मेट्रो स्टेशन (सीएमएमएस) येथील सुरक्षा रक्षक रोहण शामराव गायकवाड यांनी एका प्रवाशाची तब्बल साडेतीन लाख रुपयांचा मौल्यवान ऐवज असलेली बॅग सुरक्षित मूळ मालकाकडे परत केली.**



मााहिती नुसार, रोहण शामराव गायकवाड ७ जुलै रोजी मेट्रो स्टेशनात कर्तव्यावर असताना त्यांना बॅग आढळून आली त्यांनी ती बॅग तत्काळ ताब्यात घेत स्टेशन कंट्रोलर अमोल मेश्राम यांना माहिती दिली. तिची तपासणी केली असता तिच्यामध्ये मौल्यवान वस्तू व महत्त्वाची कागदपत्रे दिसून आले. बॅगमध्ये असलेल्या वाहनाच्या आरसी बुकच्या आधारे मालक रोहित मल्लानी यांचा शोध घेऊन संपूर्ण बॅग सर्व सामानासह त्यांच्या स्वाधीन करण्यात आली.

रोहण गायकवाड यांच्या प्रामाणिक कृतीमुळे केवळ एका प्रवाशाची मौल्यवान मालमत्ता सुरक्षित राहिली नाही, तर नागपूर मेट्रो व्यवस्थापन आणि नागपूर शहर पोलिस दल यांच्यावरील जनतेचा विश्वास आणखी दृढ झाला आहे. **सामाजिक बांधिलकीची दखल** नागपूर पोलिसांकडून रोहण गायकवाड यांच्या सामाजिक बांधिलकीची, माणुसकीची आणि संवेदनशीलतेची दखल घेण्यात आली. पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल यांनी त्यांना आपल्या कार्यालयात प्रशंसापत्र प्रदान करून सन्मानित केले. यावेळी करुणा रोहण गायकवाड, आई माया गायकवाड व मुलगा सक्षम यांचे देखील शब्दसुमनांनी कौतुक केले. हा सन्मान म्हणजे केवळ एका घटनेचे कौतुक नाही, तर नागपूर शहरात माणुसकी, सचोटी आणि जबाबदारीचे मूल्य जपणा०या प्रत्येकासाठी प्रेरणादायी बाब ठरेल. समाजात सजग, जबाबदार आणि प्रामाणिक नागरिक असणे हीच सामाजिक समृद्धीची आणि सुरक्षिततेची खरी गुरुकिल्ली आहे, असे त्यांनी नमूद केले.







अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, मंगळवार, दि. १५ जुलै २०२५







# २१७.५१ कोटींची योजना मंजुरीच्या प्रतीक्षेत

## शासनाच्या मंजुरीनंतर मनपाची निविदा प्रक्रिया

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ : अकोला शहरासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीसाठी राज्य शासनाकडून विलंब होत असल्याने महापालिकेला अडचणी येत आहेत. अमृत योजना टप्पा-२ अंतर्गत पाणी पुरवठ्याचे कामातील पहिल्या २१७.५१ कोटी रुपयाच्या प्रस्तावाला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. या मंजुरीनंतर महापालिकेने निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी निविदेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला; मात्र एक महिन्यापासून या निविदेला शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.**



अमृत योजनेत पहिल्या टप्प्यात पाणी पुरवठ्याची कामे पूर्ण झाल्यानंतर महापालिकेने वाढीव भागातील पाणी पुरवठ्याची कामे तसेच जिगाव प्रकल्पावरून शहरापर्यंत पाणी आणण्यासाठीचा ८२७ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार केला होता. या प्रस्तावाला तांत्रिक मंजुरी मिळाली होती. हा प्रस्ताव अमृत योजनेत पाठविला होता.

मात्र महापालिकेने दुसऱ्या टप्प्यातील पाणी पुरवठा योजनेचा अंदाजे खर्च ३०० कोटी नोंदविला होता. त्यामुळे अमृत योजनेच्या शिखर समितीने या प्रस्तावास मान्यता दिली नाही; मात्र या प्रस्तावाचे तीन प्रस्ताव तयार करावेत, यापैकी एका प्रस्तावाला अमृत योजनेत मंजुरी मिळाली असून, अन्य दोन प्रस्ताव नगरोत्थान योजनेत सादर केले आहेत. दुसऱ्या टप्प्यात बहुतांश कामे ही हद्दवाढ झाल्यानंतर समाविष्ट झालेल्या २१ गावांमध्ये केली जाणार आहेत. यात जलवाहिनी अंथरणे, जलकुंभ बांधणे, जलशुद्धीकरण केंद्र उभारणे, स्काँडा ऑटोमेशन यंत्रणा राबविणे आदी विविध कामे केली जाणार आहेत; मात्र अमृत योजना टप्पा-२ मध्ये पहिल्या टप्प्याला मंजुरी मिळाली आहे. यात केवळ जिगाव ते निमकर्दा जलवाहिनी अंथरणे आणि जलशुद्धीकरण केंद्राचे काम केले जाणार आहे. यात पाणी पुरवठा टप्पा दोनच्या पहिल्या टप्प्यात जिगाव प्रकल्पाजवळील मनसगाव येथे विहीर खोदणे, त्यावर पंप बसवणे व मनसगाव ते निमकर्दा मुख्य जलवाहिनी अंथरणे अशी कामे केली जाणार आहेत. यानुसार महापालिकेने अमृत योजनेत २२३ कोटी, तर नगरोत्थान योजनेत ३६७ कोटी आणि १६२ कोटी रुपयांचे प्रस्ताव तयार केले होते. हे तीनही प्रस्ताव तांत्रिक मंजुरीसाठी मजिप्राकडे पाठविण्यात आले होते. या प्रस्तावात मजिप्राने त्रुट्या काढल्या. या त्रुट्या दूर करून पुन्हा हे प्रस्ताव सादर केले होते. यापैकी २२३ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली असून, उर्वरित दोन प्रस्तावांना अद्याप प्रशासकीय मंजुरी मिळालेली नाही.

### तर योजना लांबणीवर जाणार

महापालिकेने निविदेचा प्रस्ताव दुरुस्तीसह तयार करून शासनाकडे पाठवून एक महिन्याचा कालावधी झाला आहे; मात्र शासनाकडून अद्यापही या निविदांना हिरवा कंदिल मिळालेला नाही. निविदा मंजूर होण्यास आणखी विलंब झाल्यास पुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू होईल. त्यामुळे पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू होण्यास विलंब होण्याची शाक्यता नाकारता येत नाही.

# ई-चलान प्रक्रियेत खासगी मोबाइलचा वापर करणाऱ्या पोलिसांवर शिस्तभंगाची कारवाई होणार

## परिवहन मंत्र्यांची विधान भवनातील बैठकीत तीव्र नाराजी

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. १४ :** वाहतूक व्यवस्थेतील पारदर्शकता आणि न्याय्यतेच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्याचे संकेत दिले आहेत. परिवहन विभागाच्यावतीने २ जुलै २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे राज्याचे मा. परिवहन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली वाहतूक संघटनांच्या प्रतिनिधींशी बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ई-चलान प्रक्रियेतील काही गंभीर त्रुटींवर चर्चा झाली.

सदर बैठकीत वाहतूक संघटनांच्या प्रतिनिधींनी आरोप केला की, वाहतुकीचे नियमन करणारे काही पोलीस अधिकारी/अंमलदार हे त्यांचे खासगी मोबाइल फोन वापरून एकाचवेळी मोठ्या संख्येने वाहनांचे फोटो काढतात. यानंतर, ते फोटो वास्तवातील वेळ आणि ठिकाण सोडून, स्वतःच्या सोयीने ई-चलान प्रणालीत अपलोड करून वाहनचालकांवर चुकीची दंडात्मक कारवाई करतात.

या प्रकारामुळे निष्पाप वाहनचालकांना अन्यायकारक चलान प्राप्त होत असून, त्यांना दंड भरण्याची वेळ येते. अशा कारवाईमुळे वाहतूक विभागाची प्रतिमा मलीन होत असल्याचे प्रतिनिधींनी स्पष्ट केले.

या बाबीची गंभीर दखल घेत परिवहन मंत्री महोदयांनी अत्यंत तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, यापुढे अशा प्रकाराची पुनरावृत्ती झाली तर संबंधित अधिकारी/अंमलदारांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

यापूर्वीही, राज्य परिवहन विभागाने स्पष्ट आदेश काढून खासगी मोबाइल फोनचा वापर टाळण्याचे निर्देश दिले होते; मात्र असे दिसून येत आहे की, काही अधिकारी अजूनही हे आदेश पाळत नाहीत, ही बाब गंभीर आहे.

राज्य सरकारकडून ही बैठक आणि त्यातील निर्णय हे एक सकारात्मक पाऊल मानले जात असून, वाहनचालकांचे हक्क आणि वाहतूक व्यवस्थेतील पारदर्शकता राखण्यासाठी याचा निश्चितच परिणाम होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

राज्य सरकारने आता अशा प्रकरणांमध्ये अधिक काटेकोर तपासणी करण्याचे संकेत दिले आहेत. खासगी मोबाइल वापरून चलान जारी करणारे अधिकारी/अंमलदार आढळल्यास त्यांच्यावर खातेनिहाय चौकशी आणि शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

### ई-चलानसाठी अधिकृत यंत्रणाच वापरावी आदेशांची पुन्हा पुष्टी

वाहतूक पोलिसांनी ई-चलान प्रक्रिया करताना फक्त अधिकृत सरकारी उपकरणे (जसे की अधिकृत कॅमेरे, एप्लिकेशन्स) वापरावी, असा स्पष्ट आदेश आहे. यामुळे चालान प्रक्रियेतील ''रिअल टाइम डेटा'' जपला जातो आणि नागरिकांवर अन्याय होण्याची शक्यता कमी होते.

**महत्त्वाचे मुद्दे थोडक्यात :**

खासगी मोबाइल वापरून चुकीची ई-चलान प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप, वाहनचालकांना त्याचा त्रास; चुकीच्या पद्धतीने दंड आकारणी, परिवहन मंत्र्यांकडून तीव्र नाराजी, यापूर्वीही अशा कारवाईवर बंदीचे स्पष्ट आदेश, नियमभंग करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित.

## पुण्यातील गुलाब. जलवेरा बाजारपेठेत....



पावसाळा सुरू होताच पुण्यावरून अनेक प्रकारची फुलझाडे तसेच शोभिवंत झाडांची शहरात ठिकठिकाणी दुकाने थाटली असून, त्यामध्ये गुलाब, जलवेरा, शेवंती, क्रिसमस ट्री अशा अनेक प्रकारच्या शोभिवंत झाडांना ग्राहकांची पसंती दिसत आहे. (छाया. संजय ताथुरकर)

# पैशासाठी विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ :** हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ करीत शिवीगाळ आणि मारहाण केल्याची घटना अकोट तालुक्यातील कानडी येथे घडली आहे. या प्रकरणी अकोटफैल पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ममता निखिल बेलोरकार (२६) रा. कानडी, ह.मु. कासली खुर्द, ता. अकोट, जि. अकोला) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे लग्न ९ मे २०१७ रोजी निखिल बेलोरकार याच्यासोबत हिंदू परंपरेनुसार झाले होते. लग्नानंतर काही काळ सर्व काही सुरळीत असतानाच, ५ जून २०२४ पासून सासरच्या लोकांकडून हुंड्यासाठी तिला मानसिक त्रास देण्यात येऊ लागला. तिच्या तक्रारीनुसार, पती निखिल बेलोरकार, सासरे वसंत बेलोरकार, सासू उषा बेलोरकार आणि नणंद पूनम खडसे (सर्व रा. कानडी) यांनी तिचा अपमान करून शिवीगाळ केली तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याशिवाय, घर बांधण्यासाठी माहेरून ५० हजार रुपये आणावेत, अशी मागणी करीत तिला सातत्याने मानसिक त्रास दिला. पैसे न दिल्यास सासरी येऊ नकोस, अशी धमकीही दिली.

अखेर या त्रासाला कंटाळून ममताने अकोटफैल पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली. या तक्रारीवरून पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक रहीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# ठाकरे गटाच्या दबावापुढे प्रशासन झुकले!

## महिलेकडून विकृत मागणी करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ :**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या कार्यालयात काम करणाऱ्या एका महिला कंत्राटी कर्मचाऱ्याला शरीरसुखाची मागणी करणाऱ्या अधिकाऱ्याला अखेर निलंबनाची कारवाई झेलावी लागली. अकोल्यातील ही धक्कादायक घटना असून, बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांच्या आक्रमक भूमिकेमुळे संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध पाच तासांतच निलंबनाची कारवाई झाली. आमदार देशमुख यांनी अकोल्यातील प्राधिकरण कार्यालयात ठिय्या आंदोलन छेडले होते. त्यांच्या मागणीनंतर शाखा अभियंता राजेंद्र इंगळे यांना तातडीने निलंबित करण्यात आले आहे. तर दुसरे आरोपी अधिकारी उपविभागीय अधिकारी दत्तात्रय कपिले यांच्या निलंबनाची प्रक्रिया सुरू असून, त्याबाबतचा प्रस्ताव अमरावती विभागाकडे पाठवण्यात आला आहे.

पीडित महिला मूर्तिजापूर येथील जीवन प्राधिकरण कार्यालयात कंत्राटी कॉम्प्युटर ऑपरेटर म्हणून कार्यरत आहे. तिच्या आरोपानुसार दोन्ही अधिकाऱ्यांनी वेळोवेळी अश्लील मागण्या करत त्रास दिला होता. वारंवार तक्रारी करूनही कारवाई न झाल्याने अखेर आमदार देशमुख यांनी थेट आंदोलनाची शस्त्र उचलली.

ठाकरे गटाच्या मोठ्या संख्येने उपस्थित कार्यकर्त्यांनी मुख्य अभियंता गव्हाणकर यांच्या कार्यालयात ठिय्या देत जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली. आंदोलनामुळे प्राधिकरणच्या व्यवस्थापनात खळबळ उडाली आणि तत्काळ निलंबनाची कार्यवाही करण्यात आली.दरम्यान, आमदार देशमुख यांनी या प्रकरणावरून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावरही गंभीर आरोप केले आहेत.या प्रकरणावर लक्षवेधी सूचना घेण्याची विनंती असतानाही विधानसभा अध्यक्षांनी मुद्दाम दुर्लक्ष केले. आरोपी अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसारच विधानसभेतील लक्षवेधी थांबवली गेली,असा दावा आमदार देशमुख यांनी केला.

# महापालिकेचा कारवाईचा बार निघाला फुसका!

## गोठे स्थानांतरणाची योजना गुंडाळली

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ :** दुर्गंधी व अस्वछता पसरविणारे गोठे महापालिकेकडून दुर्लक्षित असल्याने नागरिक त्रस्त झाले असून पाळीव जनावरांमुळे अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. स्वच्छतेबाबत आग्रही असलेली महापालिका गोठयांवर कुठलीही कारवाई करताना दिसून येत नाही. गोठे शहराबाहेर स्थानांतरीत करण्याचे शासनाचे निर्देश असतानाही चारही झोनमध्ये गोठे असल्याची परिस्थिती आहे.

शहराबाहेर गोठ्यांची योजना धुळखात पडून असल्याने महापालिकेची कुठलीही कारवाई दिसत नाही. शहरातील गोठयांमुळे अस्वच्छता व दुर्गंधीचा सामना परीसरातील नागरिकांना करावा लागत आहे. शहराच्या विविध भागात पाळीव गाई-म्हशीचे गोठे खुलेआम सुरू असल्याने परिसरात अस्वच्छता व दुर्गंधी पसरली आहे. गुरांचे मल-मूत्र अक्षरशः घाण सांडपाण्यातुन वाहत असल्याचे चित्र आहे. थेट रस्त्यांवर मल-मूत्राची घाण येत असल्याने परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असतानाही गोठे मालकांवर कुठलीही कारवाई होतांना दिसत नाही. गोठे मालकांना राजकीय वरदहस्त असल्याने महापालिकेचे अधिकारीही याकडे कानाडोळा करीत असल्याचे दिसून येते. गोठ्यातील गायी- म्हशींची ने-आण बिनदिक्कतपणे रस्त्यांवरुन होत असल्याने अपघाताच्या घटना सातत्याने घडत आहेत.

शहराबाहेर गोठ्यांची योजना हे धोरण असतानाही महापालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसुन येते. शहरातील सिंधी कँप, खदान, गवळी पुरा, जुने शहर परीसर, कौलखेड, उमरी, अकोट फैल, खडकी, मलकापुर यासह अनेक भागांमध्ये बिनदिक्कतपणे गोठे सुरु असुन या गोठ्यांद्वारे सर्वत्र घाण पसरवली जात आहे. स्वच्छतेचा गवगवा करणाऱ्या महापालिकेला शहरातील गोठे दिसत नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### थेट रस्त्यांवर पाळीव जनावरे

सिंधी कॅम्प परिसरात गोठ्यातील म्हशी थेट मुख्य रस्त्यांवरून नेल्या जातात. यामुळे या परिसरात दररोज वाहतूक कोंडी होत असते. अनेकदा या कोंडीत दुचाकीधारक अपघाताला बळी पडतात. सकाळी ९ ते १० च्या व सायंकाळी ५ ते ६ दरम्यान गुरेढोरे थेट रस्त्यांवरुन हाकली जातात. गोठे मालकांना कुठलाही धाक नसल्याने हे प्रकार वाढीस लागले आहेत.

# जि. प. व पं. स. प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा प्रसिद्ध

## हरकती असल्यास २१ जुलैपूर्वी पाठविण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रभागाच्या भौगोलिक सीमा निश्चित करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार निर्वाचक गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसा आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी निर्गमित केला.

मसुद्याबाबत हरकती असल्यास तहसीलदार यांच्याकडे २१ जुलैपूर्वी लेखी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अकोला जिल्हा परिषदेची ५२ इतकी निश्चित करण्यात आली आहे. प्रारूपानुसार, तेल्हारा तालुक्यात दानापूर, अडगाव बु,, शिरसोली, बेलखेड, पाथर्डी, देहेगाव, भांबेरी असे ७ निवडणूक विभाग आहेत. अकोट तालुक्यात उमरा, अकोलखेड, अकोली जहाँगीर, वडाळी देशमुख, मुंडगाव, वरूर, कुटासा, चोहोट्टा असे ८, मुर्तिजापूर तालुक्यात लाखपुरी, शेलू बाजार, कुरूम, माना, शिरसो, हातगांव, कानडी असे ७ सर्कल आहेत.

**अकोला तालुक्यात :** आगर, दहिहंडा, घुसर, उगवा, बाभुळगाव, कुरणखेड, कानशिवणी, बोरगाव मंजू, चांदूर, चिखलगाव असे असे १० सर्कल आहेत. बाळापूर तालुक्यात अंदुरा, हाथरूण, निमकर्दा, व्याळा, पारस, देगाव, वाडेगाव असे ७ विभाग निश्चित करण्यात आले आहेत.

**बार्शीटाकळी तालुक्यात :** कान्हेरी सरप, दगडपारवा, पिंजर, झोडगा, महान, राजंदा, जामवसू असे एकूण ७ आणि पातुर तालुक्यात शिर्ला, चोंडी, विवरा, सस्ती, पिंपळखुटा, आलेगाव




**तेल्हारा तालुक्यात :** दानापूर, सौंदळा, अडगाव बु, खंडाळा, शिरसोली, तळेगाव बु., बेलखेड, माळेगाव बाजार, पाथर्डी, घोडेगाव, देहेगाव, वाडी अधमपूर, भांबेरी, नरसीपूर, अकोट तालुक्यात उमरा, कासोद शिवापूर, अकोलखेड, मोहाळा, अकोली जहाँगीर, पणज, वडाळी देशमुख, आसेगाव बाजार, मुंडगाव, अडगाव खु, वरूर, देवरी, कुटासा, रेल, चोहोट्टा, केळीवेळी असे पं. स. निर्वाचक गण आहेत.

**मूर्तिजापूर तालुक्यात :** भटोरी, लाखपुरी, बोरटा, शेलू बाजार, कवठा (सोपीनाथ), कुरूम, माना, जामठी बु., सिरसो, जांभा बु., हातगाव, उमरी, कानडी, धोत्रा (शिंदे) असे सर्कल आहेत.

**अकोला तालुक्यात :** आगर, सांगवी खुर्द, दहीहंडा, म्हैसांग, घुसर, आपातापा, उगवा, भौरद, बाभूळगाव, सांगळूद बु., कुरणखेड, पळसो बु., कानशिवणी, पातूर नंदापूर, बोरगाव मंजू क्र. १ व २, चांदुर, कुंभारी, चिखलगाव, गोरेगाव खु. असे गण आहेत.

**बाळापूर तालुक्यात :** अंदुरा, निंबा, हाथरूण, लोहारा, निमकर्दा, मोरगाव सादिजन, व्याळा, गायगाव, पारस क्र. १ व २, देगाव, बटवाडी बु., वाडेगाव क्र. १ व २ असे गण आहेत.

**बार्शिटाकळी तालुक्यात :** कान्हेरी सरप, विझोरा, दगडपारवा, राहित, पिंजर, मोहळ, झोडगा, टिटवा, महान, हातोला, राजंदा, पुनोती बु., जामवसू, साखरवीरा, तसेच पातुर तालुक्यात दिग्रस बु., शिर्ला, खानापूर, चोंडी, विवरा, बाभुळगाव, सस्ती, मळसूर, पिंपळखुटा, उमरा, आलेगाव, सावरगाव असे निर्वाचक गण आहेत.

**असे ६ निवडणूक विभाग आहेत.**
**पंचायत समिती**
तेल्हारा-१४, अकोट-१६, मूर्तिजापूर-१४, अकोला-२०, बाळापूर-१४, बार्शीटाकळी-१४, पातूर-१२



## थोडक्यात

### समृध्दीवर पुन्हा ट्रकच्या रांगाच रांगा



**डोणगाव :** येथे सम्रृध्दी महामार्गावर दोन्ही बाजूंनी पेट्रोल पंप आहेत व या पेट्रोल पंप जवळ असलेल्या शेतामध्ये हॉटेल सुरू झालेल्या आहेत व ह्या हॉटेल रात्रदिवस सुरू असतात त्यामुळे या ठिकाणी चक्क समृद्धी महामार्गवर ट्रक च्या रांगा लागलेल्या असतात कारण सम्रृध्दी महामार्गावर लांब लांब पर्यंत हॉटेल नाही पण येथे ट्रक हे चक्क इमर्जन्सी लेन वर उभे केले जातात त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही तर नुकताच याच ठिकाणी बोलेरो पिकअप व लक्झरी चा आपघात होऊन अनेक जण जखमी झाले ही घटना ताजी असतानाच परत या ठिकाणी ट्रक च्या रांगा लागलेल्या दिसून येत असल्याने. समृध्दी महामार्ग पोलीस व स्थानिक पोलीसांच्या गस्तीवर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.

### ग.म.इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये सुयश

**शेगाव :** स्थानिक, शेगांवच्या शैक्षणिक विश्वात तेजस्वी रोषणाई करणारी, सर्वच बाबतीत शिस्तप्रिय व गुणवत्तेचा उच्चांक गाठणारी श्री गजानन महाराज इंग्लिश स्कूल पुन्हा एकदा आपल्या यशाची पताका अभिमानाने फडकवत आहे. पुर्व प्राथमिक व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला असुन, गुणवत्ता यादीमध्ये इयत्ता ५ वी चे एकुण ०८ विद्यार्थी तसेच इयत्ता ८ वी चे एकुण १६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई वडील, शिक्षकवर्ग तसेच श्री गजानन महाराजांच्या कृपाशीर्वादाला दिले आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद शिक्षकेत्तर कर्मचारी, व संस्थेचे पदाधिकारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### बुलडाणा येथे आज पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**खामगाव :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा/प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा मंगळवार दि. १५ जुलै २०२५ रोजी स्किल पॅरामेडिकल कॉलेज, वानखेडे ले-आऊट, डॉ. मेहेत्रे हॉस्पिटल जवळ, बुलडाणा येथे सकाळी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचा जिल्ह्यातील युवकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. १५ जुलै हा जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. या वर्षीची थीम आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलडाणा आणि गुरुवारला स्किल पॅरामेडिकल कॉलेज, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावाचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यात सहभागी होण्यासाठी १० वी, १२ वी, आयटीआय तसेच पदवीधर पात्रता असलेले पुरुष व महिला उमेदवार आपली शैक्षणिक कागदपत्रे घेऊन स्वखर्चाने उपस्थित राहावेत. यासंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा येथे अथवा दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२३४२ वर संपर्क साधावा.

### गणेशोत्सवाकरिता श्री. हनुमान व्यायाम मंडळ समितीची घोषणा

**खामगाव :** खामगाव गणेश उत्सव २०२५ करीता खामगांव येथील सतीफैल भागातील श्री. हनुमान व्यायाम मंडळ गणेशउत्सव समिती चे गठन नुकतेच सर्वानुमते करण्यात आले असून यात अध्यक्षपदी कृष्णसिंह ठाकूर यांची तर उपाध्यक्ष म्हणून कोमल तिवारी, राहुल बशीरे, शाहिद पठाण, सचिव-मुत्रा बोन्द्रे, सहसचिव विक्की घोडेचोर, अक्षय अहिर, अतुल सावळेकर, कोषाध्यक्ष पवन गरड, सहकोषाध्यक्ष पचन ठाकूर, ओम अंधारे, क्रीडा प्रमुख राजू ताकचाले, उमाकांत रेठेकर, सल्लागार प्रमुख गणेश जाधव, रवी आनंदे, प्रसिद्धी प्रमुख गणेश पिंपळकर तर सदस्य म्हणून राम मिश्रा, गणेश कोमूकर, सचिन सारसर, प्रतीक मिश्रा, चेतन ठोंबरे, दीपक खिरडकर, विजय आनंदे, हरीश रेठेकर, सुरेश नांदोकार, शुभम मुदोळकर, गोलू ठाकूर यांची निवड करण्यात आली आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू कधी मिळणार ?

## तालुक्यातील लाभार्थ्यांतून उपस्थित केला जात आहे प्रश्न, महसूल प्रशासनाचे योग्य नियोजन होणे गरजेचे

अजिंक्य भारत/मंगेश टाकसाळ

**जळगाव जा. दि.१४ :** ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर मिळावे यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध आवास योजनेअंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येत आहे. परंतू वाळू अभावी तालुक्यातील व परिसरातील शेकडो घरकुलांचे बाधकाम रखडले आहे. शासनाने नुकतीच या घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्याचा निर्णय घेतला आहे. परतू अद्यापही मोफत वाळू मिळाली नसल्याने मोफत वाळू कधी मिळणार ? असा संतप्त प्रश्न लाभार्थ्यांतून होत असून महसूल प्रशासनाने तात्काळ योग्य ते नियोजन करून वाळू उपलब्ध करून द्यावी अशी मागणी होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध आवास योजनेअंतर्गत घरकूल



देण्यात येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने मागासवर्गीय समाजातील कुटुंबासाठी रमाई आवास योजना, इतर मागासवर्गीय समाजातील कुटुंबासाठी मोदी आवास योजना, धनगर समाजातील कुटुंबासाठी अहिल्यादेवी होळकर आवास योजना, सर्व समाजातील बेघर व गरजू कुटूंबासाठी पंतप्रधान आवास योजना तर कामगाराच्या कुटूंबासाठी अटल घरकुल योजना विमुक्त जाती आणि भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध सामाजिक घटकांना हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाच्या वतीने योजना राबविण्यात येत आहेत. खेर्डा व परिसरातील अनेक गावांमध्ये शेकडो लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले आहे. या सर्व लाभार्थ्यांना १५ हजार रुपयाचा पहिला हप्ता बँक खात्यात जमा झाला आहे. परंतू वाळू वाहतूक बंद झाली आहे. या प्रकारामुळे लाभार्थ्यांना आर्थिक भूर्दंड सहन करून वाळूची खरेदी करावी लागल होती. या गंभीर प्रकाराची दखल घेऊन शासनाने घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूदेण्याची घोषणाकरुन प्रत्येक तालुक्यात महसूल प्रशासनाच्या वतीने या निर्णयाची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहे परंतू तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांना अद्यापही मोफत वाळू मिळाली नसल्याने घरकुल लाभाथ्यर्थ्यांतून ही मोफत वाळू कधी निळणार? असा संतप्त प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. जळगाव जामोद तालुका महसूल प्रशासनाच्या वतीने योग्य ते नियोजन करून या गंभीर प्रकाराची सबंधीत विभागाच्या वरिष्ट अधिकाऱ्यांनी दखल घेऊन मोफत वाळू द्यावी अशी मागणी घरकुल लाभार्थ्यांतून होत आहे.

**वाढीव निधी मिळणार का ?**

ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना केवळ दिड लाख रुपयांचा निधी दिला जातो. परतू सध्या वाळू, सिमेंट, वीट, लोखंड या साहित्याबरोबरच बांधकाम करणाऱ्या मिस्त्रीचेभाव देखील आकाशाला भिडले आहेत यामुळे ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना किमान ५ लाख रुपयांचा निधी मंजूर होणे गरजेचे आहे. परंतू नुकतीच राज्य शासनाच्या वतीने उपमुख्यमंत्री तथा अर्थमत्री अजित पवार यानी ग्रामीण भागातील सर्व घरकुल योजनेत ५० हजार रुपयांची वाढ केली आहे. यामुळे या लाभार्थ्यांना २ लाख रुपयांचा निधी मंजूर होणार आहे. त्यामुळे या आवास योजनेअंतर्गत वाढीव निधी कधी मिळणार ? असा प्रश्नही ग्रामीण भागातील जनतेतून होत आहे.

## बियर बार रेस्टॉरंट व्यवहार बंद ठेवून एसडीओंना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१४ :** बुलढाणा जिल्हा लिकर असोसिएशन च्या खामगाव शाखे तर्फे आज १४ जुलै २०२५ रोजी सर्व परमिट रूम बियर बार रेस्टॉरंट व्यवहार बंद ठेवून एसडीओ मार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले यापूर्वी बुलढाणा जिल्हा लिकर असोसिएशन या संघटनेतर्फे जिल्हाधिकारी बुलढाणा यांना ११ जुलै २०२५ रोजी निवेदन देण्यात आले हो.

या निवेदनात विनंती करण्यात आली आहे की विदर्भ रेस्टॉरंट परमिट रूम असोसिएशन अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सर्व परमिट रूम बियर बार रेस्टॉरंट परवानाधारक व्यवसाय करीत असून शासनाने जे अन्यायकारक निर्णय घेतले आहेत त्यामध्ये शासनाकडून परमिट रूम मधील




मध विक्रीवर १० टक्के वाढ केलेली आहे तो रद्द करून फर्स्ट पॉइंट टॅक्स लागू करण्यात यावा शासनाकडून परमिट रूम नूतनीकरण फी मध्ये भरमसाठ वाढ केली आहे ती कमी करण्यात यावी या मागणी संदर्भात व शासन निर्णयाच्या निषेधार्थ बुलढाणा जिल्ह्यातील सर्व परमिट रूम परवानाधारकांनी मध विक्री १४ जुलै २०२५ रोजी बंद ठेवले होते.या निर्णयामुळे आमचे परवानधारक अगोदरच अवैध विक्रीमुळे अडचणीत आले आहेत व आता शासनाने वरील निर्णय घेतल्यामुळे आम्हा परवानधारकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे आणि आता व्यवसाय कसा करावा हा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी आपण या पत्राद्वारे आम्हा परमिट रूम परवान धारकांच्या समस्यांच्या व होणाऱ्या आर्थिक नुकसानाच्या विचार करून हा निर्णय रद्द करण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा ही नम्र विनंती दि. १४ जुलै रोजी गांधी पुतला येथून बियर बार रेस्टॉरंट चे मालक किशोर गरड, अमोल अंधारे, अरविंद मुळीक , धनंजय मोहिते, राजीव अवचार , कृष्ण नागोर, चोकशे आदीनी मोर्चा काढून एसडीओ कोर्ट पोहोचले येथे एसडी डॉ रामेश्वर पुरी यांना निवेदन दिले.

## दुसरबीड-शेंदुर्जन-पांग्रा रस्त्याच्या कामात अनियमिततेचा आरोप : काँग्रेस उपाध्यक्षांनी मागितले स्पष्टीकरण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन दि.१४ :** अमडापूर ते दुसरबिड राज्य महामार्ग क्रमांक २२२ च्या सुरू असलेल्या बांधकामात आणि संबंधित कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचा आरोप करत काँग्रेस कमिटी सिंदखेडराजा-चे तालुका उपाध्यक्ष पांडुरंग शिंगणे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकड स्पष्टीकरण मागितले आहे. त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा यांना याबाबत लेखी निवेदन दिले आहे. शिंगणे यांनी आपल्या निवेदनात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत, ज्यात प्रामुख्याने रस्ता बांधकाम, पुलांची अपूर्ण कामे आणि देयकांच्या वाटपातील पारदर्शकतेचा अभाव यांचा समावेश आहे.

अमडापूर ते दुसरबिड या राज्य महामार्ग क्रमांक २२२ चे बांधकाम कोणत्याा विभागाला हस्तांतरित करण्यात आले आहे, याची माहिती त्यांनी मागवली आहे., अपूर्ण पूल कामे व देयके: भोगावती नदीवरील पूल क्रमांक १ आणि कोरडी नदीवरील पूल क्रमांक २ या दोन्ही पुलांचे काम दोन वर्षांपूर्वी सुरू झाले होते. हे काम कधी पूर्ण झाले आणि त्याची देयके कशी देण्यात आली, याबाबत त्यांनी माहितीची मागणी केली आहे., शेंदुर्जन गावातील मुख्य रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरणाचे काम अपूर्ण असतानाच नोव्हेंबरपासून पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. हे काम का थांबवण्यात आले, झालेल्या कामाची किती देयके अदा केली गेली आणि किती बाकी आहेत, याची सविस्तर माहिती त्यांनी विचारली आहे., मलकापूर पांग्रा गावाजवळील रस्त्याचे काम अनेक वर्षांपासून रखडलेले असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप शिंगणे यांनी केला आहे. हे काम न करण्याचे कारण त्यांनी विचारले आहे. पांडुरंग शिंगणे यांनी या सर्व कामांची आणि देयकांची सविस्तर माहिती लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

अन्यथा, या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दाद मागण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या गंभीर आरोपांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता विभाग यावर काय स्पष्टीकरण देतो, हे पाहणे महत्वाचे ठरेल.

## प्रविण गायकवाडांवरील हल्ल्याविरोधात निषेध आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.१४ :** अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे सामाजिक प्रदेशाध्यक्ष प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मेहकर शहरातील जिजाऊ चौकात एक दिवसीय रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष योगेश्वर निकस आणि पांडुरंग पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे दोषींवर त्वरित कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. प्रवीण दादा गायकवाड हे गेल्या अनेक वर्षांपासून युवकांमध्ये सामाजिक प्रबोधन करत असून, पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्याांचे मोठे योगदान आहे. त्याांच्यावर करण्यात आलेला जीवघेणा



हल्ला हा फक्त एका व्यक्तीवर नाही, तर समस्त पुरोगामी विचारसरणीवर हल्ला असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

निवेदनात म्हटले आहे की, अशा प्रवृत्तीचा प्रशासनाने तातडीने बंदोबस्त करणे आवश्यक आहे. अन्यथा महाराष्ट्रातील शिवप्रेमींच्या भावना भडकून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा इशारा देखील आंदोलकांनी दिला आहे. या आंदोलनात मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उभाटा), जमिनी, बामसेफ, भारत मुक्ती मोर्चा, जमात-ए-इस्लामी हिंद, छात्र भारती, विद्यार्थी संघटना अशा अनेक पुरोगामी संघटना व पक्ष सहभागी झाले होते.

निवेदन तहसीलदार कार्यालयात सादर करण्यात आले. यावेळी योगेश्वर निकस, पांडुरंग पाटील, विनोद बोरे, दत्ता पाटील घनवट, भागवत जाधव, प्रा. विश्वनाथ बावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## बुलडाण्यात भ्याड हल्ल्याचा संभाजी ब्रिगेडने केला निषेध

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१४ :** काल अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावरील शाईफेक प्रकरणाची संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष मनोज वाघ यांनी तीव्र शब्दात निंदा केली आहे.हाच तुमचा जनसुरक्षा कायदा आहे का असा संतप्त सवाल मुख्यमंत्री फडणवीस यांना मनोज वाघ यांनी केला आहे.

संभाजी ब्रिगेड ने याबाबत दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, ऐतिहासिक, सामाजिक , सांस्कृतिक व राजकीय भान ठेवून शिव शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारावर चालणारी संघटना आहे. प्रवीलदादा गायकवाड हे एक प्रगल्भ नेतृत्व असून समाजमन सुदृढ व निरोगी रहावे ह्यासाठी सातत्याने प्रयतरत असतात. त्यांची अभ्यासू व वैचारिक प्रगल्भता त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येते. त्यामुळे अख्या महाराष्ट्राने त्याांच्या पाठीशी उभे राहून ह्या घटनेचा निषेध करावा असे आवाहन सुद्धा मनोज वाघ यांनी केले आहे. दीपक काटे आणि संभाजी भिडे वर जनसुरक्षा कायदा अंतर्गत कारवाई करावी असे आवाहन मनोज वाघ यांनी केले आहे.



## कंत्राटी वाहनचालकांच्या थकीत वेतनासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लाखनवाडा दि.१४ :** आरोग्य सेवेतील १०२ चे रुग्णवाहिकेचे १७ कंत्राटी वाहन चालक यांचे गेल्या १८ महिन्यांपासून वेतन थकीत असून, सदरील वाहनचालक दिवसरात्र, ऊन-पावसाची पर्वा न करता सेवा देण्याचे काम करत असतात. जिल्ह्याची आरोग्य सेवा अविरत सुरू राहावी, यात त्याचा हा खारीचा वाटा आहे. मात्र, हे दुर्दैव आहे की जे इतरांच्या आरोग्याची काळजी वाहतात, आज त्यांच्याच कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. मागील दीड वर्षापासून पगार न मिळाल्याने जगणे असह्य झाले आहे. उसनवारी आणि कर्जाच्या डोंगराखाली सर्व वाहन चालक दबले गेले आहेत. मुलांच्या शाळेची फी, घराचे भाडे, दोन वेळच्या जेवणाची भ्रांत, अशा अनेक समस्यांनी आम्हाला ग्रासले आहे. आम्ही पोटाला चिमटा



काढून सेवा देत आहोत, पण आता हा चिमटा आमच्या जीवावर उठला आहे. आमच्या न्याय्य हक्कांसाठी आम्ही वि.न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. न्यायालयाने आमच्या बाजूने सकारात्मक निर्णय दिला, तरीही प्रशासनाकडून आमच्या मोलमजुरीच्या पैशांकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. आम्ही मा. जिल्हाधिकारी बुलढाणा, मा. उपसंचालक, आरोग्य सेवा अकोला यांच्याकडे अनेकदा पाठपुरावा केलेला आहे, परंतु आमच्या पदरी निराशाच आली आहे. आम्हाला असे समजले आहे की, आपल्या स्तरावरून निधीसाठी वरिष्ठांना पत्र देण्यात आले आहे. परंतु त्यापलीकडे काहीही ठोस कारवाई झाल्याचे दिसुन आले नाही. आम्ही आरोग्यसेवेचे महत्व जानतो आणि आम्हाला सेवा थांबवायची नाही. परंतु, रिकाम्या पोटी आणि खिशात एकही पैसा नसताना आम्ही आणखी किती दिवस काम करणार? मा.महोदयांना नम विनंती आहे की, आमचे थकीत असलेल वेतन आम्हांला येत्या आठ दिवसाचे आत अदा करण्यात यावे. आमच्या थकीत वेतनासाठी विशेष निधीची तरतूद करून आम्हाला न्याय द्यावा ही कळकळीची विनंती अन्यथा, अत्यंत नाइलाजाने आणि जड अंतः करणाने, आम्हाला न्यायालयीन आदेशानुसार काम यामुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवेवर होणाऱ्या गंभीर परिणाम बंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा असे निवेदन देण्यात आले.

## अशिक्षीत, शेतकरी तरुणांसोबत लग्नकरणाऱ्यासाठी योजना सुरू करा

### माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांची राज्यपालांसह मुख्यमंत्र्यांकडे मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.१४ :** महाराष्ट्र राज्यात अशिक्षीत, भुमीहिन, अत्यअल्पभुधारक शेतकरी, तरुणांसीबत लग्नकरणाऱ्यास लयात ११ लाख रुपये (११०००००) शासकीय निधी सप्रेम भेट योजना सुरू करावी अशी मागणी माजी राज्यमंत्री सुबोधभाऊ सावजी यांनी राज्य पाल सह मुख्यमंत्री यांच्याकडे दि. १२जुलै ला दिलेल्या निवेदनात केली आहे.

त्यांनी आपल्या निवेदनात महाराष्ट्र राज्यात अशिक्षित, अत्याअल्पभुधारक अशा तरूणांचा लग्नाचा अतिबीकट प्रसंग निर्माण झालेला आहे



गेल्या दहा ते पंधरा वर्षापासुन हा प्रश्न राज्यात भेडसावत आहे. लग्नहोत नाही म्हणुन पश्चिम महाराष्ट्रात शेकडो तरूणांनी लक्ष्य वेधण्याकरीता प्रदर्शन केले होते. लग्न न होण्याच्या प्रक्रियेत गेल्या दहा ते पंधरा वर्षापासुन विशेषतहा ग्रामीण भागात लहान बाळाचा जन्म दर खुप कमी झालेला आहे. कमी झालेल्या जन्म दराचा परिणाम ग्रामीण भागात शाळेत वर्ग १ मध्ये नांव नोंदणे किंवा प्रवेश घेणे यांचे प्रमाण फार कमी झाले आहे शैक्षणिक दृष्ट्या हि बाब महाराष्ट्र राज्यात अतिशय चिंतीची आहे. अशिक्षित किंवा जमतेम शिकलेली मुलगी नवरदेव हा सरकारी नौकरदार घरी थोडी फार जमीन असणारा शहरात राहणाराच पाहिजेत यामुळे राज्यात मुलांचे आईवडील अतिशय चिंतेत आहेत. माझ्या मांगणीवर सखोल अभ्यास करून किंवा एक उच्चस्तरीय समिती नेमुण या प्रश्नांवर सखोल अभ्यास करावा प्रत्येक लग्न अकरालाख रूपये घेवुन विवाह संबंध झाल्यानंतर मुलाने किंवा मुलीने शासकीय योजनेची फसवनुक केल्यास एफ.आय.आर. दाखल करून कठोरात कठोर शिक्षा होईल असा कायदाही पारीत करावा. राज्यामध्ये आपण नवीन नवीन महामार्ग उडापुले बांधण्यात लाखो करोडो रूपये खर्च करीत आहात यांच्याच बरोबर येणाऱ्या पाचवर्षाकरीता जन्मदर वाढविने मार्गाकरीता लाखो करोडो रूपये निधी खर्च करावा अन्यधा राज्यात शैक्षकिण दृष्टया बिकट परिस्थिती निर्माण होवुन लग्नापासुन वंचित राहणारे तरून नक्षलवाद्यांच्या विचारावर जावु शकतात. माझ्या मागनिंचा व सुचनेचा गांभिऱ्याने विचार करून माझी मांगणी व सुचना आमलात आणावी हिच विनंती कार्यवाही कळवावि.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

मंगळवार, दि. १५ जुलै २०२५



## थोडक्यात

### जिल्ह्यात अपेक्षित वार्षिक सरासरीच्या ३९.१३ टक्के पाऊस

**वाशिम :** जिल्ह्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर ११ जुलैपर्यंत एकूण ३०८.८० मिमी पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत अपेक्षित वार्षिक सरासरीच्या ३९.१३ टक्के इतके आहे. हवामान विभागाने पुढील चार दिवस जिल्ह्यातील काही भागांत तुरळक पावसाची शक्यता वर्तवली आहे. मात्र, या अंदाजानुसार पाऊस झाला तरी सरासरी पावसाच्या प्रमाणात फारशी वाढ होण्याची शक्यता नाही. जिल्ह्यात जून ते ३० सप्टेंबरदरम्यान ७८९.०० मि.मी. पाऊस अपेक्षित असतो, तर जून महिन्यात १६६.४० मि.मी. पाऊस अपेक्षित असतो. प्रत्यक्षात जून महिन्यात २१३.०० मि.मी. पावसाची नोंद झाली. जुलै महिन्यात मासिक २४३.६० मि.मी. पाऊस अपेक्षित असतो. प्रत्यक्षात जिल्ह्यात ११ जुलैपर्यंत एकूण ३०८.८० मि. मी. पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण जून ते ३० सप्टेंबरपर्यंत अपेक्षित सरासरीच्या ३९.१३ टक्के आहे. अद्याप पावसाळ्याचे ८० दिवस ,अर्थात अडीच महिन्यापेक्षा अधिक काळ उरला आहे. पावसाची वार्षिक अपेक्षित सरासरी पूर्ण होण्यासाठी या कालावधीत दमदार पावसाची गरज आहे.

### पाऊस थांबला अन् सोयाबीनवर किडींचा प्रादुर्भाव वाढला!

**वाशिमः** जुलैच्या सुरुवातीपासून पावसाने रिपरिप लावल्याने शेतात तण फोफावले होते. त्यामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होत असतानाच आता पाऊस थांबल्यानंतर सोयाबीनच्या पिकावर किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे शेतकरी कीटकनाशकांची फवारणी करून पीक वाचविण्यासाठी धडपड करीत असल्याचे चित्र जिल्हाभरात पाहायला मिळत आहे. यंदा मान्सूनला विलंब झाल्याने खरीप पेरणी रखडली होती. शेतकरी दमदार पावसाची प्रतीक्षा करीत होते. अखेर १२ जूनपासून जिल्ह्यात पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांनी केलेली पेरणी उगवत नाही तोच जिल्ह्यात २६ आणि २७ जून रोजी अतिवृष्टीने कहर केला. यात हजारो हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले, तर हजारो हेक्टर क्षेत्रातील बियाणे उगवलेच नाही. यामुळे अनेकांवर दुबार पेरणीची वेळ ओढवली, तर या नैसर्गिक आपत्तीतून वाचलेले सोयाबीनचे पीक आता वाढीवर असतानाच या पिकावर विविध किडींचा प्रादुर्भाव वाढत आहे. यामध्ये गोगलगाई आणि वाणीचा उपद्रव असतानाच आता खोड किडींचा प्रादुर्भावही काही भागांत पाहायला मिळत आहे. यामुळे शेतकरी फवारणी करून सोयाबीनचे पीक वाचविण्यासाठी धडपड करीत असल्याचे चित्र दिसत आहे.

### समृद्धी महामार्गावर दोन वाहनांचा अपघात; जीवितहानी नाही

**वाशिम :** समृद्धी महामार्गावर नागपूर कॉरिडॉरमधील चॅनल क्रमांक १९१ शेलूबाजार परिसरात शनिवारी (१३ जुलै) सायंकाळी ५:३० वाजताच्या सुमारास अचानक रस्त्यावर आलेल्या नीलगायीमुळे दोन वाहनांचा अपघात झाला. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. एपी-३९-क्यूई-७००० क्रमांकाची कार नागपूरच्या दिशेने जात असताना समोर अचानक नीलगाय आल्याने चालक राजेंद्र गोविंदानी (५८, रा. नागपूर) यांचे नियंत्रण सुटले आणि वाहन अपघातग्रस्त झाले. मात्र, वाहनात असलेल्या सुनीता गोविंदानी व दीपा गोविंदानी या दोघींनाही कोणतीही दुखापत झाली नाही. या कारसोबतच एमएच-४९-बीके-८८४७ क्रमांकाची दुसरी कारही प्रवास करत होती. या वाहनाचे चालक घनश्याम गोविंदानी (३४) होते. त्यांच्या सोबत भारत गोविंदानी, हर्षल गोविंदानी आणि नरेंद्र गोविंदानी हे प्रवासी होते. सुदैवाने या वाहनातील कोणालाही काही इजा झाली नाही. अपघात घडताच घटनास्थळी तत्काळ बॅरिकेडिंग करून वाहतूक नियंत्रणाची कार्यवाही करण्यात आली. मदत कार्यात महेंद्र जाधव, शिवानंद हेंबाळे, होमराज अवगण, भूषण नवथळे तसेच डॉ. शेख व पायलट अतिष चव्हाण यांच्या ॲम्ब्युलन्स टीमने तत्परता दाखवली. अपघातग्रस्त वाहनांना नंतर टोईंग व्हॅनच्या साहाय्याने रस्त्याच्या कडेला हटवण्यात आले.

# प्रभाग रचना; हरकतीसाठी आठ दिवस

## ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापले






दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १४ :** जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी, जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभाग आणि पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणांची प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. राज्य शासनाने यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून वाशिम जिल्हाधिकारी यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भातील १४ जुलै रोजीचा आदेश व त्याचा मसुदा वाशिम जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तसेच वाशिम, रिसोड, मालेगाव, कारंजा, मानोरा आणि मंगरूळपीर येथील तहसीलदार व पंचायत समिती कार्यालयांच्या फलकावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. या प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना करण्यासाठीची अंतिम मुदत २१ जुलै घोषित करण्यात आली आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेला हा मसुदा, राज्य शासन किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी- जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांच्या १४ जुलैच्या आदेशानुसार विचाराधीन धरला जाईल. या आदेशाच्या मसुद्यावर कोणाला हरकत किंवा सूचना असल्यास, त्या संबंधित सकारण लेखी निवेदने, हरकती किंवा सूचना २१ जुलैपर्यंत वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर कराव्यात. यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकती, सूचना किंवा निवेदने विचारात घेतले जाणार नाहीत, असेही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र विकास व्हिजन: अभिप्राय नोंदविण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १४ :** महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने विकसित महाराष्ट्र २०२४: महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वाकांक्षी नागरिक सर्वेक्षण हाती घेतले आहे. या सर्वेक्षणात वाशिम जिल्ह्यातील नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन आपल्या कल्पना व सूचना मांडाव्यात, असे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. राज्याच्या भविष्यातील विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी नागरिकांचा थेट सहभाग मिळावा, हा यामागे मुख्य उद्देश आहे.

या सर्वेक्षणांतर्गत नागरिकांना एका विशिष्ट लिंकद्वारे किंवा क्यूआर कोड स्कॅन करून आपले मत नोंदवता येणार आहे. सर्वेक्षणात एकूण सात प्रश्न असून, त्यापैकी पहिले सहा प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचे आहेत. सर्वात महत्त्वाचा सातवा प्रश्न हा नागरिकांना २०४७ मध्ये विकसित महाराष्ट्र आपल्या मते कसा राहील? याविषयी सविस्तर अभिप्राय नोंदविण्यासाठी आहे. महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या माहितीनुसार, या सर्वेक्षणात येत्या १८ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांना यामध्ये आपला सहभाग नोंदवता येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या विकसित महाराष्ट्र अभियानात नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि डॉ. आरिफ उस्वाल यांसारख्या प्रमुख नेत्यांनीही या अभियानात नागरिकांच्या सक्रिय सहभागासाठी आवाहन केले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन, जिल्ह्याच्या तसेच राज्याच्या विकासासाठी आपल्या सूचना व कल्पना शासनापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन नियोजन विभागातर्फे करण्यात आले आहे. आपला अभिप्राय महाराष्ट्राच्या भावी विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी दिशादर्शक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## चिडीमारीला कंटाळून अल्पवयीन मुलीची आत्महत्या

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. १४ :** मंगरूळपीर तालुक्यातील अंबापुर येथे एका अल्पवयीन मुलीनी दिनांक १२ रोजी सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान गळफास घेऊन आत्महत्या केली आहे याप्रकरणी पोलिसांनी दिनांक १३ जुलै रोजी तिघा विरुद्ध विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी पीडीत मुलींच्या वडिलांनी फिर्यादीत असे नमूद केले की,आरोपी आतिश चवरे ,अमोल टोणे व एक अज्ञात यांनी फिर्यादीच्या मुलीस आमच्या सोबत बोल नाही बोलली तर तुझ्या आई-वडिलांना भावांना जीवाने मारून टाकीनअशी धमकी देत होते याशिवाय तुमचे १० घरे आहेत असे म्हणत जातीवाचक शिवीगाळ केली. अशा त्रासापायी मुलीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली याप्रकरणी पोलिसांनी कलम ७४ ,७८ १०८ ,३५/(२)(३) बी एन एस कलम १२ पोक्सो कलम ३(१) ॲट्रॉसिटी ॲक्ट कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल त्यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार किशोर शेळके करीत आहे.

## रा.काँ.सेवादल जिल्हाध्यक्षपदी भरकड यांची निवड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मंगरुळपीर, दि. १४ :** मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी येथील ग्रामपंचायत सदस्य गणपत सखाराम भरकड यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या सेवादल जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या अध्यक्षतेखाली रिसोड येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषी पदवीधर जिल्हाध्यक्ष सतीश जाधव यांच्या नेतृत्वात निवड प्रक्रिया पार पडली. या बैठकीमध्ये सेवादलच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या बैठकीत उपस्थितांना जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे, पांडुरंग शिंदे यांनी बैठकीला मार्गदर्शन केले. गोगरी येथील ग्रामपंचायत सदस्य गणपत भरकड यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वाशिम जिल्हा सेवादल अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. शरदचंद्र पवार यांचे विचार व पक्षाची सेवादलविषयक ध्येयधोरणे सामान्य जनतेपर्यंत पोहोचून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न करेल, असा विश्वास गणपत भरकड यांनी निवडी प्रसंगी दिला. नवनियुक्त वाशिम जिल्हा सेवादल अध्यक्ष यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## मागासवर्गीय वसतिगृहात प्रवेशासाठी २३ जुलैपर्यंत मुदत

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १४ :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत वाशिम येथील गुणवंत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, चिखली रोड, नालंदा नगर, वाशिम येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रासाठी एकूण ५९ रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

या प्रवेशासाठी जात व प्रवर्गनिहाय आरक्षणानुसार गुणवत्ता यादीनुसार ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. मे २०२५ मध्ये १० वी परीक्षा उत्तीर्ण केलेले आणि वाशिम शहरातील महाविद्यालयात ११ वी किंवा आयटीआय, पॉलीटेक्नीकच्या पहिल्या वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले बोनाफाईड प्रमाणपत्र तसेच आवश्यक कागदपत्रांसह २३ जुलैपर्यंत तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन गृहपाल शेषराव इंगोले यांनी केले आहे.

## पुजारी प्रशिक्षण शिबिरासाठी साईश्रद्धा संस्थानला निमंत्रण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**शेलुबाजार, दि. १४ :** श्री साईबाबा संस्थान शिर्डीशी सलग्नीत असलेल्या देशभरातील तसेच इतर देशातील साई मंदिरातील पुजाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शिर्डी येथे सहा दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी शेलुबाजार येथील साईश्रद्धा संस्थांनच्या पुजाऱ्यालाही आमंत्रित करण्यात आले आहे या शिबिरासाठी मंदिराचे पुजारी म्हणून काम पाहत असलेले राजू डांगे हे शिर्डी येथे होणाऱ्या पुजारी प्रशिक्षण शिबिरासाठी रविवारी रवाना झाले आहे.

श्री साईबाबांचा आध्यात्मिक प्रकाश भक्तांच्या हृदयात रुजला आणि हळूहळू श्री साईभक्तांच्या संख्येत वाढत होत गेली. त्याचाच परिणाम म्हणून देश-विदेशातही श्री साईबाबांच्या मंदिरांच्या संख्यामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे.

आज प्रत्येक कोपरा हा श्री साईबाबांनी व्यापला आहे. या सर्व मंदिरांमध्ये व साईभक्तांमध्ये राबविलेल्या पद्धती आणि प्रणाली यामध्ये एकसुत्रीपणाचे अनुसरण असणे आवश्यक आहे. याकरिता देशभरात पसरलेल्या मंदिरांच्या पुजाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची साईभक्तांची मागणी लक्षात घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने या पुजाऱ्याऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.दि.१४ ते १९ जूलै या कालावधीत हे प्रशिक्षण शिबिर शिर्डी येथे संपन्न होणार आहे. शिबिरासाठी देशभरातील सलगदित साई मंदिरातील पुजाऱ्यासह जगभरातील साई मंदिरतील पुजारी या शिबिरामध्ये उपस्थित राहणार आहेत या शिबिरात प्रशिक्षक व पुजाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिरात देशभरातील साई मंदिर शिबिरासाठी निमंत्रण पत्र शेलुबाजार येथील साई श्रद्धा संस्थांचे अध्यक्ष मोहन राऊत यांना प्राप्त झाले असून त्यांच्यामार्फत साई श्रद्धा संस्थांनचे पुजारी राजू डांगे यांना प्रशिक्षणासाठी शिर्डी येथे पाठविण्यात आले आहे. रविवारी डांगे हे शिर्डीकरिता रवाना झाले आहे.

## व्हॅट दरवाढीविरोधात वाइन बारधारकांचे बंद आंदोलन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**वाशिम, दि. १४ :** राज्य सरकारने परमिट रूमवर (वाइन बार) लागू केलेल्या वाढीव व्हॅट दराच्या निषेधार्थ वाशिम जिल्ह्यातील सर्व बार आणि वाइन बारधारकांनी सोमवारी एकदिवसीय बंद पाळत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

राज्य शासनाने १ नोव्हेंबर २०२३ रोजी व्हॅट दर ५ टक्क्यांवरून आता थेट १० टक्क्यांपर्यंत वाढवला. यासोबतच लायसन्स फीमध्ये १५ टक्क्यांची वाढ आणि विदेशी मद्यावरील करात तब्बल १५० टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीचा तीव्र निषेध व्यक्त करत वाशिम जिल्हा बार अँड लिकर्स असोसिएशनच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. याआधी १६ नोव्हेंबर २०२ रोजी देखील परमिट रूम असोसिएशनने राज्यभरात मुकमोर्चा काढून शासनाकडे निवेदन दिले होते. मात्र शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, उलट आता पुन्हा व्हॅट वाढविला आहे. यामुळे व्यवसाय अडचणीत येण्याची शक्यता असून काम करणाऱ्या मजुरवर्गालाही बेरोजगारीचा सामना करावा लागेल अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली. व्हॅट दरवाढ कायम राहिल्यास लवकरच अनेक वाइनबार बंद पडतील, मजूर बेरोजगार होतील आणि त्याच वेळी अवैध मद्य धाब्यांना प्रोत्साहन मिळेल, परिणामी शासनाचाच कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडेल,'' असा इशारा असोसिएशनने दिला. आंदोलनादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्र जमून बार धारकांनी धरणे आंदोलन केले. नंतर प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देऊन व्हॅटदर वाढ मागे घेण्याची मागणी केली.

# मिठाईच्या माध्यमातून 'स्लो पॉयझनिंग'मध्ये वाढ!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १४ :** शहरासह तालुक्यातील दुग्धजन्य पदार्थाच्या विक्रीत झालेली लक्षणीय वाढ तसेच छोटे मोठे हॉटेल, खानावळी, बिर्याणी सेंटर ,नाश्ता सेंटर दूध, दही तूप लोणी ,पनीर अशा वस्तू विक्रेत्यांच्या दुकानामधून भेसळयुक्त पदार्थाची सर्रास विक्री होत आहे याची मानवी शरीराला अपायकारक व वैद्यकीय खर्चात सामान्य ची वाढ झाली असून या प्रकाराकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होऊन सदर विभाग निद्रावस्थेत आहे काय ?असा संशय नागरिक व्यक्त करीत आहेत .

मिठाई घेताना दुकान मोठे असो किंवा लहान, दुकानातून घेतलेल्या खाद्यपदार्थामध्ये भेसळ असण्याची शक्यता असते. फक्त भेसळच नाही तर खाद्यपदार्थांना अधिक आकर्षक करण्यासाठी वापरले जाणारे खाद्य रंगदेखील शरिरासाठी हानिकारक असतात. मिठाई जेवढी आकर्षक दिसते तेवढी जास्त ती हानिकारक असू शकते याचा विचारच ग्राहक मिठाई घेताना करत नाहीत.

यामुळे मिठाईमध्ये वापरले जाणारे रंग, खराब प्रतीचा सुकामेवा, रंगांमध्ये असलेले विषारी द्रव्य, चांदीचा वर्ख म्हणून वापरला जाणारा ॲल्युमिनियमचा वर्ख या सगळ्या गोष्टींचा परिणाम शरीरावर होतो. अशी मिठाई विकत घेणे म्हणजे विषाची परीक्षा ठरते. इंग्रजीमध्ये असलेली एक म्हण आहे, स्लो पॉयझनिंग म्हणजेच हळू हळू मारणारी गोष्ट.. या मिठाई किंवा खाद्यपदार्थ अशाचप्रकारे हळूहळू मानवी शरीरामध्ये विष पसरवतात.

पदार्थ विक्री बाबत च्या असंख्य तक्रारी आहेत दही, लोणी, खवा, रबडी तसेच इतर दुग्धजन्य पदार्थ मिष्ठान्न यामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ विक्री होत असल्याचे दिसते.

### अन्न व औषध प्रशासन विभाग निद्रावस्थेत



भेसळ विक्रीच्या दुकानात कोणत्याही शासनाचा अधिकारी चौकशी करत नाही . किंवा कोण्या दर्जाचे आहे ते पाहत नाही. त्यामुळे शहरात भेसळ विक्री करणाराचे धाडस वाढले तर दुसरीकडे भेसळयुक्त खाद्यपदार्थांमुळे तालुक्यात आजाराचे प्रमाणात वाढ झाली आहे. लोणी आणि पनीर तसेच दुधामध्ये भेसळ होत आहे. रिसोड तालुक्यामध्ये दुधाळ जनावरे असलेल्या शेतकऱ्याकडील जनावरांची संख्या कमी होत असल्याचे शेतकऱ्यांकडे दिसत आहे. लोकसंख्या सुद्धा वाढत आहे लोकसंख्येच्या प्रमाणात दूध घेणाऱ्यांच्यासंखेत सुद्धावाढ झालेली आहे. यातच एवढ्या मोठ्या लोकसंख्येला दूध पुरवठा होतो कसा याचा सुद्धा निष्कर्ष काढणे गरजेचे आहे .

> सॅम्पल घेतो व नागपूर येथील लॅब मध्ये तपासणी करता पाठवतो परंतु तसे काही आढळून आले नाही.
>
> **-भाऊराव किसनराव चव्हाण,** सहाय्यक आयुक्त
> अन्न औषध प्रशासन, वाशिम

> भेसळ युक्त दुग्धजन्य पदार्थांमुळे नागरिकांच्या आजारात वाढ होत आहे. ॲसिडिटी व फूड पॉइझनचे आजार होऊ शकतात.
>
> **- डॉ. जयप्रकाश बगडे**
> माजी वैद्यकीय अधिकारी, रिसोड

रिसोड तालुक्यात सध्या स्थितीत तीन ते चार दुधापासून बनवलेले पदार्थ उद्योग आहेत. यांच्याकडे शासनाची माहिती आहे . परंतु या उद्योग व्यवसायाला जिल्हा प्रशासन अधिकारी भेट देऊन तपासणी करतात काय. याबाबत नमुने तपासत असतील तर शुद्ध प्रतीचे आहेत काय ? अशी विचारणा नागरिक करीत आहेत. खव्यापासून पेढा बनतोय

यामध्ये आलूचा किस व काशी फळाचा गर मिक्स करून वजन वाढविण्याकरिता वापर करीत असल्याचे खात्री लायक सुत्रांनी दिलेली माहिती आहे. जिल्हा ठिकाणी स्वीट मार्ट किराणा व्यवसाय अशा ठिकाणी सदर अधिकारी भेटी देऊन तपासणी करतात . परंतु ग्रामीण भागात व तालुक्याच्या ठिकाणी नमुने तपासत सुद्धा नाहीत . हे विचार करणे योग्य आहे.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला । मंगळवार, दि. १५ जुलै २०२५



## थोडक्यात

### मनाला झालेला कॅन्सर माणसाला मातीत घेऊन जातो- सीमा वानखडे



**बोरगांव मंजू :** शरीरातील विविध गाठी असून शासनस्तरावरून व विविध स्वयंसेवी संस्था आर्थिक सहकार्य करतात त्यामुळे झालेला कॅन्सर बरा होऊ शकतो पण मनाला झालेला कॅन्सर माणसाला मातीत घेऊन जातो त्यामुळे मनाला होऊ देऊ नका असे मत आरोळी चे सिमा वानखडे यांनी व्यक्त केले. रोजची धावपळ त्यात सकस आहाराची अनियमित्ता अन वाढलेली व्यसनाधीनता यामुळे विविध प्रकारच्या आरोग्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे त्यामुळे कॅन्सर सारख्या आजाराबाबत समज गैरसमज ग्रामीणसह शहरी भागात वाढलेलीच आहे.आरोळी सामाजिक संस्था वणी रंभापूरच्या वतीने महिला व युवतीसाठी कॅन्सर या आजारावर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे डॉ मोनाली शिंदे व राजश्री साबळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शुभांगी लाहुडकर तायडे यांनी सुद्धा योगाचे व्यायामाचे महत्त्व पटवून देत संचालन सह प्रास्ताविक करून उपस्थितांचे आभार मानले.

### आषाढी पौर्णिमेपासून वर्षवासाला तालुक्यात ठिक ठिकाणी सुरुवात




**बाळापूर :** भारतीय बौद्ध महासभा बाळापुर तालुका यांच्या. आदेशाचे पालन करून आषाढ पौर्णिमेपासून प्रवचन मालिकेला ग्राम हसनापूर येथून सुरुवात करून दहा तारखेपासून आज १३ तारखेपर्यंत दोन प्रवचन मालिका आषाढ पौर्णिमा गुरुपौर्णिमा वर्षावासाचे महत्त्व आणि विशुद्धी मार्ग या दोन प्रवचन मालिका प्रवचनकार बाळापुर तालुका अध्यक्ष राहुल इंगळे आणि संस्कार उपाध्यक्ष साहेबराव वानखडे यांनी सुरु केली आहे. आतापर्यंत तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी वर्षावासातील पाच ग्रंथांना भेटी देऊन पाचही ग्रंथ वाचकाचा पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यामध्ये हसणापूर येथील ग्रंथ वाचक बबीता निखाडे,शिल्पा निळकंठ बोरगाव वैराळे येथील ग्रंथवाचक माणिक किसन वानखडे खंडाळा येथील ग्रंथावाचक दीपक पाटील अंदुरा येथील ग्रंथावाचक पूज्य भंते धम्मदीप जी आणि आदित्य उमाळे या ग्रंथवाचकांचा तालुका अध्यक्ष राहुल इंगळे कोषाध्यक्ष भीमराव डोंगरे उपाध्यक्ष साहेबराव वानखडे हिशोब तपासणीस सागर निखाडे सचिव वसंतराव वानखडे संघटक दादाराव वानखडे यांचा सत्कार करण्यात आला तालुका कार्यकारिणीचा सुद्धा उपासक-उपासिकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला ग्रंथ पठण चालू असताना सर्व ठिकाणी उपासक उपासिका तसेच सहान बालक बालिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या प्रवचन मालिका संपल्यावर सरनत्तय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### संध्या वाघोडे यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला सचिव संघटकपदी निवड

**देवरी :** अकोला जिल्हा परिषदेच्या माजी जि प अध्यक्ष संध्याताई हरिभाऊ वाघोडे ह्यामहिलांमध्ये सक्षम नेतृत्व म्हणून प्रसिद्ध आहेत. अकोला जि प अध्यक्षस्थानी असताना त्यांनी महिलांच्या करता अनेक नवीन नवीन उपक्रम राबविले त्यामुळे अकोला जिल्ह्यामधील महिलांमध्ये त्यांचा चांगला ठसा उमटलेला आहे. राष्ट्रवादी पक्षाचे आमदार अमोल दादा मिटकरी यांच्या नेतृत्वात ते काम करत असून आजपर्यंत त्यांनी अनेक गोरगरिबांची कामे मार्गी लावलेली आहे. आणि जि प अध्यक्ष असताना त्यांनी अनेक अडचणीच्या कामांना वाचा फोडली. गत काही दिवसाआधी सौ संध्या ताई वाघोडे यांची निवड करण्यात आली त्यामुळे अनेक गोरगरिबांच्या आशा पल्लवी झालेलयाआहेत. माणूस हा कर्माने मोठा होतो ..करमच माणसाचे सर्वात श्रेष्ठ धन आहे. त्यांची निवड झाल्यामुळे अकोला जिल्ह्यामध्ये एक नव चैतन्य जनसामान्यांमध्ये पाहण्यास मिळते.. आजही हरिभाऊ वाघोडे हे जास्त बोलणार पण नाहीत. परंतु अडली नडली कामे तातडीने पूर्ण करतात. तो व्यक्ती त्यांचा परिचयाचा असो किंवा नसो किंवा अकोला जिल्हा बाहेरचा असो किंवा कुठलाही असो.. त्यामुळे हरिभाऊ वाघोडे यांची जनसामान्यांमध्ये ख्याती आहे.

## निधन वार्ता

### संजय चव्हाण



**अकोट :** तालुक्यातील मंचनपूर(सावरा) येथील संजय रमेशराव चव्हाण वय ४५ यांचे आज १४/७/२०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले असून त्यांच्या मागे पत्नी व चार मुली एवढा परिवार आहे. त्या परिवारावर प्रचंड दुःखा चा डोंगर कोसळला आहे

# जिल्ह्यात दारू विक्री दुकाने व वाईन बार बंद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ : मद्य विक्रीपासून मोठ्या प्रमाणात शासनाला महसूल प्राप्त होत असतो. राज्य शासनाच्या उत्पन्नाचा तो एक प्रमुख स्त्रोत आहे. त्यामध्ये आणखी भर घालण्यासाठी मद्य विक्रीचा कर व नूतनीकरण शुल्कामध्ये राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात वाढ केली. त्याचा आर्थिक फटका अनुज्ञप्तीधारकांना बसत आहे. याचा निषेध करण्यासाठी आज जिल्ह्यात अकोला जिल्हा वाईन व बियर बार असोसिएशनच्यावतीने एक दिवसीय बंद पुकारून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.**




या बंदमुळे मद्यप्रेमींची मोठी कोंडी झाली आहे . या संदर्भात विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले..देशी दारू, बियर आणि वाईन या सर्व गोष्टी विक्री करण्याची शासनाची परवानगी गरजेची असते. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून त्यावर नियंत्रण ठेवण्यात येते. दारूची विक्री केंद्रे उघडण्यासाठी, हॉटेल्स आणि बारमध्ये दारू देण्यासाठी किंवा वेगवेगळ्या क्लबमध्ये दारू देण्यासाठी, उत्पादन शुल्क विभागाकडून वेगवेगळे परवाने जारी केले जातात. राज्यातील विदेशी दारू आणि देशी दारूची खरेदी, ताबा, वाहतूक, वापर यासाठी वेगवेगळ्या परवान्यांची आवश्यकता असते. तळीरामांकडून दररोज लाखो लीटर मद्य रिचवले जाते. त्यामुळे मद्य विक्रीतून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो. राज्य शासनाने आता कर व नूतनीकरण शुल्कामध्ये आणखी मोठ्या प्रमाणात वाढ केली. कर व शुल्क वाढीचा भार अनुज्ञप्तीधारकांवर पडत आहे. त्यामुळे या विरोधात आज जिल्यात बंद पाळण्यात आला.. अकोला जिल्हा वाईन बार व बियर बार असोसिएशने कर व शुल्क वाढीचा तीव्र विरोध केला. शासनाकडून परमिट रूम मधील मद्य विक्रीवर १० टक्के व्हॅट करामध्ये वाढ केली.याशिवाय २०२५-२६ च्या नूतनीकरण शुल्कामध्ये १५ टक्के वाढ करण्यात आली आहे. या दोन्ही निर्णयामुळे अनुज्ञप्तीधारकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत आहे. हे अवाजवी व अन्यायकारक कर व शुल्क वाढ रद्द व्हावी, यासाठी अकोला जिल्हा वाईन व बियर बार असोसिएशनने निषेध करून आज एकदिवसीय बंद पुकारला. या बंदमध्ये परमिट रूम बंद ठेवण्यात आल्या आहेत. या बंदच्या पार्श्वभूमीवर संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या मोर्चात जिल्ह्यातील बार चालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**एरव्ही दारू विक्रीची दुकानें उघडण्याची वेळ सकाळी १० वाजताची असताना मात्र दररोज देशी दारू विक्रीची दुकानें सकाळी ७ वाजता पासूनच उघडली जातात. तर विदेशी मद्य विक्रीची दुकानें सकाळी ९ वाजताच उघडली जातात. त्यामुळे तळीराम बिनधास्त असतात. सवयी प्रमाणे आज दुकानें उघडली गेली नसल्याने त्यांची मोठीच पंचाईत झाली होती. त्यामुळे नाईलाजाने त्यांनी अवैध मार्गाचा वापर करीत आपली गरज पूर्ण केली.**

# सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १४ :** स्थानिक श्रीजी कॉलनी स्थित सेंट पॉल्स अकॅडमी येथे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया हे होते तर , उपाध्यक्ष लूणकरण डागा , सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया,रेखा चांडक, सुधा डागा,दीपम लखोटिया,अवनी लखोटिया तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे , उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल तसेच पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे,यांची मंचावर उपस्थिती होती.



गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनीनी मंचावरील सर्व पाहुण्यांचे व शिक्षकांचे पूजन करून त्यांना पुष्पगुच्छ दिले.. विद्यार्थिनी वेदश्री हाडोळे हिने तिच्या भाषणातून गुरुची महिमा सांगितली.व निर्मला पुंडकर आपल्या जीवनातील गुरुचे महत्त्व सांगितले.तसेच मुख्याध्यापक विजय बिहाडे आपल्या भाषणातून असे सांगितले की पहिला गुरु ही आपली आई असते.तसेच जीवनात आपल्याला जो कोणी चांगला मार्ग दाखवतो तो आपला गुरु असतो. व उपमुख्याध्यापिका रिंकू अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले.कार्यक्रमाचे संचलन सुवर्णा टाक व आभार प्रदर्शन माधुरी मानकर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले .

## गुरुपौर्णिमा निमित्ताने शेरावाली माता मंदिराचे भूमिपूजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आकोलखेड, दि. १४ :** संत श्री गुलाब बाबा आश्रम (श्री क्षेत्र भक्तीसागर आकोलखेड ता आकोट येथे गुरुपौर्णिमा निमित्ताने शेरावाली माता मंदीर चे भूमीपूजन चंद्रकुमार अग्रवाल (चिन्नु भैय्या) यांच्याहस्ते करण्यात आले आहे. यावेळी गोपाल उमक टाकरखेड मोरे समाधी मंदीर अध्यक्ष, माऊली शांताराम महाराज एकलारा काटेल धाम यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमात होती प्रमुख पाहुणे म्हणून सर्व प्रभुदास गुहे, मधुकर मामा पोटदुखे, दशरथ मामा बोरोडे, गजाननराव रोडे, रामदास राऊत, वामनराव पवार, अशोकराव पोटदुखे, प्रल्हादराव खलोकार, डॉ हिरामण शेडे, देवीदास शेवडे, केशवराव चौरागडे, मोहनराव वरेकर, राजू बायवार, गणेश अस्वार, चंदु बहादुरे, आदेश कुरुवाडे, महादेव फुलकर, महेश निकाळे, गिरी मामा, किशोर तायडे, गोपाल जायले, वासुदेव सुर्यवंशी, सुनेर सिंग जालंधर, गोपाल प्रिपाळे, अरुण पोटदुखे आदी मान्यवर



उपस्थित होते. यावेळी चंद्रकुमार अग्रवाल यांचा सत्कार विठ्ठल महाराज खलोकार यांच्याहस्ते करण्यात आला आहे शांताराम महाराज यांचा सुध्दा सत्कार करण्यात आला होता. माऊली शांताराम महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दर पौर्णिमेला महाप्रसाद सेवा करण्यात आली आहे. माऊली शांताराम महाराज यांनी आश्रमला महाप्रसाद करीता ताट व प्याले दिले आहे. भक्त मंडळींनी पालखी सोहळा व महाप्रसाद सेवेचा लाभ घेतला आहे यावेळी विठ्ठल महाराज खलोकार यांनी आभार व्यक्त आहे.

## मुंडगावमध्ये एक दिवसीय नवीन मतदार नोंदणी शिबिर संपन्न



**मुंडगाव :** अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथे एक दिवशीय नवीन मतदार नोंदणी शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे आयोजन येथील रितेश उजिळे मित्र परिवाराच्या वतीने रविवार दि. १३ जुलै रोजी सुपीनाथ महाराज मंदिर येथे करण्यात आले. या मतदार नोंदणी शिबिरामध्ये २५० ते ३०० युवक युतीने या मतदार नोंदणी शिबिराचा लाभ घेतला. या मध्ये रितेश उजीळे,अक्षय ढोकणे,नितीन चांदणे, विक्रम देशमुख, राम कुटे, क्रांती वाघ,मुन्ना गावंडे,शुभम चांदणे,ऋषी कावरे ,गौरव शिरसाठ, ओम लोंढे, संजय धांडे, साहिल गाडगे,नयन पिंपळे, अनुराग म्हैसने ,अनुप काळे, गोलू गावंडे,वतन सरकटे, ऋषिकेश बिलबिले, कुणाल कळसकर, तन्मय असोले,चेतन वाघ, प्रज्वल कुयटे,अमन पेढेकर,ऋषी वाघ, प्रतीक तायडे, यश खोकले, अतुल गाढे,देवगिरे मेडम, नुसर खान व पत्रकार विशाल गवई सह गावकरी उपस्थित होते.

# सर्व प्रक्रिया आटोपल्यावर पीक विमा मिळण्यासाठी विलंब का?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अडगाव बु, दि. १४ :** सन २०२४ चा रब्बी व खरीपाच्या पिक विम्याबाबत सर्व प्रक्रिया आटोपल्यावरही गेल्या एक वर्षापासून शेतकरी विमा लाभापासून वंचित असल्याने शेतकरी संघटनेच्या वतीने कृषी अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.

पंतप्रधान पिक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी जी तत्परता विमा कंपनी कडून दाखविली जाते तशी तत्परता पिक विमा मंजूर झाल्यानंतर आवश्यक त्या सर्व प्रक्रिया आटोपल्यावरही शेतकरीबांधवां च्या बँक खात्यात जमा करण्यासाठी विमा कंपनी का

### शेतकरी संघटनेचे कृषी अधिक्षकांना निवेदन



दाखवत नाही असा सवाल शेतकरी करीत आहेत. सन २०२४ च्या खरीप व रब्बी पिक विमा मंजूर होवुन बराच कालावधी उलटला तरी सुध्दा शेतकरी बांधवां च्या बँक खात्यात रक्कम जमा झाला नाही. आज शेतकरी बांधवांना ऊगवलेले पिक वन्य प्राण्याच्या तावडीतून वाचविण्यासाठी दिवस रात्र शेतात पहारा द्यावा लागत आहे.

शेतीतील पिकाच्या मशागतीसाठी आज शेतकरी बांधवांना पैशांची अडचण भासत आहे. एकीकडे महागलेले खत,औषध, डवरणी खुरपणी व मजुरांची टंचाई च्या समस्येमुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. अशातच त्याच्या हक्काचे खरीप व रब्बी पिक विम्याचे पैसे जमा होण्यास विलंब होतं आहे.सन २०२४ चा मंजूर झालेला पिक विमा लवकरात लवकर शेतकरी बांधवां च्या बँक खात्यात जमा करण्यासाठी शेतकरी संघटनेच्या वतीने कृषी अधिक्षक शंकर किरवे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शेतकरी संघटनेचे अमोल मसुरकार, अनिल मानकर, गोपाल चांडक,राहतखॉ, दिनेश गिर्हे, देविदास ढोकणे, अमोल भोपळे, शिवाजी ढोकणे,रितेश देशमुख, शैलेश ठाकूर, सुभाष राहाटे, विजय राहटे, रविंद्र भोपळे व छोटु राहाटे हे कार्यकर्ते उपस्थित होते.

# फवारणी करताना शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी

## कृषी विभागाने दिला सावधानतेचा इशारा!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. १४ :** खरीप हंगामात पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी किटकनाशक व बुरशीनाशकांची फवारणी करणे अत्यंत आवश्यक असते . परंतु, ही किटकनाशके अत्यंत विषारी असल्यामुळे फवारणी करताना शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. यामुळे विषबाधेचा धोका टाळता येईल आणि शेतकऱ्यांचे आरोग्य व पर्यावरणाचे रक्षण होईल. असे आवाहन तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बाळापूर यांनी केले आहे: शेतकऱ्यांनी नेहमी मान्यताप्राप्त विक्रेत्यांकडूनच किटकनाशके खरेदी करा. किटकनाशकाच्या पॅकेटवरील माहिती पत्रक (लेबल) काळजीपूर्वक वाचा आणि त्यातील सूचनांचे पालन करा. बिल व माहिती पत्रक जपून ठेवा आणि किटकनाशकाची मुदत तपासा. फवारणीचे मिश्रण तयार



करताना शिफारशीप्रमाणे मोजपट्टीने योग्य मात्रा वापरा. फवारणी करताना हातमोजे, मास्क, डोळ्यांचे संरक्षण गॉगल, पूर्ण बाह्यांचे कपडे आणि टोपी वापरा. फवारणीचे मिश्रण तयार करताना स्वच्छ पाणी वापरा आणि ते तयार करताना अन्नपदार्थ, पिण्याचे पाणी किंवा जनावरे यांच्यापासून दूर ठेवा. फवारणी करताना काळजी घ्या. फवारणी सकाळी किंवा सायंकाळी थंड वेळी करावी, जेणेकरून वारा कमी असेल आणि विषारी द्रव्य उडून जाण्याचा धोका कमी होईल. फवारणी करताना वाऱ्याच्या दिशेने उभे राहू नका, जेणेकरून किटकनाशक शरीरावर येणार नाही. फवारणी उपकरणे हात पंप स्वच्छ आणि योग्य असल्याची खात्री करा. फवारणीनंतर हात, तोंड आणि शरीर स्वच्छ पाण्याने आणि साबणाने धुवा. फवारणी उपकरणे स्वच्छ करा आणि वापरलेली रिकामी कंटेनर योग्य पद्धतीने नष्ट करा. फवारणी केलेल्या पिकांवर कापणीपूर्वी योग्य कालावधी पाहा जेणेकरून अन्नपदार्थांमध्ये विषारी द्रव्यांचा अंश राहणार नाही.

### फवारणीमुळे विषबाधा झाली?

उलटी, चक्कर येणे, श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणें दिसल्यास दिसल्यास तात्काळ जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात संपर्क साधा. उपचारासाठी किटकनाशकाचे पॅकेट किंवा माहिती पत्रक डॉक्टरांना दाखवा. अधिक माहितीसाठी स्थानिक कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठ किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

**- सागर डोंगरे**
तालुका कृषी अधिकारी बाळापुर

## पंचयात समितीची बाळापूर तालुक्यातील सात गणाची रचना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. १४ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती च्या निवडणूका काही महिन्यावर येऊन ठेपल्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये आज दि १४ जुलै रोजी गण रचनेचा सोहळा पार पडला.
महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१(सन १९६२) च्या महाराष्ट्र अधिनियम ५ चे कलम ९(१) अन्वये शासन अधिसुचना क्रमांक: जिपनि २०२५ पंस गण या प्रमाणे अंदुरा जि.प सर्कल मधी दोन गण अंदुरा निंबा, बाहदुरा, निंबी, काजीखेड,हिंगणा निंबी, मोखा, नागद, सागद, वझेगाव तर अंदुरा दुसरे गण अंदुरा, हात्ता,नया अंदुरा, सोनाळा, आणि हातरुण सर्कल गण १ मधील गावे बोरगाव वैराळे, हातरुण, मालवाडा, शिगोली, मोरझाडी, उरळ बु व गण २ मधील गावे लोहारा, डोंगरगाव,कवठा, कारंजा रम, अंत्रीमलाकापूर,मोरगाव तर निमकर्दा सर्कल मधील पंस गण सादिजन,कसुरा,उरळ खु, कंळबी म, कंळबा बु, मनारखेड, टाकळी खो आणि, निमकर्दा गण २ मधील गावे खंडाळा, मांजरी, निमकर्दा, टाकळी नि, हसणापूर, जोगलखेड तर व्याळा पंस गण १ बारलिंगा,खिरपुरी खु, रिधोरा, गायगाव, दधम बु, व्याळा पंस गण २ मधील गावे व्याळा कान्हेरी ग, मानकी, आणि ७३पारस पंस गण १ पारस,१, ७४पारस २,कोळासा, कुपटा, मांडोली, शेळद, सातरगाव, भिंकुडखेड, देगाव पंस गण बटवाडी बु, बटवाडी खु, मांडवा बु, मांडवा खु, गाडेमोड, सांगवी जोम,खामखेड, चिंचोली गणू, पिंपळगाव, तामशी देगाव पंस गण २ मधील गावे नादखेड, खिरपुरी खु, देगाव भरतपूर, नकशी, तालुक्यातिल शेवटचा पसन गण वाडेगाव भाग १ मधील प्रभाग क्र १,२,३ . धनेगाव,तर वाडेगाव भाग २ मधील प्र क्र ४,५,६ अशी बाळापूर पंचायत समित्या गण निहाय रचना जाहीर केली आहे.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

बुलडाणा, मंगळवार १५ जुलै २०२५ www.ajinkyabharat.com



## थोडक्यात

### १७ वर्षीय मुलीचे व्हिडीओ व्हायरल

**खामगाव** - प्रेमसंबंध ठेवण्यास नकार देणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला युवकाने तिचे व्हीडीओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत शहरालगत असलेल्या एका गावातील मुलीने शहर पोस्टेला तक्रार दिली असून यावरुन शहर पोलिसांनी बिरेंद्र नरेंद्र चौधरी (२३) ह्याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

### युवकाचा डोहात बुडून मृत्यू

**खामगाव** : बारी भैरवगड या प्रसिद्ध तीर्थक्षेत्री हनुमान मंदिराजवळील डोहात बुडून एका। २३ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अक्षय सिद्धार्थ भोजने (रा. अकोला) असे मृत युवकाचे नाव आहे. अक्षय भोजने हा आपल्या मित्रांसोबत वारी भैरवगड येथे हनुमान मंदिराचे दर्शन घेण्यासाठी आला होता. दर्शनानंतर, मंदिरालगतच्या नदीतील राजण्या डोहात पोहण्यासाठी तो उतरला. मात्र, उंचावरून उडी मारताना त्याा डोक्याला जोराची धडक बसली आणि तो बेशुद्ध अवस्थेत पाण्यात बुडाला. घटनेनंतर त्याच्या मित्रांनी आणि स्थानिक ग्रामस्थांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली. काही वेळाच्या शोधानंतर स्थानिक नागरिकांनी अक्षयचा मृतदेह डोहातून बाहेर काढला. घटनेची माहिती मिळताच सोनाळा पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. या प्रकरणी अनमोल भोजने यांच्या तक्रारीवरून सोनाळा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### मित्र फाऊंडेशनच्या वतीने सीए परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

**नांदुरा** : महत्वाची व प्रतिष्ठेची समजली जाणाऱ्या सीए परीक्षेचा अंतिम निकाल ६ जुलै रोजी जाहीर करण्यात आला. या परिक्षेत फणसे ले आऊट नांदुरा शहरातील रहिवाशी असलेले फुटपाथवर पाणीपुरी, भेल इत्यादी व्यवसाय करणारे रविंद्र द्वारकादास शर्मा यांचा मुलगा चिं जितेंद्र शर्मा हा मे २०२५ मध्ये झालेल्या सि ए च्या परीक्षेत उत्तीर्ण झाला आहे, मित्र फाऊंडेशन नांदुरा चे सर्व सदस्य व फणसे ले आऊट मधील सर्व महिला भगिनी व पुरुषांनी जितेंद्र शर्मा व त्याचे वडील श्री रवि शर्मा व मोठा भाऊ मनोज शर्मा यांचा शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार केला.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १६५० - २३८१ |
| गहू | २४०० - २६०० |
| तुर | ५०००- ६५५० |
| हरभरा | ४००० - ५८६० |
| सोयाबीन | ३६५० - ४४०० |
| भुईमुग | ३८०० - ५७११ |
| धने | ४८०० - ५४०० |
| उडीद | ३००० - ५५०० |
| मूंग | ५६०० - ६४०० |
| मलाई चना | ५२००-५२०० |

# जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही - डॉ.शिंगणे

## जनतेच्या मनातली खदखद ओळखूनच जनआक्रोश मोर्चाचे आयोजन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**सिं.राजा दि. १४** : निवडणुकी पूर्वी महायुती पक्षांनी शेतकरी, शेतमजूर, लाडकी बहीण,बेरोजगार युवकांना जी आश्वासने दिली होती ती तत्काळ पूर्ण करावी अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने काढण्यात आलेल्या शेतकरी,जन आक्रोश मोर्चाद्वारे करण्यात आली. सोमवारी येथे सदर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मोर्चेकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन प्रांत अधिकाऱ्यांमार्फत सरकारला दिले आहे.

सोमवार दि.१४ जुलै रोजी दुपारी १२ वाजता शिवाजीनगर टी पॉईंट येथून शेतकरी,जन आक्रोश मोर्चाला सुरुवात झाली. मोर्चा मुख्य रस्त्याने प्रांत अधिकारी कार्यालयावर दाखल झाला. प्रारंभी माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे, शिवसेना उबाठा चे जिल्हा सहसंपर्क प्रमुख छगनराव मेहेत्रे जिल्हा व अन्य मान्यवरांनी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना अभिवादन केले. त्यानंतर संत सावता महाराज भवन येथे सभा झाली. सभे नंतर प्रांत अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी रामभाऊ जाधव दिनकरराव देशमुख उबाठा उपप्रमुख बद्रीनाथ बोडखे,अजीम नवाज राही, तिसरा बापू देशमुख सय्यद रफिक, विलासराव देशमुख महाविकास आघाडी, मनसेचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक शिवाजी राजेजाधव यांनी केले तर सूत्रसंचालन सतीश काळे यांनी केले.





आपल्या शिवसेना स्टाईल भाषणात उबाठाचे जिल्हा सहसंपर्क प्रमुख छगनराव मेहेत्रे यांनी सरकारवर जोरदार टीका केली.हे सरकार केवळ आपली चमकोगिरी दाखवताना सोशल मीडियावर गुंग आहे. त्यांना सामान्यांचे प्रश्न समजत नाहीत.सामान्य माणूस रोज मरणाच्या आयुष्यात गुंतला आहे. शेती मालाला भाव नाही,सरकार दिलेली आश्वासने पूर्ण करीत नाही त्यामुळे सामान्य नागरिक त्रस्त असल्याचे मेहेत्रे यांनी म्हटले.

मोर्चा नंतर झालेल्या सभेत बोलताना माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी सरकारच्या शेतकरी,शेतमजूर,बेरोजगार, महिलाविरोधी धोरणांवर सडकून टीका केली. केंद्र सरकारने या देशाला फसवून अन्य देशात लपलेल्या उद्योजकांचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले मात्र ,या राज्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या कर्ज मुक्तीचे आश्वासन देऊन देखील सरकारने ते अद्याप पाळलेले नाही

शेतकरी या जगाचा पोशिंदा आहे त्याच शेतकऱ्याला आणि या राज्यातील एकूणच सामान्य घटनांना वाऱ्यावर सोडण्याचे काम या सरकारने केले आहे. या विरोधात शेतकरी,शेतमजूर,बेरोजगार,महिलांनी एकत्र येणे गरजेचे आहे सर्व घटकांना आश्वासने देऊन निवडणूक जिंकली परंतु आश्वासने पूर्ण केली नाही म्हणून सर्व घटक एकत्र आल्यास आपण सरकारला घाम फोडू शकतो,एकीकडे भारताची अर्थव्यवस्था वाढली म्हणतात परंतु भारतातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न कधी वाढणार असा सवाल कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी केला.

ही शोकांतिका असून निवडून येण्यापूर्वी या महायुती सरकारने अनेक आश्वासने दिली होती ती देखील या सरकारने पूर्ण केलेली नाही हा मोर्चा व यामाध्यमातून शेतकऱ्यांचा व अन्य सामान्य वर्गाचा आक्रोश दाखवत असून सरकारला आता जाग आली पाहजे असे डॉ.शिंगणे यांनी ठणकावून सांगितले.

## एसटीने घडविले ९.७१ लाख भाविकांना 'विठ्ठल दर्शन'

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१४** : आषाढी वारीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे लाखो भाविकांची यात्रा दरवर्षी सुरू असते. यंदा या यात्रेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) भाविकांच्या सेवेसाठी विशेष पुढाकार घेत ५ हजार २०० जादा बसेसची व्यवस्था केली. या माध्यमातून ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक प्रवाशांची सुरक्तिने-आण करत त्यांना विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घडवून देण्यात आले, अशी ही माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

३ ते १० जुलै २०२५ दरम्यान या बसेसनी २१ हजार ४९९ फेऱ्या केल्या. या सेवेतून एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये इतके उत्पन्न झाले असून, मागील वर्षाच्या तुलनेत यामध्ये ६ कोटी ९६ लाख रुपयांनी वाढ झाली आहे. २०२४ मध्ये २८ कोटी ९१ लक्ष रुपये उत्पन्न होते. ''हजारो भाविकांना सुखरूप दर्शन घडवण्यासाठी अथक मेहनत घेणारे एसटीचे चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी, पर्यवेक्षक व अधिकारी हे खरोखरच अभिनंदनास पात्र आहेत, असे परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले.

एसटी कर्मचाऱ्यांसाठी मोफत भोजन व्यवस्था : वारी काळात पंढरपूर येथे कार्यरत हजारो एसटी कर्मचाऱ्यांच्या भोजनाची अडचण लक्षात घेता, ५, ६ आणि ७ जुलै रोजी परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्वतःच्या खर्चातून मोफत जेवण व चहा-नाश्त्याची सोय उपलब्ध करून दिली होती. याचा लाभ हजारो कर्मचाऱ्यांनी घेतला.

या उपक्रमाबद्दल एसटी कर्मचाऱ्यांनी मंत्री सरनाईक यांचे आभार मानले. वारी सेवा हे केवळ वाहतूक व्यवस्थापन नव्हे, तर एक सामाजिक बांधिलकीचे उदाहरण आहे, हे यंदाच्या यशस्वी आयोजनातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## सा.बां.विभागाने रस्त्यातील खड्डा अखेर बुजविला

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.१४** : नांदुरा रोडवर रस्त्याच्या मध्यभागी पडलेला खड्डा तात्काळ बुजविण्यात येवून रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे अजय टप यांनी ४ जुलै रोजी केली होती.

या निवेदनाची तात्काळ दखल घेत सा.बां.विभागाच्या १३ जुलै रोजी रस्त्यातील खड्डा बुजविण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील अनके रस्त्यांची अवस्था पहिल्या पावसात दयनीय अशी झाली. रस्त्याांवर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच वर्दडीचा रस्ता असलेल्या नांदुरा रोडवर तर रस्त्याच्या मध्यभागी भलामोठा खड्डा पडल्याने हा खड्डा अपघाताला आमंत्रण देत होता. सदर रस्त्याच्या झालेल्या दयनीय अवस्था व रस्त्याच्या मधोमध पडलेला भलामोठा खड्डा पाहता सार्वजनिक बांधकाम उपविभाग - श्रेणी १ मलकापूर यांनी याकडे तातडीने लक्ष देवून तो खड्डा बुजविण्यात यावा, अन्यथा त्याा खड्ड्यात बेशरमचे झाड लावून आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रहार जनशक्ती



पक्षाचे जिल्हा उपप्रमुख अजय टप यांनी दिला होता. याची तातडीने सा.बां.विभागाने दखल घेत १३जुलै रोजी नांदुरा रोडवर पडलेला तो भला मोठा खड्डा चुरी, डांबर टाकून बुजवित नागरिकांना, वाहन चालकांना व पादचाऱ्यांना दिलासा दिला आहे.

## सोयाबीनवर ह्युमनी अळीचा प्रादुर्भाव; शेतकरी संकटात!

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.१४** : एकीकडे सोयाबीनचे दर घसरलेत. शेतकरी आर्थिक संकटात असताना दुसरीकडे यंदाच्या खरीप हंगामातील सोयाबीनवर ह्युमनी अळीने आक्रमण केल्याने उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या आळीचा प्रादुर्भाव चिखली तालुक्यातील खंडाळा मकरध्वज, शेलगाव जहागीर, मुंगसरी, अन्वी, तेल्हारा शिवारात दिसून आला आहे. या रोगावर उपाययोजना म्हणून महागड्या औषधींची फवारणी शेतकरी करत आहेत. तरीदेखील रोगांचा प्रादुर्भाव कमी होत नसल्याने शेतकरी धास्तावला आहे. सद्यस्थितीत सोयाबीन पीक नेमकेच उगवण अवस्थेत असल्याने तर काही



ठिकाणी कोळपणी अवस्थेत असून, ह्युमनी अळीमुळे सोयाबीन पीक धोक्यात आले आहे. खरीप हंगामावर शेतकऱ्यांची वर्षभर व्यवहाराची दारोमदार असते. ह्युमनी अळीमुळे सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट येण्याची भीती निर्माण झाली आहे. सोयाबीन झाडाला मर लागली असून, खोडअळ्या खोड नष्ट करत आहेत.

कृषी विभागाने तातडीने या परिसरातील शेतबांधावर भेटी देऊन, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची मागणी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे नेते विनायक सरनाईक यांच्यासह खंडाळा मकरध्वज येथील गणेश ठेंग, शिवाजी पवार यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे. येथील गट नं ४९१ मधील गोपाल अरूण भवरे, गणेश शंकरराव ठेंग यांच्या गावाशेजारील शेतात मोठ्या प्रमाणात ह्युमनी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. परिसरातसुद्धा हिच परिस्थिती गंभीर बनली आहे.

दरम्यान, तालुका कृषी अधिकारी कंकाळ यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या संदर्भात शिवार पाहणी करून खंडाळा मकरध्वज गावात शेतकऱ्यांची बैठक बोलवली असल्याची माहिती दिली आहे.

## सामान्य शिवसैनिकांची पसंती ठाकरे ब्रँडलाच.....

### बुलडाण्यातील शेकडो शिवसैनिक शिवबंधनासाठी मातोश्रीवर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१४** : राज्यात काहीही पडझड होत असली तरी मतदार असणारा सामान्य शिवसैनिक आजही मातोश्रीवर निष्ठा ठेवून आहे. बुलढाण्यातील शेकडो शिवसैनिक शिवबंधन बांधण्यासाठी आज मातोश्रीवर दाखल झाले. बुलढाणा विधानसभा मतदार संघातील मोताळा बुलढाणा व देऊळघाट परिसरातील अनेक गावातील शिवसैनिक प्राध्यापक डी एस लहाने यांच्या नेतृत्वात मुंबईत दाखल झाले आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते त्यांचा पक्ष प्रवेश होत आहे. सामान्य शिवसैनिकासोबतच विद्यमान सरपंच , माजी सरपंच, जिल्हा परिषद सदस्य यांचाही समावेश आहे. शिवसेना राज्य प्रवक्त्याा जयश्रीताई शेळके, संपर्कप्रमुख नरुभाऊ खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, जिल्हा समन्वयक प्राध्यापक डी एस लहाने यांच्या समन्वयातून सदर



शिवसैनिकांनी मातोश्रीचे शिवबंधन बांधण्याचा निर्णय घेतला. प्रस्थापित राजकीय पक्षांसाठी हा एक मोठा धक्का मानला जात आहे.

## केंद्रीय मंत्री जाधव, संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नांना यश

### लोणार पाणी पुरवठा योजनेसाठी २७ कोटी ४५ लाख रुपये मंजूर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**मेहकर दि.१४** : केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या अथक प्रयतांनी लोणार शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी २७ कोटी ४५ लाख रुपये उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर केले आहेत. आजच याबाबतचे शासकीय परिपत्रक जाहीर करण्यात आले आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त सहकार्यातून कार्यान कार्यान्वित करण्यात येत असलेल्या अमृत २.० अभियाना अंतर्गत लोणार शहरासाठी २७.४५ कोटी रुपये खर्चाच्या योजनेचा पाठपुरावा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन आमदार संजय रायमुलकर यांनी केला होता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावतीचे मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी देऊन हा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रक समितीकडे पाठविलेला होता. नगर विकास खात्याचे परिपत्रक क्रमांक अमृत २०२५ /प्र. क्र.११३ /न वि ३३ दिनांक १४ जुलै २०२५ नुसार या योजनेस मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. नगर विकास खात्याचे उपसचिव सचिन सहस्त्रबुद्धे यांच्या सहीने सदर परिपत्रक आज प्रसिद्ध करण्यात आले आहे.

केंद्र शासनाचे १३.७२५ कोटी रुपये तर राज्य सरकारचे १२.३५२ कोटी रुपये अनुदान या योजनेला प्राप्त होणार असून स्थानिक स्वराज्य संस्थेचा १.३७३ कोटी इतका हिस्सा राहणार आहे. एक कोटी ६५ लाख २४ हजार रुपये खर्चाचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येणार असून ५.५९ लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ उभारण्यात येणार आहे. १३.३२कोटी रुपये खर्चून अंतर्गत जलवाहिन्या टाकण्यात येणार आहेत. याव्यतिरिक्त इतर अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. १८ महिन्यात हा प्रकल्प पूर्ण करण्याची अट शासनाने घातली आहे.

सदर प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापक नगरपालिकेने नेमावयाचा असून प्रकल्पाची कार्यान्वयन संस्था लोणार नगरपालिका असणार आहे.

लोणार मधील तीव्र पाणीटंचाईची समस्या लक्षात घेता सदर प्रकला पाला प्रकल्पाला मंजुरी प्रदान करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे मंत्री प्रतापराव जाधव आणि माजी आमदार संजय रायमुलकर यांनी अथक प्रयत्न केले हे इथे उल्लेखणीय आहे. लोणार विकास आराखड्यातील उर्वरित कामे जलद गतीने होण्यास रकमेची उपलब्धता करून देण्यासाठी प्रतापराव जाधव व संजय रायमुलकर यांचे शासन पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

## अतिक्रमणधारकांना स्वयंरोजगाराकरिता पर्यायी जागा मिळालीच पाहिजेच्या जयघोषात दणाणले खामगांव शहर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१४** : खामगाव नगरपरिषदच्या तणाशाही कारभार पद्धतीची माहिती देण्यात आली, सरकारी नोकऱ्यांचा अभाव, मोठ्या इंडस्ट्रीज व इतर रोजगाराच्या संधी नसल्यामुळे, शेतीला पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे पिकाला भाव मिळत नसल्यामुळे, कोरोना सारख्या महामारिला ला सुद्धा कुठल्याही सरकारच्या मदतीशिवाय तोंड देऊन वर्षानुवर्षांपासून स्वयम रोजगार करून उदरनिर्वाह करत असलेल्या तरुणांच्या रोजगारवरती जेसीबी बुलडोझर चालवून केलेल्या नुकसानाची माहिती देण्यात आली.

गरीब शेतकरी , शेतमजूर, लघु उद्योजक व मजूर वर्ग हे सर्व या छोट्या छोट्या दुकानावर जाऊन आपल्या गरजेच्या वस्तू घेऊन उपजीविका चालवतात, या लघु उद्योजकांच्या व्यवसायामध्ये मोठी विक्री व मोठा नफा नसल्यामुळे हे स्वयंरोजगारक महागड्या कॉम प्लेक्स मध्ये दुकाने विकत घेऊ शकत नाहीत. व मोठे भाडे सुद्धा देऊ शकत नाही, ही सर्व स्वाभिमानी मेहनत करून उपजीविका करणारी तरुण पिढी व त्यांचे परिवार मागे पडू नये त्यांचे मुलांचे शिक्षण, बँकांची घेतलेले कर्ज, व इतर प्रायव्हेट घेतलेले कर्ज व त्याचे एम आय या छोट्याशा



व्यवसायावर अवलंबून आहेत, ही सर्व मंडळी अंधारात ढकलली जाऊ नये सावकारांच्या कर्जाखाली तुडवली जाऊ नये, म्हणून व त्यांचे भविष्य उज्वल होण्याकरता. या गरीब बेरोजगारांना अल्पशा दरामध्ये कायमस्वरूपी दुकाने देऊन अल्प उद्योजकांचे मजबुतीकरण व सशक्तिकरण सशक्त भारत निर्माण करण्याकरता, मोठ्या प्रमाणात जो ज्या ठिकाणी व्यवसाय करत असेल तिथे त्याला किंवा आजूबाजूला पर्यायी जागेवरती दुकाने देण्याकरता माननीय मुख्यमंत्री साहेबांन सोबत निधी मिळणे बाबत चर्चा झाली व लवकरच खामगावातील स्वयंरोजगार करणाऱ्या नवयुकांन करिता भरघोस निधी उपलब्ध करून जागोजागी दुकानाचे पर्याय उपलब्ध करून देण्यात येईल , व जागा देण्यासाठी जागेच्या पाहणीचे आदेश सुद्धा त्यांनी दिलेले आहेत. व याची पहिली फेरी येणाऱ्या दीड ते दोन महिन्यात सुरू करण्यात येईल,सर्वांना रोजगाराच्या संध्या देण्यात येईल असे आश्वासन आकाश फुंडकर यांनी संघटनेला दिले व नगर परिषद च्या माध्यमातून रेल्वे भिंतीला लागून जे अस्थाई दुकाने बनवीणार होते ते थांबविण्याचा आदेश दिलेत व स्वतःच्या निधीतून स्वयम् रोजगारांकरिता पर्यायी दुकाने बनवून देणार असा शब्द दादांनी दिला, दिलेला शब्द दादा पाळतील असा ठाम विश्वास खामगावातील स्वयंरोजगार करणाऱ्या तरुणांना आहे. आम्ही सर्वांना रोज कमावून खावे लागत असल्यामुळे दोन दिवस सुद्धा घरी राहू शकत नाही , त्या संदर्भात नगरपरिषद सोबत चर्चा करून सर्व केलेले तार फेंसिंग काढून तिथे रोज सकाळी साहित्य घेऊन येणे व संध्याकाळी घेऊन जाणे जोपर्यंत पर्याय जागा दिल्या जात नाही असे आश्वासन दिले. तसेच आम्हाला परत रस्त्यावरती उतरण्याची वेळ येणार नाही याची काळजी सुद्धा आपण घ्यावी अशी विनंती सुद्धा संघटनेच्या वतीने करण्यात आली. व पुढील होणारे साखळी उपोषण व अमरण उपोषण दादांच्या शब्दावरती थांबण्यात आले.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
मंगळवार, दि. १५ जुलै २०२५

# थोडक्यात

## फोटो व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार



**मंगरूळ दस्तगीर :** अल्पवयीन मुलीचे आंघोळ करतानाचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्या अत्याचार केल्यानंतर तिच्यासोबत लग्न केले. याप्रकरणी तक्रारीवरून मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्यात महेश नामक युवकाविरूध्द पोस्कोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक पोलीस ठाणे हद्दीत ही घटना घडली.

## युवतीची छेडखानी: युवकाविरुद्ध गुन्हा

**चिखलदरा :** शौचास गेलेल्या बहिणीपैकी एकीसोबत युवकाने छेडखानी करून मारहाण केल्याची घटना चिखलदरा पोलीस ठाणे हद्दीत घडली. याप्रकरणी २२ वर्षीय पीडित मुलीच्या तक्रारीवरून राहुल मुंड याच्याविरूध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला. अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविले शिरजगाव कसबा एका अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना शिरजगाव कसबा पोलीस ठाणे हद्दीत १० जुलै रोजी घडली. याप्रकरणी वडिलांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

## औद्योगिक संस्थेचे कुलूप तोडून साहित्य लंपास

**धामणगाव रेल्वे :** येथील एमआयडिसी परिसरातील बिरसा मुंडा मागासवर्गीय औद्योगिक संस्थेच्या कार्यालयाचे कुलूप तोडून त्यातील संगणक साहित्यासह १४ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ६ ते १० जुलै दरम्यान घडली. याप्रकरणी राहूल देवीदास वहिले वय ४५, रा. गुंजी यांच्या तक्रारीवरून दत्तापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

## सातरगाव शेतशिवारातून दुचाकी चोरी

**तिवसा :** शेतात चक्कर मारण्याकरीता गेलेल्या शेतकऱ्याने त्यांनी त्यांची सिडी डिलक्स एमएच २७ एएन ९१४४ क्रमांकाची दुचाकी शेतासमोरील रस्त्यावर उभी करून ठेवली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची सातरगाव शिवारात १० जुलै रोजी घडली. याप्रकरणी गजानन रघुनाथ देशकर वय ४०, रा. सातरगाव यांच्या तक्रारीवरून तिवसा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

## कळाशी येथे युवतीला काठीने मारहाण करून धमकी

**दर्यापूर :** मोटारसायकलला लाथा मारताना नातेवाईकाला हटकल्याने त्याने युवतीला शिवीगाळ करून काठीने मारहाण केल्याची घटना कळाशी येथे घडली. याप्रकरणी संध्या दिलीप खेडकर यांच्या तक्रारीवरून गजानन सुभाष खेडकर रा. कळाशी याच्याविरूध्द दर्यापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## दुचाकीला कावा मारल्यावरून वाद; एकाला मारहाण

**परतवाडा :** कोर्टातून काम संपवून घरी जात असलेल्या दुचाकीस्वाराला मागून आलेल्या अन्य एका दुचाकीस्वाराने कावा मारला. यावेळी पाहून वाहन चालव असे म्हटल्याने दुचाकीवरील दोघांनी त्याला शिवीगाळ करून काठीने मारहाण केली. येथील कश्यप पेट्रोलपंपानजिक ही घटना घडली. पप्पू नामक इसमाने परतवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे दर्शन सुंदरलाल चौधरी रा. ब्राम्हणवाडा व त्याचा सहकारी यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

## जुन्या वादातून युवकाला मारहाण करून धमकी

**तिवसा :** दुकान बंद करून मित्रासोबत दुचाकीने घरी जात असलेल्या युवकाला जुन्या वादातून एकाने काठीने मारहाण करून धमकी दिल्याची घटना येथील बाजार लाईन परिसरात घडली. याप्रकरणी आकाश नरेंद्र बनसोड वय २२, रा. त्रिमुर्तीनगर, तिवसा यांच्या तक्रारीवरून आकाश भारत गडेकर वय २८ याच्याविरूध्द तिवसा पोलिसांत गुन्हा दाखल केला.

## क्षुल्लक कारणावरून पट्ट्याने मारहाण

**मोर्शी :** वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने रस्त्यावरील मोटारसायकल बाजूला केली या कारणावरून एकाने वाद घालून ट्रॅक्टर मालकाला शिवीगाळ करून बेल्टने मारहाण केली. रामजीबाबा नगर, मोर्शी येथे ही घटना घडली. याप्रकरणी जखमीची पत्नी सिमा गजानन तुळसकर यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे गजानन पंजाबराव ठाकरे याच्याविरूध्द मोर्शी पोलिसांत गुन्हा दाखल केला. पुढील तपास मोर्शी पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

## शाळेतून अल्पवयीन मुलगा बेपत्ता

**तिवसा :** सुटी दरम्यान विद्यार्थी शाळेच्या प्रांगणात खेळत होते. त्या दरम्यान एक अल्पवयीन मुलगा वर्गात पोहोचला नाही. तो बेपत्ता झाल्याची घटना १० जुलै रोजी घडली. या संदर्भात शिक्षकाने त्याच्या परिवाराला याबाबत माहिती दिली. वडिलांनी तिवसा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलीस मुलाचा शोध घेत आहे.

# घोषणा मोठ्या, कृती शून्य! मराठी भाषा विद्यापीठाकडे शासनाचे दुर्लक्ष

## मराठी भाषेची हेळसांड : रिद्धपूर विद्यापीठाला अद्याप एक रुपयाचेही अनुदान नाही!

। संजय देशमुख ।

**अमरावती, दि. १४ :** अमरावती शहरातील प्रमुख राजकमल चौकात लावण्यात आलेल्या एका बॅनरमुळे पुन्हा एकदा मराठी भाषेच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. ''महाराष्ट्र शासनाचे मातृभाषेवर दुर्लक्ष मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरला स्थापनतेपासून आजतागायत एक रुपयांचंही अनुदान दिले नाही!'' असा तीव्र मजकूर या बॅनरवर छापण्यात आला असून, तो शहरातील नागरिक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी आणि समाजकारणात सक्रिय असलेल्या व्यक्तींमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

**मराठीचा मुद्दा केवळ भावना नाही, हक्काचा आहे! :** राज्यशासनाने ज्या उद्देशाने विद्यापीठ स्थापन केलं तो हेतूच जर निधी अभावी पूर्णत्वाला जात नसेल, तर शासनाची मराठीप्रेमाची घोषणा केवळ ढोंगच ठरते. हे विद्यापीठ मराठी भाषेच्या उच्चतम अध्ययनासाठी सक्षम ठरू शकेल, पण त्यासाठी शासनाच्या इच्छाशक्तीची गरज आहे.

मराठी भाषेच्या विकासासाठी हे विद्यापीठ महत्त्वपूर्ण ठरू शकते. मात्र, निधी, मनुष्यबळ, संरचना आणि धोरणात्मक पाठबळांशिवाय हे स्वप्न पूर्ण होणं अशक्य आहे. आता तरी लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ आणि नागरिकांनी या मुद्द्यावर एकत्र येऊन शासनावर दबाव टाकणं आवश्यक आहे.




### .... राज्य सरकारच्या घोषणांचा फोलपणा?

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा, तिचा जागतिक प्रचार-प्रसार व्हावा, तिला उच्च शिक्षणात मानाचं स्थान मिळावं, असे नारे दरवर्षी मराठी भाषा दिन, शिवजयंती, संस्कृती दिन यावेळी दिले जातात. पण वास्तवात, मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर ज्याच्या स्थापनेचा उद्देशच मराठीच्या संशोधन, शिक्षण आणि जागतिक दर्जाच्या विकासासाठी होता त्या संस्थेला स्थापनतेपासून आजपर्यंत एकही रुपयाचं शासकीय अनुदान मिळालेलं नाही, ही बाब धक्कादायक आहे.

### शहरात संतापाची लाट

राजकमल चौकात लावलेल्या या बॅनरवर अनेक नागरिकांनी थांबून तीव्र प्रतिक्रिया नोंदवल्या. ''मराठी भाषा ही आमची अस्मिता आहे, आणि तिच्या नावावर फक्त घोषणा करून शासन जर प्रत्यक्ष कृतीत शून्य असेल, तर हे दुर्दैव आहे,'' अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. काही साहित्यिक, शिक्षक, आणि मराठी अभ्यासकांनी या प्रश्नी आता शहरभर आंदोलन छेडण्याची गरज व्यक्त केली आहे.

### लोकप्रतिनिधीचा मौन संतापजनक

या मुद्द्यावर विशेष म्हणजे अमरावती जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, आणि स्थानिक पत्रकारही मौन बाळगून आहेत. विद्यापीठाच्या भवितव्यासाठी कोणतीही ठोस पावलं उचललेली नाहीत. हे मौन म्हणजे अप्रत्यक्षपणे मातृभाषेच्या न्याय्य हक्कांवर पडणाऱ्या अन्यायाचं समर्थनच नव्हे काय?

# सिटी कोतवाली ठाण्याच्या कोठडीतून आरोपी पळाला

**अमरावती :** शहरातील सरोज टाकीज वसंत टॉकीज जवळ बॉम्ब ठेवला असल्याचा फोन करून अफवा पसविणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ११ जुलै रोजी अटक केली होती. तो आरोपी सिटीकोतवाली पोलिसांना चकमा देऊन भिंतीवरून उडी घेऊन पळून गेला. मात्र नंतर बडनेरा येथून त्याला पोलिसांनी पुन्हा अटक केली. गणेश तिवारी २८ राहणार प्रतापगड उत्तर प्रदेश असे आरोपीचे नाव आहे. तो शहरातील चिचफाईल परिसरात काका काकू सोबत राहत होता. दहा ते बारा दिवसांपूर्वी तो सरोज चौकातील कपिल नानवानी यांच्या केकच्या दुकानात कामाला लागला होता. कामावर असताना सात जुलै रोजी त्याने सरोज टॉकीज मध्ये तसेच वसंत टॉकीज जवळ बॉम्ब असल्याची खोटी माहिती पोलिसांना फोन करून दिली होती. त्या फोनमुळे पोलीस प्रशासनात चांगलीच धावपळ उडाली होती. परंतु दोन्ही ठिकाणी बॉम्ब मिळून आले नाही. यावरून त्याने दिलेली माहिती खोटी असल्याचे सिद्ध झाले. परंतु पोलिसांनी त्याने केलेल्या नंबर वरून सायबर पोलिसांनी त्याचा शोध घेतला तेव्हा गणेश तिवारी राहणार प्रतापगड उत्तर प्रदेश हा युवक असल्याचे आढळून आले. तेव्हा पोलिसांनी त्याला ११ जुलै रोजी अटक केली होती . त्यानंतर त्याला सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात ठेवण्यात आले होते १३ जुलै रोजी आरोपी गणेश तिवारी याने शौचालय जायचे आहे असे पोलिसांना सांगितले. त्यामुळे पोलिसांनी त्याला कोठडीतून बाहेर काढले परंतु तो पोलीस स्टेशनच्या आवारातील भिंतीवरून उडी घेऊन पळून गेला. या घटनेमुळे पोलिसांची चांगलीच भंबेरी उडाली होती. परंतु त्यानंतर त्याला बडनेरा परिसरातून पुन्हा अटक करण्यात आली या घटनेमुळे सिटीकोतवाली पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

# बोरनदी दरोड्याचा छडा; सहा आरोपी जेरबंद! नांदगावपेठ पोलिसांची मोठी कामगिरी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**नांदगावपेठ, दि. १४ :** बोरनदी धरणाजवळ एक महिन्यापूर्वी घडलेल्या धक्कादायक दरोड्याच्या प्रकरणातील सहा आरोपींना नांदगावपेठ पोलिसांनी अटक केली असून, चार आरोपी अद्याप फरार आहेत. या प्रकरणाच्या तपासात पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे मोठी कारवाई करत आरोपींपर्यंत पोहोचून कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

दि. ६ जून रोजी सिद्धांत राऊत (वय २८, रा. फ्रेजरपुरा, अमरावती) हे आपल्या मैत्रिणीसह बोरनदी धरण परिसरात गेले होते. सायंकाळी साडेसात वाजता परतीच्या वाटेवर असताना



दहा जणांच्या टोळीने त्यांच्यावर हल्ला करत सुमारे ४५ हजारांची सोनसाखळी व ४,५०० रुपयांची रोकड लुटली.

या घटनेची तक्रार दाखल होताच नांदगावपेठ पोलिसांनी कलम ३१०(१)(२) नुसार गुन्हा दाखल केला आणि विशेष तपास पथक तयार करण्यात आले. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहाय्यक आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात डीबी पथकाने तपास हाती घेतला. सखोल शोधानंतर अटक करण्यात आलेल्या आरोपीमध्ये शारीक खान आबीद खान (२२) शेख अयान शेख नसिर (२०) मोहम्मद शोएब उर्फ भल्ला मोहम्मद आरिफ (१९) अयान खान आसिफ खान (१९) शेख शरजील उर्फ राज शेख इरफान (१९) शेख अरबाज शेख मुजीब (२२) तडीपार गुन्हेगार यांचा समवेश असून या सहा आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून इतर चार आरोपींचा शोध सुरू आहे. या कारवाईत पो.उपनि. वाणी, वाकडे, पोहेकाँ राजा राऊत, पोशि राजीक खान, निलेश साविकार, वैभव तिखीले, राजा सय्यद, संजय नेहारे व चालक वैभव धुरंदर यांनी महत्वाची भूमिका बजावली. या यशस्वी कारवाईमुळे बोरनदी परिसरात नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून पोलिस दलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जिल्ह्यात ९४ टक्के पेरणी पूर्ण; भातकुली तालुक्यात मात्र मंद गती

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १४ :** जिल्ह्यात यंदा खरीप हंगामातील पेरणीला चांगली गती मिळाली असून ६ लाख ४४ हजार २९ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. हे प्रमाण ९४.३० टक्के असून उर्वरित सहा टक्के क्षेत्रात पेरणीला आता गती मिळत आहे. मात्र, भातकुली तालुका यामध्ये सर्वाधिक मागे असून फक्त ८४ टक्के पेरणी झाल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

पेरणीत धारणी तालुका आघाडीवर आहे. जिल्ह्याच्या तुलनेत धारणी, नांदगाव खंडेश्वर आणि चांदूर रेल्वे तालुक्यांमध्ये १०० टक्के पेरणी झाल्याचे समोर आले आहे. यामध्ये सोयाबीन सर्वाधिक म्हणजे २.३८ लाख हेक्टरवर, त्यानंतर कापूस २.२८ लाख हेक्टर, आणि तूर १.११ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्यात आली आहे.पावसाचा खेळखंडोबा, नंतर गती घेतली.

यंदाच्या पावसाळ्यात सुरुवातीला जून महिन्याच्या मध्यात पावसाने दडी मारल्याने पेरणी रखडली होती. मात्र १५ जूननंतर आणि जुलैच्या पहिल्याच आठवड्यात जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना वेग दिला. मात्र, सलग चार दिवस सुरू असलेल्या पावसामुळे काही भागात शेतकरी पेरणी पूर्ण करू शकले नाहीत. गुरुवारपासून पावसाने उसंत दिल्याने उर्वरित क्षेत्रावर पेरणीसाठी संधी निर्माण झाली आहे.भातकुली तालुक्यात शेतकरी हवालदिल झाला आहे. भातकुली तालुक्यात केवळ ८४ टक्केच पेरणी झाली आहे, कारण अनेक ठिकाणी पाणीटंचाई आणि परतीच्या पावसाच्या आशेवर पेरणीचा निर्णय घेतला गेला. काही शेतकऱ्यांना दुबार पेरणीचा अनुभव येत असून त्यामुळे त्यांची आर्थिक आणि मानसिक स्थिती डगमगली आहे.

### धारणीत उसाची लागवड सुरूच

साखर कारखाने बंद पडल्याने अमरावती उसाच्या लागवडीतून मागे पडला आहे. मात्र, यंदा केवळ धारणी तालुक्यात २८० हेक्टरवर उसाची लागवड झाली आहे. मेळघाटातील दुर्गम भागांतील शेतकऱ्यांनी हा नवीन उपक्रम घेतला आहे. आता यशस्वी उत्पादन मिळेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# स्मार्ट मीटर लावण्यास विरोध; वीज ग्राहकांची नाराजी – महेश खारोडे

**अंजनगाव :** राज्यातील महावितरण कंपनीकडून स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम सध्या गतीने सुरू आहे. मात्र, ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता हे मीटर लावले जात असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर पंचायत समितीचे माजी उपसभापती महेश खारोडे यांनी शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत महावितरणच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

या पत्रकार परिषदेस अंजनगाव दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे हे प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना खारोडे यांनी सांगितले की, ''महावितरणकडून स्मार्ट मीटर सक्तीने बसवले जात आहेत. ग्राहकांची संमती घेतली जात नाही, उलट काही ठिकाणी धमकी दिली जात असल्याच्या तक्रारी आहेत.''

ग्रामीण व शहरी भागात अनेक ठिकाणी नागरिकांकडून या मीटरविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्मार्ट मीटरविषयी ग्राहकांमध्ये संभ्रम आहे. हे मीटर अंदाजे १२ हजार रुपये किमतीचे असून सामान्य ग्राहकांना त्याचा मोठा आर्थिक बोजा सहन करावा लागत आहे.

# मालमत्ता कर वसुलीत मनपाला २४ कोटींचा फटका

## तीन लाखांवर मालमत्ता असलेल्या शहरात वसुलीत गळतीचा मोठा मुद्दा

। सुनील तळोकार ।

**अमरावती, दि. १४ : अमरावती महानगरपालिकेने (मनपा) यावर्षी मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहिम राबवूनही २४ कोटी रुपयांचे उत्पन्न उद्दिष्टापेक्षा कमी राहिले आहे. मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असूनही अपेक्षित वसुली साधता न आल्याने मनपा प्रशासन अडचणीत सापडले आहे.**

**मालमत्ता वाढली, पण वसुली वाढली नाही :** मनपाच्या नव्या सर्वेक्षणानुसार शहरात ३,०१,०६ मालमत्ता असून यामध्ये मागील तुलनेत १.३० लाख मालमत्तांची वाढ झाली आहे. त्यापैकी ५५ हजार मालमत्तांवर प्रथमच कर आकारण्यात आला, तर ८० हजार मालमत्तांमध्ये




सुधारणा करण्यात आली. काहींनी मजले वाढवून वापरक्षमता वाढवली आहे. त्यामुळे कररकमेचे प्रमाणही वाढले असते, परंतु शासनाकडून नव्या कर दरांना स्थगिती मिळाल्यामुळे २००५ पूर्वीच्या जुन्या दरानेच कर वसुली झाली.

**मोठे थकबाकीदार अद्याप बेफिकीर :** सामान्य नागरिकांनी वेळेत कर भरून जबाबदारी पार पाडली असली, तरी मोठ्या थकबाकीदारांचा टाळाटाळीचा पवित्रा कायम आहे. काही सरकारी कार्यालये, मॉल, मंगल कार्यालये, हॉटेल्स आणि हॉस्पिटल्स यांच्याकडून प्रचंड थकबाकी असूनही त्यांच्यावर निर्णायक कारवाई झालेली नाही.

**वसुलीसाठी विविध सवलती, शिबिरे, ऑनलाइन सुविधा :** करदात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मनपाने विविध सवलती जाहीर केल्या. दंडामध्ये २५ ते १०० टक्के सूट, वॉर्डस्तरीय शिबिरे, ऑनलाइन भरणा सुविधा आदी उपक्रम राबवले. काही दिवस सुट्टी असूनही वसुली सुरू ठेवण्यात आली. मात्र तरीही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

**विकास रोखणाऱ्या भूखंडांकडून उत्पन्न नाही :** महानगरपालिका क्षेत्रात ७७ हजारांवर खुले भूखंड असून त्यांच्याकडून कोणताही मालमत्ता कर मिळत नाही. त्यामुळे एकूण २.२३ लाख मालमत्तांवर कर वसुली अपेक्षित होती. पण केवळ ५०% मालमत्ताधारकांनी कर भरला आहे.

**थकबाकीदारांची ''सवय'' मोठी समस्या :** अनेक मालमत्ताधारक मालमत्ता कर थकीत ठेवण्याचेच धोरण राबवतात. लाखो रुपयांची थकबाकी असतानाही ते वेळ मागतात किंवा सवलतीची मागणी करतात. त्यामुळे कठोर कारवाईशिवाय वसुली अशक्य आहे.

**सामान्य करदात्यांवर भर :** महानगरपालिका कडून कर वसुलीसाठी सामान्य करदात्यांवर भर, दिल्या जातो पण सर्वसामान्य करदात्याकडे १ ते १५ हजारांपर्यंतच थकीत रक्कम असते, जी ते नियमित भरतात. मात्र, मोठे व्यावसायिक मालमत्ता धारक दुर्लक्ष करतात.

### वसुलीचे नवीन उपाय राबविणे आवश्यक

अमरावती मनपाला आगामी काळात उत्पन्नाचा शाश्वत स्रोत म्हणून मालमत्ता कर वसुलीला अधिक काटेकोर धोरणाने हाताळावे लागणार आहे. विशेषतः मोठ्या थकबाकीदारांवर कठोर कारवाई आणि भूखंडधारकांकडून कर वसुलीचे नवीन उपाय राबवणे ही काळाची गरज बनली आहे.

अजिंक्य भारत

# अमरावती जिल्हा

मंगळवार, दि. १५ जुलै २०२५




## थोडक्यात

### मनपाच्या कर्मचाऱ्याने घेतला गळफास

**अमरावती:** बडनेरा शहरातील जुन्या वस्तीच्या माळीपुरा परिसरात राहणारा आणि महापालिकेत कर्मचारी म्हणून कार्यरत नवल सुरेश बोबडे ३८ या युवकाने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली.ही घटना शनिवारी घडली. सुट्टीचा दिवस असल्याने तो घरीच होता दुपारी एक वाजता जेवणानंतर तो पहिल्या माळ्यावरील खोलीमध्ये झोपायला गेला. सायंकाळपर्यंत खाली न आल्याने त्याचे वडील रूम मध्ये पाहण्यास गेले असता रूमचा दरवाजा आतून बंद होता. आवाज देऊनही दरवाजा उघडत नसल्याने तो त्यांनी तोडला तेव्हा नवल हा लोखंडी अँगलला गळफास लावलेल्या अवस्थेत आढळून आला. नवल ने आत्महत्या का केली याचे कारण अद्याप पर्यंत कळू शकले नाही. सदर घटनेची माहिती बडनेरा पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी मृत देहाचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठविला आहे.

### हातरू येथे तरुणास मारहाण

**अमरावती:**चिखलदरा पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या हातरू येथील चाळीस वर्षे इसमाला कुऱ्हाडीच्या दांड्याने मारून गंभीर जखमी केले.सखाराम नंदा बेटेकर चाळीस असे जखमी झालेल्या इसमाचे नाव आहे. तुमची गुरे माझ्या शेतात का आली? या कारणावरून वाद झाला. तुझी ढोरे शेतात येऊ देऊ नको असे सखाराम ने झापू बेठेकर ला म्हटले. त्यावर झापून आणि रितेश बेटेकर यांनी सखाराम यांना शिवीगाळ करून वाद घातला. त्यानंतर रितेशने कुराडीच्या दांड्याने सखाराम बैठेकर यांना मारहाण करून गंभीर जखमी केले. सदर घटनेची तक्रार चिखलदरा पोलिसात देण्यात आली असून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### अल्पवयीन मुलीस पळविले

**अमरावती:**वरुड तालुक्यातील बेनोळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातून अल्पवयीन मुलीला फूस लावून पळून नेल्याची घटना १२ जुलैला रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी पोलीस स्टेशन गाठून अज्ञात व्यक्ती विरुद्ध तक्रार नोंदविली. पोलिसांनी अमन नामक तरुणाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. बेनोडा पोलीस त्या इसमाचा व मुलीचा शोध घेत आहे.

### अट्टल दुचाकी चोरट्यास अटक

**अमरावती:**तिवसा तालुक्यातील सातरगाव शेतशिवारातून दुचाकी लांबविणाऱ्या चोराला स्थानिक गुन्हे शाखेने अमरावती येथील इतवारा बाजारातून अटक केली. ती चोरीची दुचाकी विकण्यासाठी तो स्थानिक इतवारा बाजारात फिरत होता.अजय शालिकराम अडगे ३५ राहणार तेल्हारा जिल्हा अकोला असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून सातरगाव येथून चोरलेली दुधाची जप्त करण्यात आली आहे १३ जुलै रोजी ही कारवाई करण्यात आली. सातारगाव येथील गजानन देशकर यांची दुचाकी ११ जुलै रोजी दुपारी चोरीला गेली होती. शेताच्या कडेला उभी करून ते शेताच्या दुसऱ्या धुऱ्यावर गेले होते. परत आले असता त्यांना दुचाकी आढळून आली नाही या प्रकरणी तिवसा पोलिसांनी अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. दरम्यान ती दुचाकी अजय अडगे याने चोरली असून तो अमरावती येथील इतवारा परिसरात फिरत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्या आधारे त्याला ताब्यात घेण्यात आले त्याने चोरीची कबुली दिली असून त्याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पैशाच्या कारणावरून मारहाण

**अमरावती:**वरुड पोलीस स्टेशन हद्दीतील सावंगी येथील गोपाळ नारायण शेळके ४९ यांना मारहाण करण्यात आली ही घटना १२ जुलै रोजी दुपारी सावंगे येथे घडली आहे. शेळके यांनी गावातील अशोक दुतोंडे ५५ याला सायकल दुरुस्तीचे पैसे मागितले. त्यावेळी दूतोंडे याने शेळके सोबत वाद घातला त्याच वेळी टोकदार दगड गोपाळ शेळके यांना फेकून मारला हा दगड शेळके यांच्या डोक्याला लागल्यामुळे रक्त निघाले याप्रकरणी गोपाळ शेळके यांच्या तक्रारीवरून वरून पोलिसांनी अशोक दुतोंडे त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे

### अप्पर वर्धा वसाहतीत चोरी

**मोर्शी:**पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अप्पर वर्धा वसाहतीत अज्ञात चोरट्याने अंदाजे ८ रुपयाचा मुद्देमाल लंपास केला पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. मनाली गुरु चरण नंदा गवळी राहणार मालवीय गार्डन असे फिर्यादी महिलेचे नाव आहे. त्या जलसंपदा विभागात सहाय्यक अभियंता पदावर कार्यरत आहे. अप्पर वर्धा वसाहतीत लोकांचे अतिक्रमण तोडले असता कोणीतरी १० जुलै रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास वसाहतितून आठ हजार रुपयांचे साहित्य चोरून नेले. ही माहिती तेथील कर्मचाऱ्यांना मिळतात त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### असीर कॉलनीत घरफोडी

**अमरावती:**गाडगे नगर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या असीर कॉलनी येथे भर दिवसा अज्ञात चोरट्याने घर फोडून घरातील नगदी पैसे चोरून नेले. ही घटना रविवारी उघडकीस आली. फिर्यादी सय्यद बशीर नूर ६०राहणार असीर कॉलनी व त्यांचा मुलगा शुक्रवारी नमाज पठण करून घरी आले तेव्हा त्यांना दुकानाचे कामाकरिता पैशाची गरज असल्याने कपाटात ठेवलेले पैसे घेण्यासाठी गेले असता त्यांना कपाटा मधील ७० हजार रुपये दिसून आले नाही. एक दिवसापूर्वी त्यांनी ७० हजार रुपये लिफाफ्यात ठेवले होते.हा लिफाफा त्यांनी कपाटाच्या ड्रावर मध्ये ठेवला होता. तो शोधला असता तो त्यांना सापडला नाही त्यांनी पत्नीला विचारले असता तिने सुद्धा माहीत नसल्याचे सांगितले. लिफाफा कोणीतरी कपाटातून चोरून नेला असे खात्री पटल्यावर त्यांनी गाडगे नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्हा परिषदेमध्ये विभाग व टेबल बदलीचा मोठा फेरफार!

## ४० कर्मचाऱ्यांचा विभाग बदल प्रस्ताव सीईओंच्या दालनात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अमरावती दि. १४ :**जिल्हा परिषद अमरावतीमध्ये सध्या विभाग बदल व टेबल बदलीचा महत्त्वाचा टप्पा सुरू असून सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष आता सीईओच्या निर्णयाकडे लागले आहे. विविध विभागांमध्ये पाच वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे विभाग बदलीचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून, सुमारे ४० कर्मचाऱ्यांच्या फाईल्स सीईओंच्या दालनात पोहोचल्या आहेत. या प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेतल्यानंतर विभाग बदलीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यामुळे, ''कोणाला कोणता विभाग मिळतो?'' याची उत्सुकता कर्मचाऱ्यांमध्ये स्पष्ट दिसून येत आहे. या आठवड्यात आदेश जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.ही टेबल बदली प्रक्रिया ३० जुलैपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. यानंतर संपूर्ण अहवाल सीईओंकडे सादर केला जाईल. बदल्यांमुळे अनेक कर्मचाऱ्यांचे कार्यक्षेत्र व जबाबदाऱ्या बदलणार असल्याने जिल्हा परिषदेत हालचालींना वेग आला आहे.

### मलाईदार टेबलसाठी फिल्डिंग सुरू

विभाग बदलाबरोबरच, तीन वर्षांपासून एकाच टेबलवर कार्यरत कर्मचाऱ्यांची टेबल बदली देखील होणार आहे. जिल्हा परिषद मुख्यालयासह पंचायत समित्यांमध्येही ही प्रक्रिया एकत्रितपणे पार पडणार आहे.यामुळे महत्त्वाच्या, फायदेशीर किंवा प्रतिष्ठेच्या टेबलसाठी काही कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे 'फिल्डिंग' सुरू केली असल्याचे वृत्त आहे.

## तरुणावर चाकूहल्ला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती दि. १४ :**किती कोतवाली पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या केडिया दुकान डफलीन दवाखान्याकडे जाणाऱ्या मार्गावर एका युवकावर चाकू हल्ला करण्यात आला. फिर्यादी पवन महादेव सोळंके किस राहणार कमालपुर तालुका अंजनगाव सुर्जी यांचे नातेवाईक शकुला रामजी पवार ६५ राहणार चांदूरबाजार यांना आधार असल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती केले होते. फिर्यादी पवन सोळंके त्यांच्यासोबत होता सकाळी चहा घेण्याकरिता पवन सोळंके गेले असता एका अनोळखी इसमाने पवन सोळंके यांच्या गळ्यावर चाकू मारून वार केले. सदर घटनेची तक्रार पवन सोळंके याने सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात दिली पोलिसांनी तक्रारीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सिटी कोतवाली पोलीस त्या अज्ञात इसमाचा शोध घेत आहे.



## बालगृहातून विधी संघर्षित बालक पळाला

**अमरावती:**रुक्मिणी नगर परिसरात असलेल्या शासकीय मुलांचे निरीक्षक गृह व बालगृहातून सोळा वर्षीय विधी संघर्ष मुलाने पळ काढला. फ्रेजरपुरा पोलिसांनी एका दरोड्याच्या गुन्ह्यात त्याला ताब्यात घेतले होते. १०जुलै रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास ही घटना उघड झाली फ्रेजरपुरा पोलिसांनी ११ जुलै रोजी गुन्हा दाखल केला. सुरक्षारक्षक रावसाहेब चोरपगार २७ राहणार चंडिकापूर यांना धक्का देऊन तो पळून गेला. यावेळी काळजीवाहक रजेवर होते तर कर्तव्यावर केवळ दोन सुरक्षा रक्षक होते विशेष म्हणजे तो मुलगा वारंवार गुन्हे करीत असल्याने येथे पाठवण्यात आला होता असे फिर्यादीने म्हटले.

## ग्राम विकास निधीतील अपप्रवृत्तींची चौकशी करा

### जिल्हा परिषद सदस्यांचा जिल्हा कचेरीत ठिय्या

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**धारणी दि. १४ :** चांदुरबाजार तालुक्यातील निंबवाडी बु. ग्रामपंचायतीतील माझा गाव सुंदर गाव या योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या कामांमध्ये आर्थिक अपहार, गुणवत्तेअभावी कामे अपूर्ण ठेवणे, यामध्ये कंत्राटदार व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची संगनमताने झालेला गैरव्यवहार उजेडात आणण्यासाठी जिल्हा परिषदेचे सदस्य श्री. संदीप मारोते यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे चौकशीची मागणी केली आहे.या संदर्भात त्यांनी ग्रामस्थांची तक्रार, तसेच प्रत्यक्ष पाहणी यामधून स्पष्ट झालेल्या गंभीर त्रुटींचा उल्लेख करत शासनाच्या निधीचा अपव्यय आणि गुणवत्तेच्या बाबतीत गंभीर उदासीनता दाखवली गेल्याचे नमूद केले. सुमारे ८.२९ लाख रुपये खर्चाच्या कामांची सत्यता शंका घेण्याजोगी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.तहसीलदार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व संबंधित अभियंत्यांची जबाबदारी निश्चित करून कारवाई व्हावी, अशी ठाम मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. ''सदर कामे केवळ कागदोपत्री पूर्ण झाली असून प्रत्यक्षात काही कामे झालेलीच नाहीत,'' असा दावा यामध्ये करण्यात आला आहे.

प्रमुख मागण्यामध्ये निंबवाडी बु. ग्रामपंचायतीतील सर्व कामांची चौकशी तांत्रिक पथकामार्फत करावी.कामांमध्ये दोषी ठरलेल्या पदाधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करावेत. भविष्यातील ग्रामविकास निधींच्या वापरासाठी पारदर्शी कार्यप्रणाली राबवावी.

## गजराज नगरमध्ये पर्यावरणदूतांचा प्रेरणादायी उपक्रम

### झाडांचा वाढदिवस आणि नव्या ३० वृक्षांची लागवड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती दि. १४ :** गजराज नगर, एमआयडीसी रोड, श्रीकृष्ण मंदिराजवळ दि. १३ जुलै रोजी 'पर्यावरण संवर्धन अभियाना' अंतर्गत एक आगळा-वेगळा उपक्रम राबवण्यात आला. मागील वर्षी लावलेल्या झाडांचा वाढदिवस साजरा करत नव्याने ३० वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी कडूनिंब, अमलतास, जांभूळ, आंबा अशा पर्यावरणपूरक वृक्षप्रजातींची निवड करण्यात आली.

या अभियानाचे संयोजक डॉ. प्रा. शांताराम चव्हाण यांनी उपस्थित नागरिकांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. ''वृक्ष ही निसर्गाची जीवंत देणगी आहे. वृक्षारोपण एवढेच नव्हे, तर वृक्षांचे संवर्धन हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे,'' असे ते म्हणाले.

डॉ. प्रकाश मानेकर यांनी वाढत्या हवामान बदल व तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणीय समस्यांवर सखोल मार्गदर्शन केले. गजराज नगरवासीयांच्या सातत्यपूर्ण सहभागाबद्दल त्यांनी विशेष आभार मानले.

सुयोग माथुरकर यांनी बाहेरून आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले व संपूर्ण मोहिमेत योगदान दिलेल्या नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले.

परिसरातील नागरिकांनी उल्लेखनीय उपस्थिती व संघटनात्मक योगदान दिले.

कार्यक्रमाच्या आयोजनात सुरेशदादा चोपकर, शाम भाऊ, ॲड. सुयोग माथुरकर यांच्यासह अनेक स्वयंसेवकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

या कार्यक्रमाला डॉ. भारत कल्याणकर, धर्मेंद्र भांडारकर, प्रभाकरराव आकोटकर, प्रा. संतोष शुक्ला, प्रा. कृष्णा शुक्ला, नगरसेवक प्रदीप हिवसे, सौ. जया चोपकर, सौ. रेश्मा ढोके, पंडित पांडे, स्नेहल पांडे, तुषार दुधे, पंकज वैद्य, राजाभाऊ ईसाने, प्रा. कुमुदिनी वाडेकर यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पर्यावरण रक्षणाचा नवा संकल्प

कार्यक्रमाच्या सांगतेला, उपस्थितांनी ''पुढील वर्षी पुन्हा भेटूया नव्या वृक्षसंवर्धन संकल्पासह'' असा निर्धार करत कार्यक्रमाचे रूपांतर एका प्रेरणादायी चळवळीत केले. ''झाडं लावा, पर्यावरण वाचवा'' हे फक्त वाक्य नाही, ती जबाबदारी आहे!

## लायन्स क्लबच्यावतीने वैद्यकीय अधिकाऱ्यांचा गौरव




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे दि. १४ :** सर्वसामान्य रुग्णांना अहोरात्र आरोग्य सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा लॉयन्स क्लब (एलिट)च्या वतीने गौरव करण्यात आला दरम्यान ग्रामीण रुग्णालय येथे स्व. सुभाषराव बुटले यांच्या प्रीत्यर्थ औषधीचे वितरण केले.धामणगाव शहरातील डॉक्टरांचा दरवर्षी लोंयन्स क्लबच्या वतीने गौरव करण्यात येते यावेळी हृदय रोग तज्ञ डॉ. आकाश येंडे, बालरोग तज्ञ डॉ.अमित गुल्हाने, दंत रोग तज्ञ प्रिया कुचेरीया, ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ कांचन राहलगाडगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर, डॉ.महेश साबळे यांचा शाल श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला यावेळी ग्रामीण रुग्णालयात स्व. सुभाषराव बुटले यांच्या स्मृती प्रित्यर्थ सर्वसामान्य रुग्णांना लागणाऱ्या औषधीचे वितरण केले लॉयन्स क्लबचे अध्यक्ष लॉ.जितेंद्र चौधरी सचिव लॉ.मोहन राऊत खजिनदार लॉ विशाल खडसे सेवा सप्ताह चे प्रमुख लॉ विलास बुटले, लॉ नरेंद्र गुल्हाने, लॉ विनय शिरभाते, लॉ चेतन कोठारी, लॉ अंकित पोळ लॉ मंगेश सव्वालाखे लॉ योगेंद्र कोपुलवार, लॉ प्रमोद कुचेरिया, लॉ विशाल जयस्वाल, लॉ प्रशांत बन्नोरे, लॉ विक्रम बुधलानी लॉ अजय हरवानी लॉ सागर ठाकूर लॉ संजय सायरे यांची उपस्थिती होती नेहमी सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या लॉयन्स क्लबने केलेल्या गौरवाबद्दल ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ कांचन रहागाडगे यांनी आभार व्यक्त केले.

# तथागत बुद्धांचा विशुद्धी मार्ग म्हणजेच पंचशील होय-नयन मोंढे

## मोरगाव येथे भारतीय बौद्ध महासभेची ३४४ वी बुद्ध वंदना उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अमरावती दि. १४ :** माणसाने माणसाशी माणसासारखे वागाव हाच धम्माचा केंद्रबिंदू आहे. जगामध्ये दुःख असून दुःखमुक्ती करणे धम्माचा उद्देश आहे. बुद्धांनी आपल्या पहिल्याच प्रवचनात दुःखमुक्ती करिता विशुद्धी मार्ग सांगितला आहे. तथागत बुद्धांनी सांगितलेला विशुद्धी मार्ग म्हणजेच पंचशील होय,ते बौद्ध उपासक उपासीकांनी आचरणात आणावे असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे पर्यटन सचिव नयन मोंढे यांनी भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन विशुद्धी मार्ग या विषयावर प्रवचन देताना सांगितले.वर्षावास प्रवचन मालिका चे दुसरे पुष्प नयन मोंढे यांनी गुंफले. भारतीय बौद्ध महासभा बडनेरा अमरावती व नांदगाव खंडेश्वर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मोरगाव करुणा बुद्ध विहार येथे रविवार(ता.१३) रोजी रविवारची ३४४ वी बुद्ध वंदना मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी मार्गदर्शक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पर्यटन सचिव नयन मोंढे, समता सैनिक दलाचे प्रमुख सुरेश दहाटे, नांदगाव खंडेश्वर तालुकाध्यक्ष मदन खंडारे, बडनेरा शहराध्यक्ष शांताराम गेडाम, संघटक आर के भटकर, कार्यालयीन सचिव राहुल शेंडे, महिला आघाडी कोषाध्यक्ष मालती मेश्राम, विलास नागदिवे उपस्थित होते. नयन मोंढे आपल्या धम्म प्रवचन पुढे म्हणाले की,तथागत बुद्ध विशुद्धी मार्ग समजावून सांगतात की ज्याला चांगला मनुष्य होण्याची इच्छा आहे त्याने जीवनाची तत्वे म्हणून काही तत्वे पाळली पाहिजेत.

विशुद्धीच्या मार्गानुसार चांगल्या जीवनाची पाच तत्वे आहेत त्यामध्ये कोणत्याही प्राण्याची हिंसा न करणे व त्याला इजा न करणे, चोरी न करणे अर्थात दुसऱ्यांच्या मालकीची वस्तू न बळकावणे, व्यभिचार न करणे, असत्य न बोलणे आणि मादक पेय ग्रहण न करणे. तथागतांच्या शिकवणुकीप्रमाणे या पाच शिलाचे पालन करावे असे आवाहन मोंढे यांनी केले. वर्षावास प्रवचन मालिकेच्या पार्श्वभूमीवर अरुण शेंडे यांनी वर्षावास हे गीत सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.संचालन मदन खंडारे तर आभार विलास नागदिवे यांनी मानले. यावेळी धर्मपाल डोंगरे, अरुण शेंडे, खुशाल सांबारे, सतीश गोपनारायण, अरुण मेश्राम, मुकुंद मेश्राम, प्रकाश भोवते, साहेबराव मोहोड, विजय बागडे, लक्ष्मण वरघट, अरुण लोणारे, किसन मोहोड, शामराव बंडकर, भीमराव सुपनेर,हरणदास शहारे, देवानंद बडगे, गोवर्धन रामटेके, अशोक बनसोड, रवींद्र मोहोड, कविता मोडघरे, माया बोरकर, संमेक बंडकार, अर्णव जवंजाळ, आर्यन राऊत यांच्यासह मोरगाव येथील बौद्ध उपासक उपासिका बहुसंख्येने उपस्थित होत्या.

### महापुरुषांनी सांगितलेल्या मार्गावर चालावे-सुरेश दहाटे

भारतीय बौद्ध महासभा प्रवचन मालिकेच्या माध्यमातून तथागत बुद्धाच्या धम्माचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अविरत कार्य करीत आहे. महापुरुषांचे जीवन चरित्र सांगुण त्यांनी सांगितलेल्या मार्गावर मानवाने चालावे असे प्रतिपादन समता सैनिक दलाचे प्रमुख सुरेश दहाटे यांनी आपल्या समारोपिय भाषणातून केले.





## अशी आहे स्थिती...
















# हृदयाची चाळणी

## विकास गटारात, नागरिक खड्ड्यात! | यवतमाळ शहराला खड्ड्यांची 'भेट' | गटार योजनेचा झाला 'खेळखंडोबा'

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

गणेश खडसे

**यवतमाळ, दि. १३ : चांगले रस्ते हे शहराच्या विकासाचे आणि सौंदर्याचे हृदय मानले जाते, पण यवतमाळात भूमिगत गटार योजनेने याच हृदयाची चाळण केली आहे. कोट्यवधी रुपयांची ही योजना शहरासाठी 'मृत्यूचा सापळा' ठरली असून, प्रत्येक रस्ता आज खड्ड्यांच्या स्वाधीन झाला आहे. प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे, यवतमाळकर सध्या धुळीच्या आणि चिखलाच्या साम्राज्यात जगत असून, हा केवळ रस्त्यांचा प्रश्न नसून, नागरिकांच्या जीवाशी चाललेला खेळ आहे.**




महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बेजबाबदारपणामुळे, शहराचे सौंदर्य आणि नागरिकांचे आरोग्य दोन्ही धोक्यात आले आहे. महाबलीनगर, अयोध्यानगर ते राजहंस सोसायटी, हनुमाननगर, दर्डा चौक ते बजरंग चौक, संदीप मंगलम रोड, चर्च समोरील रोड, दत्त चौक, रेल्वे पटरी असे अनेक रस्ते आज 'खड्डेस्थान' बनली आहेत. निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि अर्धवट कामांमुळे, पावसाळ्यात रस्ते चिखलाच्या नद्या बनतात, तर उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य पसरते. यामुळे अपघात, श्वसनाचे आजार आणि मणक्याचे आजार हे यवतमाळकरांच्या पाचवीलाच पुजले आहेत. कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही, जर शहराला नरकयातना भोगाव्या लागत असतील, तर हा निधी नेमका गेला कुठे, हा प्रश्न आता संतप्त नागरिक विचारत आहेत.

### गटार योजना की 'घोटाळा' योजना?

शहराला आधुनिक बनवण्यासाठी आणलेली भूमिगत गटार योजना, आज यवतमाळसाठी सर्वात मोठा शाप ठरली आहे. नियोजनशून्य खोदकाम आणि निकृष्ट कामांमुळे, ही योजना गटारात वाहून गेली असून, शहराला मात्र आयुष्यभरासाठी खड्ड्यांच्या वेदना देऊन गेली आहे. या योजनेच्या चौकशीची मागणी आता जोर धरू लागली आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, हीच अपेक्षा.

### प्रत्येक खड्डा, एक मृत्यूचा सापळा!

शहरातील रस्त्यांवर पडलेला प्रत्येक खड्डा हा एखाद्या मृत्यूच्या सापळ्यापेक्षा कमी नाही. रात्रीच्या अंधारात किंवा पावसामुळे खड्ड्यात पाणी साचलेले असताना, अनेकांना गंभीर अपघातांना सामोरे जावे लागले आहे. प्रशासन अपघातांची वाट पाहत आहे का? एखाद्याचा जीव गेल्यानंतरच यांना जाग येणार का, असा संतप्त सवाल यवतमाळकर विचारत आहेत.

### मणक्याचे आजार: खड्ड्यांची 'भेट'!

खड्ड्यांतून आदळ-आपट करत प्रवास केल्याने, यवतमाळमधील अनेक तरुण आणि वृद्धांना मणक्याचे आणि मानेचे गंभीर आजार जडले आहेत. डॉक्टरांच्या दवाखान्यातील गर्दी वाढत असून, याला सर्वस्वी प्रशासनाचा बेजबाबदारपणा कारणीभूत आहे. प्रशासनाने रस्त्यांची दुरुस्ती करावी, अन्यथा नागरिकांना शारीरिक आणि आर्थिक भुर्दंड सोसावा लागेल, यात शंका नाही.

### पावसाळा: शहरासाठी ठरतोय आपत्काळ!

पावसाळा यवतमाळकरांसाठी आता आनंदाचा नाही, तर भीतीचा ऋतू बनला आहे. थोडा पाऊस आला, की शहरातील रस्ते नदीत बदलतात. खड्ड्यांमध्ये पाणी साचून अंदाज येत नाही, ज्यामुळे अपघात नित्याचेच झाले आहेत. मॉन्सूनपूर्व तयारीच्या नावाखाली केवळ कागदी घोडे नाचविले जातात आणि जनता मात्र पाण्यात आणि चिखलात खितपत पडते.



'यवतमाळ शहरातील खड्डे आता केवळ वाहतुकीची समस्या नसून, ते सार्वजनिक आरोग्याचे मोठे संकट बनले आहेत. माझ्या दवाखान्यात मणक्याचे आजार, पाठदुखी आणि धुळीमुळे होणाऱ्या श्वसनाच्या ॲलर्जीच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. याला थेट कारण खड्ड्यांतील रोजचा प्रवास आहे. हे खड्डे म्हणजे आजारपणाचे 'वितरक' असून, प्रशासनाने रस्त्यांची दुरुस्ती करणे ही नागरिकांच्या निरोगी आयुष्याची तातडीची गरज आहे.'

**- डॉ. विरेंद्र लंगडे,**
होमिओपॅथी तज्ज्ञ, यवतमाळ.



'खड्ड्यांमधून प्रवास केल्यामुळे गर्भवती महिला आणि त्यांच्या होणाऱ्या बाळाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. सततच्या हादऱ्यांमुळे अकाली प्रसूती (प्री-टर्म डिलिव्हरी) किंवा गर्भपाताचा धोका वाढतो. याशिवाय, अनेक गर्भवती महिलांना कंबरदुखी, पोटात दुखणे आणि मानेचा त्रास यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन, किमान गर्भवती महिला आणि रुग्णांसाठी तरी रस्ते सुस्थितीत आणावेत.'

**- डॉ. अमृता पुनसे,**
स्त्रीरोग तज्ज्ञ, यवतमाळ.



'शहरातील हे खड्डे म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या नाकर्तेपणाचे आणि भ्रष्टाचाराचे प्रतीक आहेत. विकासाच्या नावाखाली, सामान्य आणि बहुजन वस्त्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. आलिशान गाड्यांमधून फिरणाऱ्या नेत्यांना आणि अधिकाऱ्यांना सर्वसामान्यांच्या वेदना कशा कळणार? हे रस्ते नाहीत, तर प्रशासनाने नागरिकांसाठी तयार केलेले सापळे आहेत. या अन्यायाविरोधात यवतमाळकर रस्त्यावर उतरून संघर्ष करेल.'

**- भाई अमन,**
सामाजिक कार्यकर्ता, यवतमाळ.



'शहरातील भूमिगत गटार योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरू आहे. मात्र, त्यांनी रस्ते खोदण्यापूर्वी किंवा दुरुस्तीसंदर्भात नगरपरिषदेशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. तरीही, नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन, आम्ही तातडीने मुरुम टाकून खड्डे बुजवित आहोत. अनेक ठिकाणी तात्पुरती दुरुस्ती (पॅचिंग) केली आहे. पावसाळ्यानंतर या रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती केली जाईल. मोठ्या खड्ड्यांमध्ये मुरुम टाकण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.'

**- अमोल गवळी,**
नगर अभियंता, बांधकाम विभाग.



'रस्त्यांवरील खड्ड्यांसंदर्भात प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही दखल घेतली जात नाही. या खड्ड्यांमुळे रस्त्यावर चालताना किंवा वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागते आणि जीव अक्षरशः मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. विशेषतः, पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नाही, ज्यामुळे अपघात होण्याची शक्यता खूप वाढली आहे. नगरपरिषद प्रशासनाने आतातरी या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन, तातडीने उपाययोजना करावी.'

**- अल्का शेळके,** सामाजिक कार्यकर्त्या, यवतमाळ.



"यवतमाळ शहरातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, रस्त्यावरून चालताना अनेकजण तोल जाऊन पडत आहेत. ही भीषण परिस्थिती असताना, शहरात काँग्रेसचे आमदार, शिवसेनेचे पालकमंत्री आणि खासदार असूनही त्यांना हे दिसत नाही का? ही अत्यंत गंभीर बाब आहे. लोकप्रतिनिधींनी आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधली असून, आता नागरिकांनीच जागरुक होऊन याविरोधात बोलते होण्याची गरज आहे."

**- डॉ. नीरज वाघमारे,** जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, यवतमाळ.

### हा जाणीवपूर्वक केलेला छळ?



'ज्यावेळी रस्त्यांची कामे करायला हवी होती, तेव्हा प्रशासनाने ती केली नाहीत आणि आता ऐन पावसाळ्यात भूमिगत गटारे बनविण्यासाठी संपूर्ण शहरातील रस्ते खोदून ठेवले, हा निव्वळ वेडेपणा आहे. रस्ते चिखलमय होणार आणि नागरिकांना त्रास होईल, याची कल्पना असतानाही हा निर्णय घेणे म्हणजे, नागरिकांना जाणीवपूर्वक वेठीस धरण्याचा प्रकार आहे. ज्या अधिकाऱ्यांनी आणि कंत्राटदारांनी हे केले, ते शुद्धीवर होते का, हेच तपासण्याची गरज आहे.'

**- देवानंद पवार,**
महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस.

### प्रशासनात समन्वयच नाही!



'जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्याने शहरात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. मी नगरसेवक असताना यावर अनेकदा चर्चा झाली. आधी इलेक्ट्रिक, टेलिफोन, जिओ कंपन्या रस्ते खोदतात, त्यात आता ड्रेनेजने भर टाकली आहे. विविध यंत्रणांमध्ये अजिबात समन्वय नाही. आता खासदार संजय देशमुख आणि आमदार बाळासाहेब मांगुळकर यांना सोबत घेऊन यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.'

**- राजेंद्र गायकवाड,**
जिल्हाप्रमुख, शिवसेना (उबाठा).

### विकासाच्या नावाखाली दुर्दशा!



'यवतमाळात विकासाच्या नावाखाली नागरिकांना वेठीस धरून शहराची दुर्दशा करण्याचे काम सुरू आहे. 'करोडोंचा निधी आणला' अशा बाता केल्या जातात, पण तो निधी फक्त लाडक्या ठेकेदारांना पोसण्यासाठीच वापरला जातोय का? यवतमाळातील नागरिक यावर बोलत नाहीत, म्हणूनच विकासाच्या नावाखाली शहराचा 'भकास' होत आहे. हा विकासाचा खेळखंडोबा आहे.'

**- ॲड. जयसिंग चव्हाण,**
सामाजिक कार्यकर्ते.

### एका झोनला ५ वर्षे, शहराला किती?



'शहरात १२ कोटींचे काम सुरू आहे, पण त्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. चेंबरसाठी वापरलेल्या सिमेंटच्या विटा किती दिवस टिकणार? लोहारा, वडगाव, उमरसरा परिसरात रस्ते खोदल्याने नागरिकांना चालणेही कठीण झाले आहे. पहिल्या झोनला जर पाच वर्षे लागली, तर संपूर्ण शहरासाठी २० वर्षे लागणार का? हा कामाच्या नावाखाली सुरू असलेला निव्वळ लुटमारीचा प्रकार आहे.'

**- अनिल देशमुख (बबलू),**
शहराध्यक्ष, काँग्रेस कमिटी.

### पावसाळ्यातच खोदकाम का?



'शहरात ड्रेनेज सिस्टीम गरजेची आहे, हे मान्य. पण अधिकाऱ्यांनी आपला मनमानी कारभार चालवत, नेमके पावसाळ्यातच रस्ते खोदले, हे चुकीचे आहे. नागरिकांचे हाल होऊ नयेत, यासाठी मी स्वतः माजी आमदार मदन येरावार यांना भेटून, खोदलेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तात्काळ निविदा काढण्याची मागणी केली होती. प्रशासनाने वेळेचे गांभीर्य ओळखायला हवे.'

**- अमोल देशमुख,**
माजी सभापती, नगर परिषद.

### प्रशासन दुर्लक्ष करतंय!



"संपूर्ण वॉर्ड रस्ते आणि चेंबरच्या नावाखाली उखडून ठेवला आहे. या भागाचा विकास व्हावा, यासाठी आम्ही आमदार, खासदारांपर्यंत तक्रारी केल्या, सतत पाठपुरावा केला, पण नगरपालिकेच्या दुर्लक्षित धोरणांमुळे नागरिकांना फक्त मनस्तापच मिळत आहे. प्रशासकीय यंत्रणा आमच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत असून, नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहत आहे."

**- सपना लंगोटे,** माजी नगरसेवक.

### कंत्राटदारांचे लाड थांबवा!



'प्रशासनाने लोकांची परिस्थिती पाहून कामे करायला हवीत. ज्या ठिकाणी खोदकाम झाले आहे, तिथे किमान मुरुम टाकून रस्ता दाबला, तरी चिखलाचा त्रास कमी होईल. पण सध्या यवतमाळात विकासाच्या नावाखाली केवळ खोदाई सुरू आहे आणि नगरपरिषद प्रशासन कंत्राटदारांचे लाड पुरवत आहे. हे थांबले पाहिजे.'

**- दत्ता कुळकर्णी**
सामाजिक कार्यकर्ता, यवतमाळ.

### हद्दवाढ झाली, विकासाचे काय?



'शहरालगतच्या ग्रामपंचायतींची हद्दवाढ झाली, पण त्या भागांचा विकास मात्र झाला नाही. हद्दवाढ झालेल्या ठिकाणी गटार योजनेचे काम अर्धवट असल्याने, रस्त्यांवर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. बांधकाम विभाग आणि जीवन प्राधिकरणाने खोदलेले रस्ते दुरुस्त करून, नागरिकांना किमान चालण्यायोग्य रस्ते तरी द्यावेत.'

**- विक्की राऊत,**
सामाजिक कार्यकर्ते.

### अधिकारी म्हणतात, 'आम्ही पाहणी करतो!'

नागरिकांनी तक्रार केली, की अधिकारी 'पाहणी करतो' असे उत्तर देतात. पण ही पाहणी कधी पूर्ण होणार आणि काम कधी सुरू होणार, हे मात्र कोणी सांगत नाही. अधिकाऱ्यांच्या या 'पाहणीच्या नाटका'ला नागरिक आता पूर्णपणे विटले आहेत. आता आम्हाला पाहणी नको, थेट काम हवे आहे, अशी स्पष्ट भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

### हरवले, हरवले... यवतमाळचे रस्ते हरवले!

एकेकाळी चांगले असलेले यवतमाळचे रस्ते, आज गटार योजनेच्या नावाखाली पूर्णपणे हरवले आहेत. डांबराचा एक थरही शिल्लक नाही. 'आमचे जुने रस्ते परत द्या,' अशी मागणी करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. शहराच्या या विद्रूप चेहऱ्याला जबाबदार कोण? या प्रश्नाचे उत्तर जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही.

### जीवन प्राधिकरण: नावात 'जीवन', कामात 'मरण'!

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शहराच्या रस्त्यांची अक्षरशः 'वाट' लावली आहे. त्यांच्या कामात ना नियोजन, ना गुणवत्ता. केवळ खोदकाम करून ठेवले आहे, पण दुरुस्तीची जबाबदारी कोणी घ्यायला तयार नाही. त्यांच्या नावात 'जीवन' असले, तरी त्यांच्या कामामुळे नागरिकांना 'मरणयातना' भोगाव्या लागत आहेत, ही एक मोठी शोकांतिका आहे.

### नेते निवडणुकीत येतात, नंतर गायब होतात!

निवडणुकीच्या वेळी मतांसाठी दारात येणारे नेते, निवडून आल्यानंतर मात्र शहराच्या समस्यांकडे ढुंकूनही पाहत नाहीत. खड्ड्यांनी भरलेले रस्ते त्यांना दिसत नाहीत का? की, आलिशान गाड्यांमुळे त्यांना त्याची झळ बसत नाही? आता पुढच्या निवडणुकीत, या नेत्यांना अड्ड्यांवरूनच फिरवून जाब विचारला जाईल, हे निश्चित.

● सहाय्य : जयंत राठोड ● संपादन/पेज डिझाईन : सागर भगत

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ
मंगळवार दि. १५ जुलै २०२५


# ही लढाई केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नाही

## बच्चू कडूंच्या घोषणेने आंबोड्यात उसळला जनसागर, पुढील लढाई हमीभावाची, सरकारला इशारा, महामार्ग ठप्प

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ उमेश इंगोले

**महागाव, दि. १४ :** 'सरकारच्या धोरणांमुळे ज्या शेतकरी बहिणीचे कुंकू पुसले गेले, तिचा लढा हा आता माझा वैयक्तिक लढा आहे,' अशी भावनिक साद घालत, 'प्रहार'चे संस्थापक बच्चू कडू यांनी सोमवारी (दि. १४) आंबोडा येथे '७/१२ कोरा करा' पदयात्रेचा समारोप केला. या सभेला अक्षरशः लाखोंचा जनसागर उसळला होता. उद्धव ठाकरे आणि रोहित पाटील यांच्या पाठिंब्यामुळे या आंदोलनाला आता राज्यव्यापी स्वरूप प्राप्त झाले असून, 'ही लढाई केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नाही, तर पुढची लढाई हमीभावाची आहे,' असा निर्वाणीचा इशाराही बच्चू कडू यांनी दिला.

सोमवारी सकाळी, पदयात्रेने चिलगव्हाण येथे राज्यातील पहिले शेतकरी-शहीद साहेबराव करपे यांच्या स्मृतीला अभिवादन केले आणि त्यानंतर आंबोडा येथील सभेसाठी कूच केले. सकाळपासूनच नांदेड-तुळजापूर महामार्गावर शेतकऱ्यांचे जत्थेच्या जत्थे दाखल होत होते, ज्यामुळे महामार्ग अनेक तास ठप्प झाला होता. यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले, 'ही प्रस्थापित व्यवस्था शेतकऱ्याला मारणारी आणि ठेकेदाराला तारणारी आहे. जोपर्यंत शेतकऱ्याचा सातबारा कोरा होत नाही, तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही.' यावेळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पाटील यांनीही सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, 'तुमचा हा उत्साह पाहून, सरकारला गुडघ्यावर आणल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. हा लढा एकट्या बच्चू भाऊंचा नाही, तर तुमचा लहान भाऊ म्हणून, या लढ्याचे ओझे मीही माझ्या खांद्यावर घ्यायला तयार आहे.' या सभेला प्रबोधनकार सत्यपाल महाराज, माजी आमदार खाजा बेग, 'प्रहार'चे प्रदेशाध्यक्ष बबलू जवंजाळ आणि जिल्हाध्यक्ष बिपीन चौधरी यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या ऐतिहासिक गर्दीने आणि विरोधी पक्षांच्या पाठिंब्याने, सरकारवरील दबाव प्रचंड वाढला आहे.

### विरोधी पक्षांचे मोठे बळ

**या आंदोलनाला आता सर्वच प्रमुख विरोधी पक्षांनी पाठिंबा दिल्याने, त्याचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. मनसेनंतर, उद्धव ठाकरे यांनीही पाठिंबा जाहीर केला. आजच्या सभेला आमदार रोहित पाटील स्वतः उपस्थित होते, तर शिवसेना (उबाठा) नेते भास्कर जाधव यांनीही आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. या एकजुटीमुळे, शेतकऱ्यांच्या मागण्या आता अधिक प्रकर्षाने सरकारच्या दरबारात पोहोचणार आहेत.**



### जाती-धर्मात अडकू नका!

**'तुम्हाला जाती-धर्माच्या नावाने खेळवून, शेतकरी म्हणून कधीच एक होऊ दिले नाही,' असे म्हणत बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांना भावनिक आवाहन केले. 'तुमच्या एकजुटीतच तुमची ताकद आहे. त्यामुळे, सर्व भेद विसरून केवळ 'शेतकरी' म्हणून एकत्र या आणि या व्यवस्थेविरोधात खांद्याला खांदा लावून लढा,' असे ते म्हणाले. त्यांच्या या आवाहनाला उपस्थित जनसमुदायाने जोरदार प्रतिसाद दिला.**



# आम्ही शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठी लढत राहू

## बच्चू कडू : आंबोडा येथील सभेतून एल्गार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ विनोद कोपरकर

**महागाव, दि. १४ :** 'आमची लढाई भावनिक नाही, तर ती शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला सुखी करण्यासाठी आहे,' असा निर्धार व्यक्त करत, 'प्रहार'चे संस्थापक बच्चू कडू यांनी '७/१२ कोरा करा' पदयात्रेचा सोमवारी (दि. १४) ऐतिहासिक समारोप केला. आंबोडा येथे नागपूर-तुळजापूर महामार्गावर उसळलेल्या हजारो शेतकऱ्यांच्या जनसागराच्या साक्षीने, त्यांनी 'ही लढाई कर्जमाफीपुरती मर्यादित नाही, तर पुढची लढाई हमीभावासाठी आहे,' अशी घोषणा करत, २ ऑक्टोबरला 'ट्रॅक्टर मोर्चा' काढून 'चक्काजाम' करण्याचा इशारा दिला.

१३८ किलोमीटरच्या या पदयात्रेचा समारोप आंबोडा येथे झाला. सभेला इतकी प्रचंड गर्दी झाली होती की, सभा थेट महामार्गावरच घेण्यात आली, ज्यामुळे वाहतूक अनेक तास ठप्प झाली होती. यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले, 'शेतकऱ्याचा जीव सध्या फार स्वस्त झाला आहे. आम्ही जात-पात विसरून एक झालो, तर सरकारला आमची दखल घ्यावीच लागेल.' 'माझे पाय रक्तबंबाळ झाले, पण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वेदना त्याहून मोठी आहे,' असे म्हणत त्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. यावेळी, सभेला उपस्थित असलेले आमदार रोहित पाटील यांनीही सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, 'हे ओझे एकट्या बच्चूभाऊंच्या खांद्यावर टाकणे योग्य नाही. तुमचा लहान भाऊ म्हणून, मीही ही जबाबदारी घ्यायला तयार आहे. वेळ पडल्यास, या आंदोलनात रक्त सांडायलाही मागेपुढे पाहणार नाही,' असे महणत त्यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवला.



### २ ऑक्टोबरला 'ट्रॅक्टर मोर्चा'

**'हे आंदोलन संपलेले नाही, तर आता सुरू झाले आहे,' असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले. 'पुढचा आणि खरा लढा हा शेतीमालाच्या हमीभावासाठी असेल.' 'यासाठी, येत्या २ ऑक्टोबरला, गांधी जयंतीच्या दिवशी, सर्व शेतकऱ्यांनी आपापल्या गावांतून ट्रॅक्टर रस्त्यावर उतरवून 'चक्काजाम' करावा आणि या झोपलेल्या सरकारला जागे करावे,' असे आवाहन त्यांनी केले. या घोषणेने पुढील मोठ्या आंदोलनाची दिशा निश्चित झाली आहे.**



### साहेबराव करपे यांच्या भूमीत आक्रोश



**देशाचे पहिले कृषिमंत्री, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पापळ या जन्मगावातून सुरू झालेली ही पदयात्रा, आज पहाटे गुंज येथून चिलगव्हाणकडे मार्गस्थ झाली. १५० किलोमीटरचा प्रवास करून आलेल्या या यात्रेतील हजारो शेतकऱ्यांची पाऊले आणि अंतकरण, करपेंच्या 'रणभूमी'त पोहोचताना जड झाले होते. क्रांतीपिठावर ठेवलेल्या साहेबराव करपे यांच्या प्रतिमेला बच्चू कडू यांनी पुष्पहार अर्पण करताच, अनेकांच्या डोळ्यांतून अश्रूंचा बांध फुटला. 'साहेबराव करपे अमर रहे' आणि 'जय जवान, जय किसान'च्या घोषणांनी संपूर्ण आसमंत दणाणून गेला. यावेळी, बच्चू कडू यांनी साहेबराव करपे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. 'शेतकऱ्यांच्या या वेदनांचा अंत करण्यासाठी आणि त्यांचा सातबारा कोरा करण्यासाठीच आम्ही हा लढा उभारला आहे,' असे त्यांनी सांगितले. यात्रेचा समारोप आंबोडा येथे जाहीर सभेने होणार असला, तरी चिलगव्हाण येथील या भावनिक कार्यक्रमाने, आंदोलनाचा खरा निर्धार आणि उद्देश स्पष्ट केला आहे.**

---

## थोडक्यात

### रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

**वणी :** वणी शहरात विनापरवाना रेतीची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलिसांनी कारवाई केली आहे. यात रेतीने भरलेला ट्रॅक्टर जप्त करण्यात आला असून, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. रविवारी, १३ जुलै रोजी पहाटे २:४० वाजता एपीआय अश्विनी रायबोले या गस्त घालत असताना, त्यांना जनता सेलिब्रेशन हॉलसमोरून एक ट्रॅक्टर जाताना दिसला. चौकशी केली असता, चालक विशाल अशोक वैद्य (वय ३४, रा. वाघदरा) हा उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्यामुळे पोलिसांनी तीन लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर आणि सहा हजार रुपये किमतीची रेती असा एकूण ३ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

### मोबाईल हिसकावला

**वणी :** शहरातील शिवाजी पार्कजवळ दुचाकीवर बोलत असलेल्या एका सुपरवायझरच्या हातातील मोबाईल तीन अज्ञात तरुणांनी हिसकावून नेला. शुक्रवारी भरदिवसा घडलेल्या या घटनेने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विकास पुरुषोत्तम ढेंगे (रा. चिखलगाव) हे शुक्रवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास दुचाकीवरून जात होते. शिवाजी पार्कजवळ मोबाईलवर बोलत असताना, पाठीमागून दुचाकीवर आलेल्या तीन अज्ञात तरुणांनी त्यांच्या हातातील विवो कंपनीचा मोबाईल हिसकावला.

---

# नवीन दारू परवाना देण्याचा निर्णय रद्द करा

## संगीता पवार : राज्य सरकारच्या भूमिकेवर दारूबंदी चळवळीचा आक्षेप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १४ :** "राज्यात ३२८ नवीन दारू दुकानांना परवाने देण्याचा राज्य सरकारचा निर्णय अत्यंत चुकीचा आणि समाजविघातक असून, तो तातडीने रद्द करावा," अशी जोरदार मागणी दारूबंदी आणि व्यसनमुक्ती चळवळीच्या प्रणेत्या संगीता पवार यांनी केली आहे. सरकारने हा निर्णय मागे न घेतल्यास, जनतेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

एका पत्रकार परिषदेत बोलताना पवार म्हणाल्या की, "१९७२ पासून राज्यात नवीन दारू दुकानांना परवानगी देण्यावर बंदी आहे. असे असतानाही, केवळ महसूल गोळा करण्यासाठी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील समितीने घेतलेला हा निर्णय, महाराष्ट्राला व्यसनाच्या खाईत ढकलणारा आहे." त्या पुढे म्हणाल्या की, "राज्यात गुन्हेगारी, कौटुंबिक हिंसाचार आणि अपघात यांचे प्रमाण अगोदरच वाढलेले आहे. त्यात नवीन दारू दुकानांची भर पडल्यास, सामाजिक स्वास्थ्य आणखी बिघडेल. त्यामुळे, सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करून तो तातडीने मागे घ्यावा."

या मागणीसाठी, संगीता पवार यांनी राज्याचे राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन पाठवले आहे. या पत्रकार परिषदेला मानव अधिकार संघटनेच्या सरला इंगळे, रितू गटलेवार, दुर्गा पटले, संगीता सरोदे आणि गौतम राठोड हेदेखील उपस्थित होते.

# गवना शेतशिवारातील जुगार अड्ड्यावर धाड

## सात जणांना अटक, २.४० लाखांचा मुद्देमाल जप्त, आर्णी पोलिसांची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि. १४ :** आर्णी पोलिसांनी तालुक्यातील गवना शेतशिवारात सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर धाड टाकून, सात जणांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह एकूण दोन लाख ४० हजार ५३८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, १३ जुलै रोजी पोलिस पथक पेट्रोलिंग करत असताना, गवना शेतशिवारात काही इसम सार्वजनिक ठिकाणी गोलाकार बसून जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकली असता, सात जण जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून ९ हजार ५३८ रुपये रोख, ६१ हजार रुपये किमतीचे सात मोबाईल आणि १ लाख ७० हजार रुपये किमतीच्या पाच मोटरसायकली असा एकूण २ लाख ४० हजार ५३८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी, गजानन विठ्ठलराव विटेवरी (वय ४१), दिलीप दत्तात्रय कुंद्रपवार (वय ३८), चक्रधर पांडुरंग विखे (वय ४८), विठ्ठल बळीराम निरपासे (वय ६५), संजय ज्ञानेश्वर एकंदर (वय ४०), प्रवीण भिकाजी चव्हाण (वय ३९, सर्व रा. जवळा) आणि साहेबराव हाउसिंग चव्हाण (वय ४२, रा. शिरपूर) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात गुन्हा नोंदवून, पुढील तपास सुरू आहे. ही यशस्वी कारवाई ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस जमादार सतीश चौधर, पोहेका गुणवंत बोईनवाड, नितीन वास्टर, पोलिस नाईक नफीस शेख, राम ढाकणे आणि पोलिस शिपाई आकाश गावंडे यांच्या पथकाने पार पाडली. तालुक्यात मोठ्या प्रमाणात जुगार खेळविल्या जात आहे. यामध्ये लाखो रुपयांची दररोज उलाढाल होत आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाने जुगार खेळविणार्यांवर आळ घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी नॅचरल शुगर कृतसंकल्प

## राज्यपाल हरीभाऊ बागडे : महागावातील नॅचरल शुगर युनिटला दिली भेट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**महागाव, दि. १४ : महागावसारख्या विकसनोन्मुख तालुक्यात साखर कारखाना उभारून, नॅचरल शुगर समूहाने शेतकरी हितासाठी आपण कृतसंकल्प असल्याचे प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले आहे. आता विस्तारित गाळप क्षमता आणि सीएनजी प्रकल्पाची पायाभरणी झाल्याने, हा कारखाना शेतकऱ्यांची स्वप्ने अधिक सक्षमपणे साकार करेल, असा विश्वास राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी व्यक्त केला.**



नॅचरल शुगरच्या युनिट-२ ला त्यांनी सोमवारी (दि. १४) भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. राज्यपाल बागडे यांनी कारखान्याची विस्तारित गाळप क्षमता आणि प्रस्तावित सीएनजी प्रकल्पाची सविस्तर पाहणी करून, या भेटीला 'माहितीपूर्ण आणि अत्यंत प्रेरणादायक' असे संबोधले. विशेष म्हणजे, यवतमाळ ते नांदेड दौऱ्यावर असताना, त्यांनी स्वतःहून या प्रकल्पाला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली होती. याप्रसंगी, नॅचरल उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांनी, गेल्या दहा वर्षांतील कंपनीच्या कार्याची आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राबवलेल्या उपक्रमांची माहिती दिली. राज्यपाल बागडे म्हणाले की, ठोंबरे यांनी साखर उद्योगात क्रांतिकारी कल्पना राबवून, विदर्भातील मोडकळीस आलेल्या साखर उद्योगात नवा श्वास फुंकला आहे. बंद पडलेल्या कारखान्याला पुन्हा सुरू करून, त्याच्याशी संलग्न सीएनजी प्रकल्पाचे नियोजन करणे, हे नव्या दृष्टिकोनाचे द्योतक असल्याचे ते म्हणाले. यावेळी राज्यपाल बागडे यांनी कारखाना आवारात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या कार्यक्रमाला संचालक कृषिभूषण पांडुरंग आवाड, महाव्यवस्थापक डी.एल. कदम, उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, तहसीलदार अभय मस्के आणि उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड उपस्थित होते.

# विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे धरणे आंदोलन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. १४ :** आपल्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने शुक्रवारी येथील शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी ३७ मागण्यांचे निवेदन शासनाला सादर करण्यात आले.

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासूनच्या मागण्या प्रलंबित आहेत. या मागण्या मान्य करण्यासाठी, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतिक अध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वात, विदर्भातील सर्व जिल्हा शिक्षणाधिकारी आणि उपसंचालक कार्यालयांसमोर एकाच दिवशी हे आंदोलन करण्यात आले. यवतमाळात झालेल्या आंदोलनात जिल्हाध्यक्ष पवन बन, कार्यवाह रामकृष्ण जिवतोडे, कार्याध्यक्ष आनंद मेश्राम यांच्यासह आश्रमशाळा आणि उर्दू शिक्षक संघटनेचे पदाधिकारीही सहभागी झाले होते. यावेळी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या मागण्यांसाठी आवाज उठवला.

